इचलकरंजी ICHALKARANJI ▶ वर्ष - ४१ ▶ अंक - २५३ ▶ गुरूवार,ता.१५ जानेवारी २०२६ ▶ पाने १२ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

**चालत्या ट्रेनवर क्रेन कोसळून २२ ठार**

**बँकॉक,ता.१४–**

थायलंडची राजधानी बँकॉक येथे चालत्या ट्रेनवर बांधकामासाठी वापरली जाणारी क्रेन कोसळून अपघात घडला आहे. या भीषण अपघातात किमान २२ जणांचा मृत्यू झाला असून, ३० जण जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. ही दुर्घटना बुधवारी सकाळी नाखोन रत्चासिमा प्रांतातील सिखियो जिल्ह्यात घडली. ट्रेन उबोन रत्चथानी प्रांताकडे जात होती. यावेळी ट्रेनच्या एका डब्यावर बांधकामासाठी वापरली जाणारी मोठी क्रेन कोसळली. त्यामुळे ट्रेन रुळावरून घसरली त्यानंतर आग लागली. दरम्यान, आग आटोक्यात आणण्यात आली असून बचावकार्य सुरू आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

**CGTMSE कर्ज योजना**

२५ लाख ते १० कोटीपर्यंत
विनातारण व्यवसाय कर्ज
फक्त चालू व्यवसायासाठी
कागदपत्रे - GST-ITR-3B
सिबिल - ७१०+
9130690010
9595919625

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# मतदानासाठी प्रशासन सज्ज

**■ मुंबई,ता.१४–**

**राज्यातील बहुप्रलंबित २९ महापालिकांसाठी उद्या गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. ईव्हीएम मशीन तसेच मतदान साहित्यासह अधिकारी व कर्मचारी मतदान केंद्रांवर सायंकाळी दाखल झाले आहेत. मतदानासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.**



राज्यातील २९ महानगरपालिकांमधील २,८६९ जागांसाठी एकूण १५,९३१ उमेदवार रिंगणात आहेत. गुरुवारी मतदान तर शुक्रवारी मतमोजणी होणार आहे. निवडणुकीसाठी सकाळी ७.३० ते ५.३० या कालावधीत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मुंबई वगळता राज्यातल्या इतर सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना आहे. बहुतांश प्रभाग हे ४ सदस्यीय असून काही प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय आहे.त्याठिकाणी मतदारांना जितक्या सदस्यांचा प्रभाग (पान २ वर)

**आज मतदान**

**राजकीय पक्षांसाठी निवडणूक प्रतिष्ठेची**

**छायाचित्र असलेली १२ ओळखपत्र ग्राह्य**

**राज्यातील या महापालिकांमध्ये निवडणूक?**

**मुंबई विभाग**–बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली,वसई-विरार, भिवंडी-निजामपूर,मीरा-भाईंदर, उल्हासनगर, पनवेल.

**पश्चिम महाराष्ट्र विभाग**– पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, इचलकरंजी, **उत्तर महाराष्ट्र विभाग**– नाशिक, अहिल्यानगर, धुळे, जळगाव, मालेगाव.

**मराठवाडा विभाग**–छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना. **विदर्भ विभाग**–नागपूर, अकोला, अमरावती, चंद्रपूर.

**छायाचित्र असलेली १२ ओळखपत्र ग्राह्य**

**मतदानासाठी निवडणूक आयोगाने दिलेले मतदार ओळखपत्र मतदारांना दाखवता येईल. याशिवाय छायाचित्र असलेली इतर १२ ओळखपत्र दाखवली तरीसुद्धा मतदान करता येईल. या ओळखपत्रांमध्ये पारपत्र (पासपोर्ट), आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, सरकारी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, निवृत्ती वेतनाची कागदपत्र, लोकप्रतिनिधींची ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकांचं ओळखपत्र, बँक आणि टपाल खात्याचे पासबुक, दिव्यांग दाखला, मनरेगाचे जॉब कार्ड किंवा आरोग्य विमा योजनेचं कार्ड यांचा समावेश आहे.**



इचलकरंजी: ईव्हीएम मशीनसह मतदान केंद्रावर रवाना होताना केंद्र अधिकारी,कर्मचारी. (छाया-मयूर चिंदे)

# इचलकरंजी महापालिकेसाठी ३०२ केंद्रावर मतदान होणार

**■ इचलकरंजी,ता.१४–**

**इचलकरंजी महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रशासनाची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. बुधवारी ३०२ मतदान केंद्रांसाठी आवश्यक मतदान साहित्य व मतदान यंत्रे राजीव गांधी भवन येथून रवाना करण्यात आली. तर मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या दृष्टीने मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला असल्याची माहिती निवडणूक अधिकारी सौ.पल्लवी पाटील यांनी दिली.**

मतदान यंत्रांचे सिलींग पूर्ण करून ती सुरक्षा व्यवस्थेत राजीव गांधी सांस्कृतिक भवन येथे ठेवण्यात आली होती. गुरुवार १५ जानेवारी रोजी मतदान होणार असल्याने या मतदान यंत्राचे वाटप बुधवारी करण्यात आले. इचलकरंजी इचलकरंजी महापालिका क्षेत्रात १६ प्रभागातील ६५ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. १ ते १५ प्रभागात प्रत्येकी ४ तर प्रभाग क्रमांक १६ मध्ये ५ नगरसेवक पदांसाठी मतदान होत आहे. ६५ जागांसाठी २३० उमेदवार रिंगणात उतरले असून या सर्वांचे भवितव्य गुरुवारी मतदान यंत्रात बंद होणार आहे.

मतदारसंघात एकूण ३०२ मतदान केंद्रे आहेत. एसटी बसेस, जीप, टेम्पो ट्रॅव्हलर्स, स्कुल बसेस अशा ७२ वाहनांच्या माध्यमातून मतदान यंत्रे, साहित्य व अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर पाठविण्यात आले. बुधवारी सकाळपासून मतदान साहित्य ताब्यात घेण्यासाठी कर्मचाऱ्यांनी राजीव गांधी भवन येथे गर्दी केली होती. मतदानानंतर त्याचठिकाणी दिलेले साहित्य स्विकारण्यात येणार आहे. मतदारसंघातील एकूण ३०२ मतदान केंद्रांवर एक केंद्रप्रमुख, तीन अधिकारी, एक शिपाई, एक पोलिस कर्मचारी अशा सहाजणांची तसेच आवश्यक त्याठिकाणी आशा वर्कर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर शंभर मीटर अंतरापर्यंत मोबाईल वापरास बंदी घालण्यात आली आहे. केंद्र अधिकारी व कर्मचारी वगळता इतर कोणालाही मोबाईल वापरता येणार नाही. (पान २ वर)

**पोलीस बंदोबस्त तैनात**

**अप्पर पोलिस अधिक्षक आण्णासाहेब जाधव, पोलिस उपअधिक्षक विक्रांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ३ पोलिस उपअधिक्षक, पोलिस निरीक्षक ६, सहायक पोलिस निरीक्षक व उपनिरिक्षक २४, पोलिस अंमलदार २८०, होमगार्ड ३९०, एसआरपी प्लाटून १ आदींसह मोठा फौजफाटा निवडणूक काळात असणार आहे.**

# बिनविरोध निवडी विरोधातील मनसेची याचिका फेटाळली

**■ मुंबई,ता.१४–**

**राज्यातील महानगरपालिका निवडणुकांमधील बिनविरोध निवडी विरोधात मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी दाखल केलेली याचिका मुंबई हायकोर्टाने फेटाळून लावली आहे.**



बिनविरोध उमेदवार विजयी झाल्यासही मतदारांना 'नोटा'चा पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र सुनावणीदरम्यान खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने मांडण्यात आलेल्या चुकीच्या निवेदनांवर तीव्र नाराजी व्यक्त करत याचिका फेटाळण्याचा निर्णय सुनावला.

सुरुवातीच्या सुनावणीत ही याचिका आधीच्या प्रलंबित याचिकांप्रमाणेच असल्याचे नमूद करण्यात आले होते.परंतु प्रत्यक्ष सुनावणीला आल्यानंतर ऑनलाईन उपस्थित असलेले असीम सरोदे यांनी ती निवडणुकीशी संबंधित स्वतंत्र याचिका असल्याचे सांगितले. यामुळे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए.अखंड यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. (पान २ वर)

**राजस्थानमध्ये अपघात**

## सहा महिलांचा जागीच मृत्यू

**■ जयपूर,ता.१४–**

**राजस्थानच्या सीकर जिल्ह्यात बुधवारी भीषण अपघात घडला.**

फतेहपूर उपविभागातील हरसावा गावाजवळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर कार आणि ट्रक यांच्यात भीषण धडक होऊन झालेल्या अपघातात सहा महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात मयत झालेल्या सर्व महिला फतेहपूर परिसरातील(पान २ वर)

ट्रॅक्टर भाडेतत्वावर घेवून

# विकणारी आंतरराज्य टोळी जेरबंद

**आठ ट्रॅक्टर जप्त**

**■ निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)–**

**निपाणी, चिकोडी, कागल, रायबाग भागातील शेतकऱ्यांचे ट्रॅक्टर करार तत्वावर घेवून जादा भाडे देण्याचे आमिष दाखवित ट्रॅक्टर घेवून जावून परराज्यात विकणाऱ्या आंतरराज्य टोळीला अटक करण्यात निपाणी बसवेश्वर चौक पोलीसांना यश आले आहे.**

आंतरराज्य स्तरावरील ५ चोरट्यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून ८ ट्रॅक्टर पकडून ३७ लाखाचे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी अजय संतोष चव्हाण (वय २३ रा.सरताळे, जि.सातारा), पुष्पर पुष्पशिल सांळुखे (वय ३१ रा. म्हसोबावाडी, जि.पुणे), सोमनाथ शंकर डमाळ (वय ३६ रा.म्हसोबाचीवाड, जि.पुणे), दत्तात्रय संताजी गाडेकर (वय २३ रा.वाखेचोपडज, ता. बारामती), आकाश अंकुश (पान २ वर)

# कोल्हापूर महापालिकेसाठी यंत्रणा सज्ज

**५९५ केंद्रावर कर्मचारी रवाना**

**■ कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–**

**कोल्हापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ साठी उद्या शहरातील ५९५ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून, त्यासाठी प्रशासनाची अंतिम तयारी पूर्ण झाली आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी नियुक्त करण्यात आलेले २ हजार ९७५ अधिकारी व कर्मचारी आज सकाळी मतदान केंद्रांकडे रवाना झाले.**



**प्रशासक के. मंजुलक्ष्मी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी तयारीची पाहणी करून माहिती घेतली.**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आज सकाळी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रियेचे अंतिम प्रशिक्षण देण्यात आले. यानंतर त्यांना आवश्यक मतदान साहित्याचे वाटप करण्यात आले. महासैनिक प्रशिक्षण केंद्र, व्ही.टी.पाटील सभागृह, दुधाळी गांधी मैदान तसेच हॉकी स्टेडियम या चार ठिकाणी प्रशिक्षण व साहित्य वाटपाची व्यवस्था करण्यात आली होती.दरम्यान, प्रशासक के. मंजुलक्ष्मी आणि (पान २ वर)

# दिल्ली बॉम्बस्फोट पाच आरोपींच्या कोठडीत वाढ

**■ नवी दिल्ली,ता.१४–**

**लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणात पटियाला हाऊस सत्र न्यायालयाने तीन डॉक्टर आणि एका मौलवीसह पाच आरोपींची राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) यांची कोठडी १६ जानेवारीपर्यंत वाढवली आहे.**

प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अंजू बजाज चंदना यांनी तपास यंत्रणेचा अर्ज मंजूर केला असून, त्यामध्ये डॉ. आदिल राठर, डॉ. शाहीन सईद, डॉ. मुजम्मिल गनई, मौलवी इरफान अहमद वागे



आणि जसीर बिलाल वानी यांच्या कोठडीत चौकशी वाढवण्याची मागणी करण्यात आली होती.

न्यायालयासमोर सादर केलेल्या रिमांड कागदपत्रांमध्ये तपास यंत्रणेने सांगितले की, काही परस्परविरोधी विधानांच्या संदर्भात आरोपींचा इतर सहआरोपी, संशयित आणि (पान २ वर)

# खोट्या प्रतिज्ञापत्राद्वारे मालमत्तेवर नाव चढवून कोल्हापूरात फसवणूक

**■ कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–**

**बनावट प्रमाणपत्राच्या आधारे मृत्यूपत्र व खोटी प्रतिज्ञापत्राचा आधार घेऊन मालमत्तेवर नाव चढवून फसवणूक केल्याबद्दल राजेश माधवराव घाटगे (रा.ताराबाई पार्क,कोल्हापूर) याच्यावर शाहूपुरी पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. सिध्दार्थ उदयसिंह शिंदे (वय ४८ रा.ताराबाई पार्क,कोल्हापूर) यांनी फिर्याद दिली आहे.**




माझ्या चुलत आत्या उज्वला डुबल या शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे डॉ.सी. ए. सदा यांच्या सहीचे बनावट प्रमाणपत्र तयार करून घेतले. त्या आधारे वकीलामार्फत उज्वला डुबल यांचे मृत्युपत्र तयार करून घेतले. मृत्यूपत्र तयार करताना साक्षीदार म्हणून भाऊसाहेब डुबल, इरफान बाबालाल बागवान, श्रीरंग मुरलीधर जामसांडेकर यांना घेतले होते. या मृत्यूपत्राचा वापर करून दिवाणी कोर्ट, कोल्हापूर येथे संबंधीत मालमत्तेवर कोणताही दावा नसल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून नगर भुमापन कार्यालयातून मालमत्ता नावावर करून फसवणूक केली. हा प्रकार २७ जून २०२१ ते १८ जुलै २०२३ या कालावधीत घडला. याबाबत सिध्दार्थ शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार राजेश घाटगे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक संतोष डोके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक चेतन मसुटगे तपास करीत आहेत.

**छत्तीसगडमध्ये २९ नक्षल्यांचे आत्मसमर्पण**

**■ सुकमा,ता.१४–**

**छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद निर्मूलन मोहिमे अंतर्गत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे.राबविण्यात आलेल्या प्रभावी रणनीतीमुळे २९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा निर्णय घेतला.**

गोगुंडा कॅम्पची स्थापना झाल्यानंतर या भागात सुरक्षा दलांची उपस्थिती लक्षणीयरीत्या वाढली. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले.सुरक्षा दलांकडून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या शोध मोहिम, क्षेत्रीय वर्चस्व (एरिया डॉमिनेशन) आणि इतर (पान २ वर)

# इराणविरोधात लष्करी कारवाई केल्यास परिणाम विनाशकारी होतील; रशियाचा अमेरिकेला इशारा

**■ मॉस्को,ता.१४–**

**इराणमध्ये सुरू असलेल्या सरकारविरोधी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात नवी खळबळ उडाली आहे.**



ट्रम्प यांनी इराणी आंदोलनकर्त्यांना रस्त्यावर ठामपणे उभे राहण्याचे आवाहन करत, मदत येत आहे असे म्हटले.यानंतर लगेचच रशियाने अमेरिकेला कडक इशारा दिला असून, इराणविरोधात कोणतेही नवे लष्करी पाऊल उचलल्यास (पान २ वर)

**रशियाच्या इशाऱ्यानंतर आणि ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर हे स्पष्ट झाले आहे की, इराणचा प्रश्न आता केवळ एका देशापुरता मर्यादित राहिलेला नाही.मध्यपूर्व आधीच अस्थिरतेच्या टप्प्यातून जात आहे. जर अमेरिकेने लष्करी कारवाईचा मार्ग स्वीकारला, तर त्याचे परिणाम केवळ इराणपुरते मर्यादित न राहता संपूर्ण प्रदेश आणि जागतिक सुरक्षा व्यवस्थेवरही गंभीर परिणाम करू शकतात. येत्या काळात कूटनीतीचा मार्ग निवडला जातो की संघर्षाचा, हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.**



## पोंगल जागतिक सण-पंतप्रधान

**■ नवी दिल्ली,ता.१४–**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी दिल्ली येथे केंद्रीय राज्यमंत्री एल.मुरुगन यांच्या निवासस्थानी आयोजित पोंगल उत्सवमध्ये सहभाग घेतला.**

यासोबतच त्यांनी गो सेवाही केली. यावेळी ते म्हणाले की,पोंगल (पान २ वर)



## हरिद्वारमध्ये मकर संक्रांतीनिमित्त भाविकांची गर्दी

**■ हरिद्वार,ता.१४–**

**माघ मकर संक्रांती स्नान पर्वाची सुरुवात दाट धुके आणि तीव्र थंडीच्या पार्श्वभूमीवर झाली.पवित्र स्नानासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली.**

ढोल आणि वाद्यांच्या गजरात देवाच्या (पान २ वर)



## दिल्लीसह उत्तर भारतात कडाक्याची थंडी

**■ नवी दिल्ली,ता.१४–**

**उत्तर भारतात, विशेषत: दिल्ली-एनसीआरमध्ये, तीव्र शीतलहरीसह दाट धुक्याचा मोठा परिणाम दिसून येत आहे.**

अनेक भागात बुधवारी दृश्यमानता शून्य नोंदवली गेली. त्यामुळे रस्ते, रेल्वे आणि हवाई (पान २ वर)



## इराणमधील भारतीयांना त्वरीत देश सोडण्याचा सल्ला

**■ नवी दिल्ली,ता.१४–**

**भारताने इराणमध्ये सुरू असलेल्या हिंसक आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर आपल्या नागरिकांबाबत काळजी व्यक्त केली आहे.**

विदेश (पान २ वर)

**अंडी** ६०५ रुपये शेकडा

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४२००० रु. | २७८००० रु. |

**हास्यतुषार**



(पान १ वरून)

# पोंगल जागतिक सण

आता एक जागतिक सण बनला आहे आणि तामिळ संस्कृती संपूर्ण भारताची सामायिक वारसा आहे.पोंगल लोकांना शिकवतो की,प्रकृतीबद्दल कृतज्ञता ही फक्त शब्दांत मर्यादित राहू नये, तर ती आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी.पंतप्रधान मोदींनी सांगितले,पोंगलचा सण आपल्याला प्रेरणा देतो की, जेव्हा ही धरती आपल्याला इतके काही देते,तेव्हा तिची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे.पुढील पिढीसाठी मातीला निरोगी ठेवणे, पाणी वाचवणे आणि संसाधनांचा संतुलित उपयोग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मोदी म्हणाले की, गेल्या वर्षी त्यांना तामिळ संस्कृतीशी संबंधित अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. ही संस्कृती केवळ भारताची नाही तर संपूर्ण जगाची सामायिक वारसा आहे. तामिळ संस्कृतीमध्ये शेतकऱ्याला जीवनाचा पाया मानले गेले आहे. त्यांनी 'तिरुक्कुरल' चा संदर्भ दिला आणि सांगितले की, त्यात कृषी आणि शेतकऱ्यांचे महत्त्व विस्तृतपणे मांडले आहे.पंतप्रधान म्हणाले, पोंगल लोकांना प्रेरित करतो की प्रकृतीचा सन्मान आपल्या जीवनाचा भाग व्हावा. जगातील जवळजवळ सर्व संस्कृतींमध्ये पिकांशी संबंधित काही ना काही सण साजरे केले जातात.आमचे शेतकरी राष्ट्रनिर्माणाचे मजबूत साथीदार आहेत.पंतप्रधान मोदींनी तामिळ संस्कृतीच्या समृद्ध परंपरेवर भर देत सांगितले की, ही परंपरा फक्त तामिळनाडूत मर्यादित नाही, तर संपूर्ण भारताची सामायिक वारसा आहे. मोदी म्हणाले की, पोंगलसारखे सण एक भारत, श्रेष्ठ भारत या भावनेला अधिक बळकटी देतात.पंतप्रधानांनी देशभरातील लोहडी, मकर संक्रांती, माघ बिहू यासारख्या सणांवरील उत्साहाचीही प्रशंसा केली. पोंगल तामिळ समुदायासाठी महत्त्वाचा सण असून,तो प्रकृती,सूर्य,जनावरे आणि शेतकऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि कुटुंबासोबत समृद्धी, आभार व ऐक्य दर्शविण्याचे प्रतिक आहे.

# हरिद्वारमध्ये भाविकांची गर्दी

पालख्यांना गंगेत स्नान घालण्यात आले. भाविक गंगेच्या हर की पैडी घाटावर एकत्र आले होते.प्रचंड थंडी असूनही भाविकांचा उत्साहात कायम होता. पहाटेपासून गंगेच्या सर्व घाटांवर भाविक स्नान, दान आणि पूजाअर्चा करताना दिसून आले. गंगा घाटावर आरतीही करण्यात आली.

सूर्याचे दक्षिणायनातून उत्तरायणात आगमन होणे आणि एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करणे यालाच मकर संक्रांती असे म्हटले जाते. यावर्षी संक्रांती आणि एकादशीचा शुभ योग असल्याने या विशेष मुहूर्तातील स्नान अत्यंत उत्तम असल्याचे ज्योतिष शास्त्राचे तज्ञ सांगत आहेत. उत्तरायण काळ शास्त्रांनुसार शुभ मानला जातो. या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे, सूर्याला अर्घ्य देणे आणि दान करणे विशेष फलदायी ठरते. यावर्षी मकर संक्रांतीच्या दिवशी षटतिला एकादशीही येत आहे.असा योग सुमारे २३ वर्षांनंतर निर्माण होत असून, संक्रांती आणि एकादशी एकाच दिवशी येत आहेत. ज्योतिषशास्त्रानुसार हा योग अत्यंत पुण्यदायी आहे. या दिवशी केलेले स्नान, दान आणि पूजा अनंत पटीने शुभ फल देणारे मानले जाते.

# उत्तर भारतात कडाक्याची थंडी

वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. हवामान विभागाच्या माहितीनुसार पंजाब आणि हरियाणामध्ये शीतलहर कायम आहे. सध्या संपूर्ण उत्तर भारत भीषण थंडी आणि दाट धुक्याच्या तडाख्यात आहे.भारतीय हवामान विभागानुसार (आयएमडी) बुधवारी दिल्ली-एनसीआर, पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये दाट ते अतिदाट धुके पसरले होते, ज्यामुळे दैनंदिन जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले.सकाळच्या वेळेत अनेक ठिकाणी परिस्थिती अत्यंत गंभीर होती. पंजाबच्या अमृतसर,अंबाला,पंतनगर आणि उधमपूर येथे दृश्यमानता शून्य मीटर नोंदवली गेली. ओडिशाच्या राऊरकेला येथेही दाट धुके असून, तेथे सुमारे १०० मीटर दृश्यमानता नोंदवली गेली. दाट धुक्यामुळे रस्ते, रेल्वे आणि हवाई सेवांवर मोठा परिणाम झाला असून, अनेक गाड्या व विमानांना विलंब झाला.आयएमडीनुसार पंजाब आणि हरियाणातील अनेक भागांत शीतलहर ते तीव्र शीतलहरीची परिस्थिती कायम आहे. उत्तराखंडमधील काही भागांत कोल्ड डेची स्थिती असून जमिनीवर दवबिंदू गोठल्याची (पाला) नोंद झाली आहे.

जम्मू-काश्मिर-लडाख आणि हिमाचल प्रदेशातील अनेक भागात किमान तापमान शून्याखाली गेले आहे. पंजाब,हरियाणा,दिल्ली,राजस्थान आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील अनेक भागात किमान तापमान १ ते ५ अंशादरम्यान नोंदवले गेले. संपूर्ण उत्तर-पश्चिम भारतात तापमान सामान्यपेक्षा ३ ते ६ अंशाने कमी आहे

# रशियाचा अमेरिकेला इशारा

त्याचे परिणाम विनाशकारी होतील, असे स्पष्ट केले आहे.रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने कठोर शब्दांत अमेरिकेला इशारा देत सांगितले की,इराणविरोधात नव्या लष्करी हल्ल्यांच्या धमक्या पूर्णपणे अस्विकार्य आहेत.बाह्य शक्तींनी प्रेरित केलेल्या अस्थिरतेचे कारण पुढे करून जर पुन्हा हल्ला करण्यात आला, तर त्यातून मध्यपूर्वेतील तसेच जागतिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होईल, असे मंत्रालयाने नमूद केले. रशियाने या प्रकाराला इराणच्या अंतर्गत बाबींमधील विध्वंसक हस्तक्षेप असे संबोधले आहे.इराणमध्ये गेल्या अनेक आठवड्यांपासून सरकारविरोधी आंदोलने सुरू आहेत.अहवालानुसार, सुरक्षा दलांच्या कारवाईत आतापर्यंत सुमारे २,००० लोकांचा मृत्यू झाला आहे.परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने कठोर उपाययोजना केल्या असून, त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवाधिकारांबाबत चिंता वाढली आहे.अमेरिका सातत्याने या आंदोलनांना नैतिक पाठिंबा देत आहे.

# मतदानासाठी प्रशासन सज्ज

तितकी मतं द्यावी लागणार आहेत. त्यांच्या ईव्हीएमवर ४ वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. या प्रत्येक मतपत्रिकेवर त्या-त्या क्रमांकाच्या सदस्यपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची यादी आणि नोटाचे बटन असेल. मतदारांना ईव्हीएममध्ये या सर्व मतपत्रिकांच्या समोर असलेले बटन दाबावे लागेल. मत नोंदवल्यावर ज्या उमेदवाराला मत दिलं त्याच्या समोरचा लाइट लागेल. सर्व उमेदवारांना मत दिल्यावर शेवटी बीप असा आवाज येईल आणि मतदान पूर्ण झालं याची खात्री मतदारांना मिळेल.

सर्वांचे लक्ष हे मुंबई महानगरपालिकेच्या निकालाकडे आहे. जवळपास सात ते आठ वर्षांनंतर होणारी महानगरपालिकांची निवडणूक ही सर्वच राजकीय पक्षांनी प्रतिष्ठेची केली आहे. पारंपरिक प्रचाराचे तंत्र बदलून यंदा सर्वच पक्षांनी मतदारांशी संपर्क साधण्याकरिता नवीन प्रयोग केले.लोकशाहीचा हा महत्त्वाचा उत्सव शांततेत आणि मोठ्या सहभागाने पार पडावा, यासाठी राज्य सरकारडून संबंधित मतदान क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या निर्णयामुळे मतदारांना मतदानासाठी पुरेसा वेळ मिळणार असून मतदानाचा टक्का वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मतदान सुरळीत पार पडावे, यासाठी प्रशासनाकडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे. संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, केंद्रीय सुरक्षा बल, तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवले जाणार आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासन सतर्क आहे.

# इराणमधील भारतीयांना त्वरीत देश सोडण्याचा सल्ला

(पान १ वरून)

मंत्रालयाने ॲडव्हायझरी जारी करत इराणमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांना तात्काळ परत येण्याचा सल्ला दिला आहे तसेच, सुरक्षा बाबतीत पूर्ण सतर्क राहण्याची सूचना दिली आहे. इराणमध्ये मागील २ आठवड्यांपासून सुरू असलेल्या हिंसा आणि विरोध प्रदर्शने पाहता, भारतीय नागरिकांसाठी सल्ला-निर्देशिका जारी करण्यात आली आहे.बदलत्या सुरक्षा परिस्थितीचा विचार करता भारत सरकारने तिथे राहणाऱ्या नागरिकांना शक्य तितक्या लवकर देश सोडण्याचा सल्ला दिला आहे. या सल्ल्यात इराणमध्ये असलेले विद्यार्थी, व्यापारी आणि पर्यटक यांचा समावेश आहे.इराणमध्ये विरोध प्रदर्शन गेल्या महिन्याच्या शेवटी तेहरानहून सुरू झाले होते, जेव्हा इराणी चलन रियाल ऐतिहासिक पातळीवर खाली आले.

त्यानंतर हे आंदोलन हळूहळू देशातील सर्व ३१ प्रांतांमध्ये पसरले. सुरुवातीला आर्थिक समस्यांवर आधारित हे प्रदर्शन आता राजकीय बदलांची मागणी करत आहे.भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या ॲडव्हायझरीत सांगितले आहे की, भारतीय नागरिकांनी उपलब्ध असलेल्या सर्व वाहतूक साधनांचा वापर करावा, ज्यात व्यावसायिक उड्डाणेही समाविष्ट आहेत, जेणेकरून ते सुरक्षितपणे इराण सोडू शकतील.

सरकारने स्पष्ट केले की,इराणमध्ये असलेले सर्व भारतीय नागरिक आणि पीआयओ पूर्ण सतर्क रहावेत. त्यांना कोणत्याही विरोध प्रदर्शन किंवा अस्थिर भागांपासून दूर राहण्याची,स्थानिक परिस्थितीवर लक्ष ठेवण्याची आणि तेहरानमधील भारतीय दूतावासाशी नियमित संपर्क ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे. इराणमध्ये असलेल्या सर्व भारतीय नागरिकांना त्यांचे प्रवास आणि स्थलांतराशी संबंधित कागदपत्रे, जसे की पासपोर्ट आणि ओळखपत्र, नेहमी जवळ ठेवा आणि सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे. विदेश मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, कोणत्याही मदतीसाठी किंवा माहितीसाठी भारतीय नागरिक तेहरानमधील भारतीय दूतावासाशी संपर्क साधू शकतात.

# इचलकरंजी मनपासाठी ३०२ केंद्रावर मतदान होणार

(पान १ वरून)

एकूण २ लाख ४८ हजार ९०७ मतदारांची नोंद झाली असून त्यामध्ये १ लाख २५ हजार ६७२ पुरुष तर १ लाख २३ हजार १८० महिला मतदार आहेत. तृतीयपंथी मतदारांची संख्या ५५ इतकी आहे. एकूण मतदान केंद्रांपैकी ७४ केंद्रे ही वेबकास्टिंग मतदान केंद्रे आहेत. दिव्यांग मतदारांसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर व्हिलचेअरची सुविधा ठेवण्यात आली आहे. निवडणूक प्रचार काळात आचारसंहिता भंगाची एकूण पाच गुन्हे दाखल झाले आहेत.

मतदानाची टक्केवारी वाढावी, मतदारांना आकर्षित करण्यासाठी तांबेमाळ शाळा याठिकाणी पिंक पोलिंग स्टेशन आणि बालाजी विद्यालय विक्रमनगर येथे माझी वसुंधरा ही थीम राबविण्यात येत आहे. मतदान शांततेत व्हावे यासाठी शहर व परिसरात मोठा पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

# जनतेच्या पाठबळावर पंचायत समिती निवडणूक लढविणार–सौ.उज्वला उमराणे

■ शिवनाकवाडी,ता.१४

**शिवनाकवाडी गावात माझे पती गणपती उमराणे यांनी सरपंचपदाच्या काळात केलेल्या विकासकामांच्या जोरावर व जनतेत माझा असलेला जनसंपर्क, जनतेच्या पाठबळावर पंचायत समिती निवडणूक लढविणार असल्याचे सौ.उज्वला गणपती उमराणे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.**

त्या पुढे म्हणाल्या, शिरढोण पंचायत समिती मतदार संघ सर्वसाधारण महिलेसाठी खुला झाला असून या मतदार संघात शिवनाकवाडी,शिरदवाड व शिरढोण या तीन गावांचा समावेश आहे.आमच्या सासुबाई, माजी सरपंच कै.भागुबाई कृष्णा उमराणे या शिवनाकवाडी गावच्या पहिल्या महिला सरपंच होत्या.त्यांच्या आशिर्वादावर व त्यांनी केलेल्या विकासकामांच्या जोरावर गावचा वसा व विकासकामांचा वारसा जपत माझे पती, माजी सरपंच गणपती उमराणे यांनी २०१६ मध्ये आपल्या सरपंचपदाच्या काळात गावात विकासकामांचा डोंगर उभा केला.

त्यांचा जनतेतील असलेला जनसंपर्क,लोकाशी असलेले सलोख्याचे संबंध, सुखदुखात तत्परतेने धावणारे म्हणून ओळख आहे.तसेच शिरदवाड व शिरढोण गावाशी असलेले सलोख्याचे संबंध यामुळेच पंचायत समिती निवडणूक लढविण्यास मी इच्छुक आहे.

जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी,महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी,विविध योजना नागरिकांच्यापर्यंत पोचविण्यासाठी मी या पंचायत समिती निवडणुकीत उभी राहत असून आपल्या सर्वांच्या पाठबळाची गरज असल्याचे सौ.उज्वला उमराणे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# बिनविरोध निवडी विरोधातील मनसेची याचिका फेटाळली

(पान १ वरून)

तुम्ही सकाळी चुकीची विधाने केली, रिट पिटिशन आणि आधीच्या याचिकेत साम्य असल्याचे सांगितले, मात्र कोणतेही साम्य दिसून आले नाही. मग आम्ही चुकीची माहिती देण्यामागे घाई किंवा भीती काय होती? असा थेट सवाल हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना केला. खंडपीठाने दंड आकारण्याची तयारीही व्यक्त केली होती, मात्र शेवटी दंड न आकारता याचिका फेटाळण्याचा निर्णय देण्यात आला.

दरम्यान, राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये मतदान होण्यापूर्वीच ६६ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.बिनविरोध निवडीत भाजपने आघाडी घेतली असून पक्षाचे तब्बल ४४ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. शिंदे गटाच्या शिवसेनेचे १९ उमेदवार बिनविरोध विजयी ठरले असून या पक्षाने दुसरा क्रमांक पटकावला आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत भाजपचे १४ आणि शिवसेनेचे ६ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन तसेच मालेगावमध्ये इस्लाम पार्टीच्या एका उमेदवाराची बिनविरोध निवड झाली असून बिनविरोध निवड प्रक्रियेमुळे निवडणूक रंगत कमी झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# नक्षल्यांचे आत्मसर्मपण

(पान १ वरून)

दबावात्मक उपाययोजनांमुळे प्रभावित होऊन या नक्षलवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडत समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला. आत्मसमर्पण केलेल्या सर्व २९ नक्षलवाद्यांनी सुकमा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक (एसपी) किरण चव्हाण यांच्यासमोर आत्मसमर्पण केले. यावेळी पोलीस प्रशासनाकडून त्यांना सरकारच्या पुनर्वसन धोरणाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या धोरणांतर्गत नक्षलवाद्यांना समाजात पुन्हा स्थिरावण्यासाठी आणि चांगले जीवन जगण्यासाठी विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात. या माहितीतून त्यांना मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी अधिक प्रोत्साहन मिळाले.

# आरोपींच्या कोठडीत वाढ

(पान १ वरून)

साक्षीदारांशी समोरासमोर तपास करणे आवश्यक आहे. तपास यंत्रणेने यावर भर दिला की, आरोपींना जम्मू-काश्मीर,उत्तर प्रदेश आणि एनसीआरसह अनेक ठिकाणांशी संबंधित महत्त्वाची माहिती आणि परिस्थितीची जाण होती.

काही साक्षीदारांकडून मिळालेल्या डेटामधून आणि जप्त केलेल्या डिजिटल उपकरणांच्या तांत्रिक विश्लेषणातून हे महत्त्वाचे तथ्य समोर आल्याचे एजन्सीने सांगितले. मागील कोठडीनंतर काही कोड वर्ड्स आणि अन्य आक्षेपार्ह साहित्य हाती लागल्याचेही तपास यंत्रणेने नमूद केले.

मोठ्या कटाचा पर्दाफाश करण्यासाठी आणि त्यामध्ये सहभागी असलेल्या इतर व्यक्तींची ओळख पटवण्यासाठी आरोपींची कोठडी वाढवणे आवश्यक असल्याचे एनआयएने स्पष्ट केले. या प्रकरणातील आत्मघाती हल्लेखोर उमर-उन-नबी हा लाल किल्ल्याबाहेर स्फोटकांनी भरलेली कार चालवत होता. १० नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या या बॉम्बस्फोटात १५ जणांचा मृत्यू झाला होता.या प्रकरणात आतापर्यंत तपास यंत्रणेने एकूण नऊ आरोपींना अटक केली आहे.

# सहा महिलांचा जागीच मृत्यू

(पान १ वरून)

रहिवासी होत्या. या महिला रघुनाथपूर येथून लक्ष्मणगढ येथे एका बैठकीस उपस्थित राहून कारने परतत होत्या, त्यावेळी हरसावा गावाजवळ महामार्गावर वेगात येणाऱ्या ट्रकने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली.

अपघातानंतर स्थानिक नागरिक व पोलिसांच्या मदतीने जखमींना रुग्णवाहिकेद्वारे फतेहपूरच्या शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातामुळे वाहतूक कोंडी झाली होती.

# मतदान नक्की करा,आपलं मत आपल्या शहराचं भवितव्य ठरवू शकते

## राज्य निवडणूक आयुक्त

■ मुंबई,ता.१४ –

**महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या शहराच्या– महानगराच्या जडणघडणीत योगदान द्यावे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा. आपलं मत आपल्या शहराचं भवितव्य ठरवू शकतं. कारण ते अनमोल आहे. लोकशाहीतला तो आपला महत्वाचा हक्क आहे आणि तो आपण मतदानाच्या माध्यमातून बजावायला हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावे, असे मी सर्व मतदारांना आव्हान करतो, असे आवाहन राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केले आहे.**

महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीची तयारी; तसेच १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समितीच्या निवडणुकांची तयारी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता.१४) बैठक घेण्यात आली.

# मनपासाठी यंत्रणा सज्ज

(पान १ वरून)

जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी दुपारी साहित्य वाटप केंद्रांना भेट दिली. शहरातील ५९५ मतदान केंद्रांवर मतदानाची विविध कामकाज पार पाडण्यासाठी एकूण २,९७५ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्डचीही स्वतंत्रपणे तैनाती करण्यात आली आहे.यावेळी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रिया पाटील, उपआयुक्त परितोष कंकाळ, शहर अभियंता रमेश मस्कर आणि जल अभियंता हर्षजीत घाटगे यांनीही तयारीचा आढावा घेतला.



निपाणी: बसवेश्वर चौक पोलीसांनी ५ आरोपींना अटक करीत जप्त केलेले ट्रॅक्टर सोबत तपास अधिकारी डीवायएस गोपालकृष्ण गौडर, सीपीआय बी.एस.तळवार फौजदार रमेश पोवार व इतर.

# ट्रॅक्टर विकणारी आंतरराज्य टोळी जेरबंद

(पान १ वरून)

गाडे (वय ३३ रा. मुरंब,ता.बारामती) यांना अटक करण्यात आली आहे. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रमेश सिदगोंडा माळी (रा.पांगिरे ए.) व अन्य १३ जणांनी बसवेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीत त्यांनी आपण व अन्य १४ जणांनी ६ सप्टेंबर २०२४ ते ८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान निप्पाणी न्यायालयाच्या आवारातून नोटरी बॉन्ड करीत वरिल आरोपींनी मासिक भाडे देण्याचे आश्वासन दिले होते. १५ ट्रॅक्टर घेवून गेल्यानंतर त्यांनी ट्रॅक्टर मालकांना परत केले नव्हते. ट्रॅक्टर मालकांनी पैसे मागितले तेव्हा आता पैसे देईन, नंतर देईन असे सांगून फसवित होते. पैसे मागण्यासाठी ते त्याच्या घरी गेले तेव्हा ते पळून गेले. त्यामुळे १५ ट्रॅक्टर मालकांनी आपली फसवणूक झाली असल्याची तक्रार बसवेश्वर चौक पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली.

त्यांनुसार फौजदार रमेश पवार,स्टेशनचे कर्मचारी आर.जी.दिवटे, एम.ए. तेरदाळ, मारुती कांबळे, प्रशांत कुदरी, लक्ष्मण कुदरी व कर्मचाऱ्यांनी विशेष तपास पथक तयार करून तपास करण्यात आला.

आरोपींना अटक करून चौकशी केली असता आरोपींनी निपाणी, चिकोडी, रायबाग आणि कागल तालुक्यातील ट्रॅक्टर फसवणूक करून पुणे, सातारा आणि नाशिक जिल्ह्यातील विविध भागात विकल्याचे आढळून आले. त्यानुसार तपास पथकाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात १० दिवसात अंदाजे ३७ लाख रुपये किमतीचे एकूण ८ ट्रॅक्टर जप्त केले आहेत. आरोपींना अटक करून अन्य चोरीतील ट्रॅक्टरचा शोध पोलीसांनी सुरू ठेवला आहे.

# इराण-अमेरिकेतील तणाव वाढला दोन्ही देशांमधील थेट संपर्क खंडित

■ वॉशिंग्टन,ता.१४–

**इराण आणि अमेरिकेमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला असून, त्यामुळे दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमधील थेट संपर्क तुटला आहे. माहितीनुसार, इराणचे परराष्ट्र मंत्री सैयद अब्बास अराघची आणि अमेरिकेचे विशेष दूत स्टीव विटकोफ यांच्यातील संवाद पूर्णपणे बंद करण्यात आला आहे.**

इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनांवर होत असलेल्या कठोर कारवाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हस्तक्षेपाच्या दिलेल्या धमक्यांनंतर हा अहवाल समोर आला आहे. तेहराने इशारा दिला आहे की, जर इराणवर हल्ला झाला तर तो परिसरातील अमेरिकेच्या लष्करी तळांवर प्रत्युत्तरात्मक कारवाई करेल.

युरोपीय देश आणि इस्रायलसोबत मिळून अमेरिका गेल्या सुमारे एका वर्षापासून इराणच्या अणुकार्यक्रमावर करार करण्याचा प्रयत्न करत होती. मात्र, इराणी अधिकाऱ्यांनी संकेत दिले आहेत की वाढलेल्या तणावामुळे कोणतीही प्रगती होण्याची शक्यता संपुष्टात आली आहे.

अमेरिकेच्या धमक्यांमुळे राजनैतिक प्रयत्न कमकुवत झाले असून, दशके जुना अणु-विवाद सोडवण्यासाठी होऊ शकणाऱ्या संभाव्य बैठका रद्द करण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.ट्रम्प यांनी इराणमधील आंदोलनकर्त्यांच्या समर्थनार्थ वारंवार हस्तक्षेपाची धमकी दिली आहे. एका इराणी अधिकाऱ्याने सांगितले की, तेहराने अमेरिकन सैन्याला मदत करणाऱ्या शेजारी देशांना इशारा दिला असून, वॉशिंग्टनने हल्ला केल्यास अमेरिकन तळांवर हल्ले केले जातील. अहवालानुसार, मध्यपूर्वेतील एका प्रमुख अमेरिकन विमानतळावरून काही कर्मचाऱ्यांना तेथून बाहेर पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# बांगलादेशात १२ फेब्रुवारीला मतदान

ढाका,ता.१४–

**बांगलादेशमध्ये सार्वत्रिक निवडणुकांची तयारी सुरू झाली असून, देशात २२ जानेवारीपासून कडेकोट सुरक्षेत निवडणूक प्रचार सुरू होणार आहे. मात्र, अंतरिम सरकारने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाला फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय संसदीय निवडणुकांमध्ये सहभागी होता येणार नाही.**

बांग्लादेशात ऑगस्ट २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या हिंसक आंदोलनानंतर अवामी लीग सरकार सत्तेतून बाहेर पडले. त्यानंतर होणाऱ्या या पहिल्याच निवडणुका असतील.

# जि.प.निवडणूक आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करा–जिल्हाधिकारी येडगे

■ कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात तातडीने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या सर्व निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिले आहेत. यासंदर्भात जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विभाग प्रमुखांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात आली.**

या बैठकीत आचारसंहितेचे तंतोतंत पालन करण्यावर भर देत, पहिल्या २४, ४८ आणि ७२ तासांतील केलेल्या कारवाईचे सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व निष्पक्ष व्हावी, यासाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर प्रत्येकी तीन स्थिर तपासणी पथके तात्काळ कार्यरत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे यासाठी स्वतंत्र आचारसंहिता कक्ष व तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. उमेदवारांच्या सोयीसाठी 'एक खिडकी' पद्धतीचा अवलंब करून विविध परवाने एकाच ठिकाणी मिळण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच राजकीय प्रचारासाठी जाहिरात पूर्व प्रमाणन व पेड न्यूजवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा माहिती कार्यालयात माध्यम कक्षाची स्थापना करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आचारसंहितेच्या कालावधीत मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या कोणत्याही नवीन शासकीय घोषणा करण्यास मनाई करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी लावलेले जाहिरातींचे फलक झाकणे तसेच प्रचार साहित्य बाबतच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, नागरी भागात आचारसंहिता लागू नसली तरी तेथेही नवीन शासकीय घोषणा करता येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याशिवाय शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणत्याही प्रकारच्या राजकीय प्रचारात सहभागी होऊ नये, असे आदेशही देण्यात आले आहेत.या बैठकीला उपजिल्हाधिकारी संपत खिलारी, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी यांच्यासह जिल्ह्यातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.



इचलकरंजी – महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी गुरूवार ता. १५ रोजी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर येथील राजीव गांधी सांस्कृतिक भवन येथून बुधवारी प्रत्येक मतदान केंद्रावर ईव्हीएम मशिनसह अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस बंदोबस्त तैनात करण्याचे काम सुरू होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालक सुनील फुलारी यांनी राजीव गांधी सांस्कृतिक भवनला भेट देत मतदान आणि मतमोजणी कामकाजाची माहिती घेतली. (छाया.– सारंग दास/ मयूर चिंदे)

# तोंडावर स्प्रे मारुन लुटमार करणारे दोघे जेरबंद

सांगली,ता.१४(प्रतिनिधी)-

**दुचाकीवरुन तासगावच्या दिशेने जाणाऱ्या युवकाच्या तोंडावर स्प्रे मारुन त्याची दुचाकीसह व अन्य साहित्य घेवून पसार झालेल्या दोघांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले. अनिकेत अरुण मोहिते (वय २६, रा. सिध्देश्वर गल्ली, कवलापूर, ता. मिरज ) आणि राजेश संभाजी काटकर (वय २९,रा. काटकर मळा, कवलापूर) अशी त्या दोघा गुन्हेगारांची नावे आहेत.**

याप्रकरणी प्रतिक दिनेश पवार (वय २८, रा. काळडोह वस्ती, मणेराजुरी, ता. तासगाव) यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

याबाबत अधिक माहिती अशी की, लुटमारीची घटना दि. ५ रोजी रात्री १० च्या सुमारास कवलापूर नजीकच्या एका पेट्रोलपंपाजवळ घडली होती. फिर्यादी प्रतिक पवार खाजगी नोकरीत करीत असून ते तासगाव तालुक्यातील मणेराजुरी येथे राहण्यास आहेत. सोमवारी रात्रीच्या सुमारास ते दुचाकीवरुन (क्र. एमएच १० डीसी ६५८४) घरी जाण्यासाठी निघाले होते. कवलापूर गावाच्या हद्दीतील एका पेट्रोलपंपानजीक ते आले असता त्यांना पत्ता विचारण्याच्या बहाण्याने दोघांनी थांबविले. संशयितांनी तोंडाला रुमाल बांधला होता. त्यातील एकाने तासगावला जाण्याचा रस्ता विचारला. फिर्यादी प्रतिक हा रस्ता सांगत असताना दुसऱ्याने प्रतिक यांच्या तोंडावर कशाचा तरी स्प्रे मारला. यामुळे प्रतिक हा बेशुध्द पडला. याचा फायदा घेवून संशयितांनी त्याची दुचाकी, मोबाईल आणि रोकड असा मुद्देमाल लंपास करुन पोबारा केला.

दरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकास सदर संशयित दुचाकीवरुन सांगलीतील सूतगिरणी चौक ते यशवंतनगर चौका दरम्यान येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने परिसरात सापळा लावला होता. काही वेळाने भाजी मंडई परिसरात दोघे दुचाकीवरुन येवून थांबले. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

पोलीस चौकशीत त्यांनी लुटमारीची कबुली दिली. त्यांच्याकडून दोन दुचाकी, मोबाईल आणि रोख ६ हजार असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पोलीस अभिलेखात त्यांच्यावर यापूर्वी जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. सदरची कारवाई पोलीस निरिक्षक संजीव झाडे, सपोनि पंकज पवार, पोलीस अंमलदार अनिल कोळेकर, विक्रम खोत, अमर नरळे, अनिल कोळेकर आदींच्या पथकाने केली.

# ‘लक्ष्मी’ दर्शनासाठी गल्ली-बोळात जागरण

## अनेक प्रभागात फिल्डींगवर जोर; काही ठिकाणी वाद

इचलकरंजी,ता.१४–

**इचलकरंजी महानगरपालिकेच्या निवडणूकसाठी उद्या गुरूवार ता. १५ रोजी मतदान होणार असून मंगळवार ता. १३ रोजी सायंकाळी प्रचार थांबला. त्यानंतर अंतर्गत हालचालींना प्रचंड वेग आला. काही ठिकाणी ‘लक्ष्मी’दर्शनासाठी रात्री उशिरापर्यंत अनेक गल्ली बोळात मतदार व कार्यकर्ते जागे होते. तर काही ठिकाणी वादावादी, शाब्दिक खडाजंगीचे प्रकार घडल्याची चर्चाही होती. या सर्व प्रकारामुळे वस्त्रनगरीत राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.**



इचलकरंजी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक

इचलकरंजी महानगरपालिकेच्या पहिल्या होणाऱ्या निवडणुकीसाठी चांगलेच राजकीय वातावरण तापले आहे. गेल्या आठ-दहा दिवसापासून आरोप-प्रत्यारोपाच्या फैऱ्या, पदयात्रा, कॉर्नर सभा, महिलांचा मेळावा आदींमुळे राजकारण चांगलेच ढवळून गेले आहे. पहिल्यांदा होणाऱ्या निवडणुकीत महायुती विरुद्ध शिव-शाहू विकास आघाडी यांच्यातच दुरंगी लढत होईल असे वाटत होते. मात्र, प्रचारात जोर जसा वाढत गेला तस-तसी निवडणुकीत चांगलीच रंगत आली.

खुल्या प्रचाराची मुदत मंगळवार तारीख १३ रोजी सायंकाळी संपल्यानंतर खऱ्या अर्थाने जोडण्याला सुरूवात झाली. मतदानापूर्वी रात्र वैऱ्याची समजून उमेदवार व कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात जोरदार फिल्डिंग लावली होती.महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी झालेल्या राज्यातील नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीमध्ये अर्थकारण मोठ्या प्रमाणात झाली असल्याची चर्चा होती. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या निवडणुकीतही मतदानापूर्वी ‘लक्ष्मी’ दर्शन होईल, अशी मोठी अपेक्षा मतदारांतून होती. त्यामुळे प्रचार संपल्यानंतर रात्रीच्या सुमारास लक्ष्मी दर्शन होईल. यासाठी अनेक प्रभागातील गल्लीबोळातील मतदार व कार्यकर्ते रात्री उशिरापर्यंत जागे होते. बऱ्याच ठिकाणी लक्ष्मी दर्शन झाले असल्याची चर्चा होती. रात्रीच्या वेळी कोठेही अनुचित प्रकार अथवा आचारसंहितेचा भंग होईल अशी घटना घडू नये यासाठी पोलिस पथक मोठ्या प्रमाणात गस्तही घालताना दिसून येत होते. महानगरपालिकेसाठी प्रथमच प्रत्येक प्रभागात चार सदस्य व शेवटच्या सोळाव्या प्रभागात पाच सदस्य प्रमाणे निवडणूक होत आहे.

पहिल्या होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये काहीही करून बाजी मारायचीच असे उमेदवारांनी ठरवल्याने अनेक भागात चुरस निर्माण झाली आहे. त्यामध्ये कोण बाजी मारणार हे आता ‘मतदार राजाच ठरवणार’ आणि हे १६ तारखेला मतमोजणीनंतर दिसून येईल. एकंदरीत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वस्त्रनगरीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

# पाच पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

कोल्हापूर, ता.१४ ( प्रतिनिधी)–

**कोल्हापूर पोलीस परिक्षेत्रातील पाच पोलीस निरीक्षकांच्या विनंती व प्रशासकीय कारणास्तव बदल्या झाल्या. कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी आदेश काढले. कोल्हापूरातून एका निरीक्षकांची बदली झाली तर नवे दोन निरीक्षक मिळाले आहेत.**

बदली झालेल्या पोलीस निरीक्षकांमध्ये (कंसात सध्याचे ठिकाण) यांचा समावेश आहे. गजानन राजाराम सरगर (कोल्हापूर) सांगली, अभिजीत सुभाष देशमुख (पुणे ग्रामीण) सांगली, हेमंत गणपत शेंडगे (सोलापूर ग्रामीण) पुणे ग्रामीण, राजेंद्र सदाशिव सावंत्रे (सातारा) कोल्हापूर, सतिश हिंदूराव शिंदे (सांगली) कोल्हापूर यांचा समावेश आहे.

# गांधी कॅम्प परिसरात राडा

इचलकरंजी,ता.१४–

**पोलिसात गुन्हा दाखल**

**येथील गांधी कॅम्प परिसरात बंदी आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीर जमाव जमवून मारहाण, शिवीगाळ आणि धमकी देत सार्वजनिक शांतता भंग केल्याप्रकरणी गावभाग पोलिस ठाण्यात १० जणांसह पाच अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

गांधी कॅम्प परिसरात बुधवारी झालेल्या घटनेमध्ये एका बाजूला विश्वनाथ लोटे, अविनाश दुधाने, प्रज्वल दुधाने, प्रशांत बडवे, गजानन दळवाई सदानंद दळवाई आणि अन्य दोन जण, तर दुसऱ्या बाजूला तानाजी पोवार, शंतनु पोवार, शंकर पोवार, त्यांचा मुलगा व अन्य तीन जण असे दोन गट अमोरे समोर आले होते. एकमेकांवर ओरडत शिवीगाळ सुरू केली आणि काही वेळातच मारामारीला तोंड फुटले. बंदी आदेश झुगारून राजकीय समर्थक रस्त्यावर उतरल्याने काहीकाळ वातावरण तणावपूर्ण बनले होते. या प्रकरणी गावभाग पोलिसांत पोलिस शिपाई राम सुर्यकांत पाटील यांनी फिर्याद दिली असून, संबंधितांवर बेकायदेशीर जमाव, दंगल व आदेशभंगाचे गंभीर कलम लावण्यात आले आहेत.

# पंचगंगा वरद विनायक मंदिरात गणेश जयंतीनिमित्त कार्यक्रम

इचलकरंजी,ता.१४–

**श्री पंचगंगा वरद विनायक भक्त मंडळाच्यावतीने श्री गणेश जयंतीनिमित्त शनिवार दि. १७ ते २३ जानेवारी अखेर येथील गणेश मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.**



शनिवार ता. १७ रोजी सकाळी ८.१५ वाजता उत्सव मूर्तीचे पूजन, दिप प्रज्वलन व श्री ज्ञानेश्वरी पारायण शुभारंभ माजी नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी हस्ते व बाळासाहेब जांभळे यांच्या अध्यक्षतेखाली व द्वारकाधिश सारडा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. बुधवार ता. २१ जानेवारी पर्यंत सकाळी ८.१५ ते ११ वाजेपर्यत श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते सायं. ७ पर्यंत विविध मंडळांचे भजन कार्यक्रम, गुरूवार दि. २२ रोजी सकाळी ८.३० वाजता ‘श्रीं’ची सहस्त्रवर्तने, सकाळी १० वाजल्यापासून मारवाडी युवा मंच मिडटाऊन यांच्यावतीने आरोग्य तपसणी शिबीर, सकाळी १०.१५ वाजता ह.भ.प. सौ. विद्यागौरी महेश डिग्रजकर यांचे गणेश जन्माचे किर्तन, दुपारी १२.०५ मि. ‘श्रीं’चा जन्मकाळ व प्रसाद वाटप, सायंकाळी ६.३० वाजता दिपोत्सव तर सायंकाळी ७ वाजता महाआरती, शुक्रवार दि. २३ रोजी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तरी भाविकांनी विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष अशोक स्वामी यांनी केले आहे.

# कृष्णेत उडी घेतलेल्या विवाहितेचा शोध सुरूच

सांगली,ता.१४(प्रतिनिधी)–

**मिरज तालुक्यातील अंकली येथील कृष्णा नदीवरील पुलावरून प्राजक्ता योगेश देसाई (वय २४, रा. गावभाग, सांगली) या विवाहितेने मंगळवारी नदीत उडी घेतली. बुधवारी दुसऱ्या दिवशी सांगली ग्रामीण पोलिस व स्पेशल रेस्क्यू फोर्सच्या मदतीने नदीपात्रात तिचा शोध घेण्यात आला.परंतू सायंकाळी उशिरापर्यंत प्राजक्ता सापडली नाही.**

कृष्णा नदीपात्रात अंकली पुलावरून विवाहित महिलेने थेट पाण्यात उडी मारल्याची घटना बुधवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. काहीजणांनी हा प्रकार पाहिला. त्यामुळे पुलावर गर्दी जमली. सांगली ग्रामीण पोलिसांना हा प्रकार कळवला. ग्रामीण पोलिसांनी स्पेशल रेस्क्यू फोर्स या आपत्कालीन पथकास कळवले. त्यानुसार पथकाने नदीपात्रात उतरून शोध कार्य सुरू केले. पोलिसांच्या चौकशीत नदीत उडी टाकणाऱ्या महिलेचे नाव प्राजक्ता देसाई असे असल्याचे समजले. विवाहितेने ज्या ठिकाणी उडी मारली, त्याठिकाणी नदीत पाण्याच्या प्रवाहाला वेग असल्यामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण होत आहेत. गुरूवारी दुसऱ्या दिवशीही रेस्क्यू फोर्सने सायंकाळी उशिरापर्यंत शोधकार्य सुरू ठेवले. उद्या पुन्हा नदीपात्रात विवाहितेचा शोध घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले.


॥ जय जिजाऊ ॥ जय शिवराय ॥




मराठा मंडळ, इचलकरंजी संचलित
छत्रपती शाहू स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका
आमच्या अभ्यासिकेचा विद्यार्थी
सोहन सुरेश रावळ
यांची इंडियन आर्मीमध्ये निवड झालेबद्दल
हार्दिक अभिनंदन!
अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, मराठा मंडळ, इचलकरंजी
मराठा मंडळ, इचलकरंजी


## इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

## जाहिर आवाहन

इचलकरंजी परिसरातील आठवडी बाजारातील विक्रेते, व्यावसायिक, शेतकरी व नागरीकांना सुचित करणेत येते की, इचलकरंजी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे मतमोजणी शुक्रवार दि. १६/०१/२०२६ इ. रोजी असलेने इचलकरंजी हद्दीतील **कै. शिवाजीराव खवरे मार्केट (थोरात चौक)** येथे भरवले जाणारा आठवडा बाजार शुक्रवार दि. १६/०१/२०२६ रोजी बंद ठेवणेत येत आहे. सदरचा आठवडी बाजार शनिवार दिनांक १७/०१/२०२६ रोजी भरविणेत येत आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सही/–
उपायुक्त
निवडणूक विभाग
इचलकरंजी महानगरपालिका

**सुविचार :-** नेहमीच लहान बनून रहा प्रत्येकजण तुमच्याबरोबर बसू शकतो आणि इतके मोठे व्हा की जेव्हा आपण उठेल तेव्हा कुणीही बसलेले नसेल.

**संपादकीय**

# दुटप्पीपणाचे गौडबंगाल

चीनच्या कम्युनिस्ट पार्टीचे एक शिष्टमंडळ भारत भेटीवर आले असून त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या मुख्यालयात त्यांच्या नेत्यांशी बंद दाराआड चर्चा केली. एवढेच नव्हे तर या शिष्टमंडळाने संघाच्या मुख्यालयात जाऊन संघाचे एक ज्येष्ठ पदाधिकारी दत्तात्रय होसबाळे यांचीही भेट घेतल्याची बातमी आहे. आत्तापर्यंत भारतीय जनता पक्षाने चीनविषयी या देशातील जनतेच्या मनात टोकाची द्वेषभावना निर्माण केली. चिनीमालावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले, चीनच्या ॲपवर बंदी घातली गेली, चिनी फटाके,आकाशकंदील एवढंच नव्हे तर चिनी बनावटीच्या वस्तू खरेदी करू नका असे आवाहन केले गेले. चीन भारताचा शत्रू असून सर्व चायनीज मालावर बहिष्कार घालण्याचेही आवाहन भाजपकडून सातत्याने केले गेले. चीनच्या काही कंपन्यांकडून आर्थिक मदत घेतल्याच्या कारणाने भारतातील काही संस्थांवर कारवाईसुद्धा केली गेली. त्यातील काही जणांना चक्क अटकही केली गेली. या सगळ्या पार्श्वभूमीवर भारत भेटीवर आलेल्या चिनी शिष्टमंडळाच्या संघ आणि भाजप नेत्यांशी बंद दाराआड झालेल्या चर्चांविषयी कमालीचे औत्सुक्य निर्माण झाले आहे. जेव्हा चीन विरोधात वातावरण तापवण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे नेते देशभर प्रचंड द्वेष पसरवण्याचे काम करत होते त्यावेळी चिनी शिष्टमंडळाबरोबर काँग्रेसने पूर्वी केलेल्या एका चर्चेचे फोटो सोशल मीडियावर प्रसारित करून 'बॉयकॉट काँग्रेस' हा ट्रेंड भाजप समर्थकांनी सोशल मीडियावर जोरात चालवला होता. ही सगळी पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर चीनच्या सत्ताधारी कम्युनिस्ट पार्टीचे शिष्टमंडळ आता दिल्लीत नेमके काय करीत आहे हा प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे. त्यानुसार काँग्रेसने दिल्लीत एक पत्रकार परिषद घेऊन सरकार, संघ आणि भाजप यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली आहे. एखाद्या देशाच्या राजकीय पक्षाशी किंवा त्यांच्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चा करणे लोकशाही प्रक्रियेत किंवा एकूणच विदेशी नीतीमध्ये गैर मानले जात नाही. पण जेव्हा भाजपचे लोकच चीनच्या बाबतीत ही बाब गैर मानत होते तेव्हा आता सुरू असलेली ही चर्चेची प्रक्रिया कोणत्या नैतिकतेत बसते हा प्रश्नही या अनुषंगाने उपस्थित होतो. चीनने भारताच्या विरोधात उभा दावा मांडला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी चीनने पाकिस्तानला मदत केली ही बाब लष्करी अधिकाऱ्यांनीच पत्रकार परिषद घेऊन उघड केली होती. एवढेच नव्हे तर चीनने लडाख आणि अरुणाचल प्रदेशच्या भूमीवर अतिक्रमण करून भारतीय भूभागावर कब्जा केल्याची बाबही जगापुढे आली आहे. गलवानमध्ये चीनने आक्रमण करून तेथे जी धुमश्चक्री चालवली त्यात भारताचे २० शूर जवान शहीद झाले. हे सगळे मुद्दे आपल्यापुढे असताना भारत सरकार चीनच्या विरोधात आक्रमक भूमिका का घेत नाही असे प्रश्नही उपस्थित झाले. या चिनी आक्रमणाच्या संबंधात संसदेत विस्तृत चर्चा घ्यायला अनुमती द्यावी अशी मागणी विरोधी पक्षांच्या वतीने सातत्याने केली गेली. परंतु आजपर्यंत एकदाही तशा चर्चेला अनुमती दिली गेली नाही, एवढेच नव्हे तर चीनने भारताच्या विरोधात वेळोवेळी जी आगळीक केली त्यासंदर्भात भारत सरकारने कधीच विरोधातली ठाम भूमिका घेतलेली दिसत नाही. या पार्श्वभूमीवर मग आता भारत सरकारने चीनच्या शिष्टमंडळाला का पायघड्या घातल्या आहेत हा प्रश्न अनाठायी ठरत नाही. चीनच्या बाबतीतली मोदी सरकारची ही धरसोडीची भूमिका अचंबित करणारी आहे. मुळात सरकारला काही निश्चित असे विदेश धोरण आहे की नाही असा प्रश्नच या निमित्ताने उपस्थित होतो. चीन विरोधात गेले की अमेरिकेच्या कच्छपी लागायचे आणि अमेरिकेने आगाऊपणा सुरू केला की पुन्हा चीनशी मिळतेजुळते घ्यायचे असे हे एकूणात धोरण दिसते.केवळ देशाची गरज म्हणून पुन्हा चीनच्या गुंतवणुकीला वाव देणार असाल किंवा पुन्हा त्यांच्याशीच मिळते जुळते घेण्याचा प्रयत्न करीत असाल तर जनतेलाही ते आवडणार नाही. त्यामुळे कुठल्याही एका विषयावर टोकाची भूमिका घेताना हीच भूमिका पुढे आपल्याला अडचणीची ठरू शकते याचा धडा मोदी सरकारने घ्यायला हवा. त्यामुळे कोणत्याही बाबतीत टोकाची भूमिका घेताना अडचणीची स्थिती निर्माण होणार नाही ना याची काळजी सरकारने घ्यायला हवी, पण सरकारकडून सातत्याने अशा गंभीर मुद्द्यांवर धरसोडीचीच भूमिका पाहायला मिळाली आहे. चीनने व्यापाराच्या बाबतीत आपली अनेक ठिकाणी कोंडी केली. त्या संदर्भातही भारत सरकारला पद्धतशीर व्यूव्हरचना करून देशहित जपायला अपयश आले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे शिष्टमंडळ भारताच्या दौऱ्यावर आले असेल तर त्या संदर्भात भारताने चीन संदर्भातली आपली पूर्वीची भूमिका बदलली आहे काय हे स्पष्ट होणेही गरजेचे आहे.

# 'प्रगती'ला वेग ; पण...

**भारताच्या विकास प्रवासात पायाभूत सुविधांची निर्मिती हा कणा मानला जातो परंतु या क्षेत्रातील प्रकल्पांना लागणारा विलंब ही दशकांपासूनची एक मोठी समस्या राहिली आहे. केंद्र सरकारने २०१५ मध्ये प्रो ॲक्टिव्ह गव्हर्नन्स अँड टाइमली इम्प्लिमेंटेशन म्हणजेच प्रगती व्यासपीठ कार्यान्वित केले ज्याचा मुख्य उद्देश रखडलेल्या प्रकल्पांना डिजिटल माध्यमातून गती देणे हा होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या आढावा बैठकीत या प्रणालीने गेल्या नऊ वर्षांत केलेल्या कामगिरीचा लेखाजोखा मांडण्यात आला.**

या काळात प्रगती व्यासपीठाने सुमारे ८५ लाख कोटी रुपये मूल्याच्या ३,३०० हून अधिक प्रकल्पांमधील अडथळे दूर करून त्यांना प्रत्यक्ष कार्यवाहीच्या दिशेने नेले आहे. ही आकडेवारी जितकी आश्वासक आहे तितकीच ती या क्षेत्रातील गुंतागुंत आणि आर्थिक जोखमीची जाणीव करून देणारी आहे. सार्वजनिक अधोसंरचना प्रकल्पांमधील विलंब हा केवळ तांत्रिक मुद्दा नसून तो देशाच्या जीडीपी म्हणजेच स्थूल देशांतर्गत उत्पादनावर थेट परिणाम करणारा घटक आहे. जेव्हा एखादा महामार्ग रेल्वे मार्ग किंवा ऊर्जा प्रकल्प ठरलेल्या वेळेत पूर्ण होत नाही तेव्हा त्याचा परिणाम केवळ त्या प्रकल्पाच्या खर्चावर होत नाही तर त्यातून मिळणारे आर्थिक लाभही लांबणीवर पडतात.



सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने नोव्हेंबर २०२५ मध्ये सादर केलेली आकडेवारी या विलंबाच्या भयावहतेवर प्रकाश टाकते. केंद्र सरकार पुरस्कृत प्रकल्पांची खर्च मर्यादा आता मूळ अंदाजापेक्षा २२.२ टक्क्यांनी वाढली आहे. ही वाढ केवळ टक्केवारीत नसून प्रत्यक्ष रक्कमेचा विचार केल्यास सुमारे २९.५५ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा सरकारी तिजोरीवर पडला आहे. विशेषत: सध्या सुरू असलेल्या ८२३ मोठ्या प्रकल्पांमध्ये मूळ तरतुदीपेक्षा ५.३७ लाख कोटी रुपये अधिक खर्च झाले आहेत. हा अतिरिक्त व्यय म्हणजे केवळ आकड्यांची जुळवाजुळव नसून त्यातून देशाचे मौल्यवान सार्वजनिक भांडवल एकाच ठिकाणी अडकून पडते. जर हे प्रकल्प वेळेत पूर्ण झाले असते तर तो पैसा अन्य विकासकामांसाठी किंवा सामाजिक योजनांसाठी वापरता आला असता. प्रकल्पांना विलंब झाल्यामुळे सरकारला वारंवार कर्ज घ्यावे लागते आणि त्यावर द्यावे लागणारे व्याज प्रकल्पाची एकूण किंमत आणखी वाढवते. अशाप्रकारे विलंब हा अर्थव्यवस्थेच्या गतीला खीळ घालतो. प्रकल्पांच्या विलंबामागील कारणांचा विचार केल्यास त्यात संरचनात्मक त्रुटी प्रामुख्याने दिसून येतात. उपलब्ध आकडेवारीनुसार सुमारे ३५ टक्के प्रकल्पांना केवळ भूसंपादनामुळे विलंब होतो. जमिनीचे संपादन करताना येणारे कायदेशीर अडथळे स्थानिक रहिवाशांचा विरोध आणि मोबदल्यावरून होणारे वाद हे प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच मोठा काळ खातात. यानंतर सुमारे २० टक्के विलंब हा पर्यावरण विषयक परवानग्या न मिळाल्याने होतो.भारतासारख्या देशात विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे आवश्यक असले तरी परवानग्यांची प्रक्रिया क्लिष्ट असल्याने अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प वर्षानुवर्षे कागदावरच राहतात. या व्यतिरिक्त जमिनीचे हक्क सिद्ध करणे, वीज आणि पाणी यांसारख्या सार्वजनिक सुविधांचे स्थलांतर करणे आणि विविध मंत्रालयांमध्ये असलेला समन्वयाचा अभाव यामुळे समस्या अधिक जटील बनते. अनेकदा केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील संवादहीनता किंवा नियमावलीतील भिन्नता यामुळे राष्ट्रीय महत्त्वाची कामे रखडतात. या पार्श्वभूमीवर प्रगती व्यासपीठाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून एक नवीन आदर्श घालून दिला आहे. हे व्यासपीठ रिअल टाइम डेटा किंवा प्रत्यक्ष वेळेतील आकडेवारी ड्रोनद्वारे केलेली पाहणी आणि थेट व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यांचा मेळ घालते. पंतप्रधानांच्या थेट देखरेखीखाली चालणाऱ्या या बैठकांमध्ये राज्यांचे मुख्य सचिव आणि केंद्राचे सचिव एकाच वेळी उपस्थित असतात ज्यामुळे फाईल्स एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर जाण्यात होणारा वेळ वाचतो. या प्रणालीची ताकद ही केवळ देखरेखीपुरती मर्यादित नसून ती समस्या निवारणाकडे झुकलेली आहे. 'प्रगती' प्रणालीने इतर डिजिटल व्यासपीठांना स्वत:शी जोडून घेतले आहे. उदाहरणादाखल पीएम गतिशक्ती या उपक्रमामुळे प्रकल्पाच्या नियोजनातच स्पष्टता आली आहे. तर परिवेश या पोर्टलमुळे पर्यावरण विषयक मंजुरीची प्रक्रिया पारदर्शक आणि जलद झाली आहे. ही एकात्मिक प्रणाली कागदपत्रांच्या जंजाळातून बाहेर पडून कामाला प्रत्यक्ष गती देणारी ठरली आहे. परंतु केवळ डिजिटल मॉनिटरिंग किंवा देखरेख करून सर्व प्रश्न सुटतील असे समजणे चुकीचे ठरेल. प्रकल्पांच्या खर्चात होणारी सततची वाढ हे निदर्शक आहे की केवळ देखरेख पुरेशी नाही तर मूळ व्यवस्थेतच बदल करण्याची गरज आहे. या आढावा बैठकांचे रूपांतर एका भक्कम संस्थात्मक प्रक्रियेत व्हावे. यासाठी जिल्हा आणि विभाग स्तरावर डिजिटल क्षमता वाढवणे आवश्यक आहे जेणेकरून स्थानिक पातळीवरील अडथळे तिथेच सुटतील. अनेकदा केंद्रातून घेतलेले निर्णय खालच्या स्तरावर अंमलबजावणी करताना अडकतात. त्यासाठी राज्यांची मालकी आणि जबाबदारी वाढवणे गरजेचे आहे. मंजुरी घेताना एक विशिष्ट क्रम ठरवणे आवश्यक आहे जेणेकरून प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच सर्व तांत्रिक आणि पर्यावरणीय परवानग्या हातात असतील. यामुळे प्रत्यक्ष बांधकाम सुरू झाल्यावर कामात खंड पडणार नाही.

**दैनंदिनी**

# श्वानापासून मुक्तीचा स्तुत्य निर्णय

**मानवी प्राण्याला आणि त्याच्या लहान मुलाबाळांना सातत्याने त्रास देणारा नवा प्राणी म्हणून कुत्र्याकडे पहावे लागेल. भटकी कुत्री, पिसाळलेली कुत्री आणि घाणेरडी कुत्री यामुळे संपूर्ण शहरी आणि ग्रामीण भागातील माणूस हा कंटाळून गेला आहे. अलीकडे कुत्र्यांची संख्या फार वाढली आहे. एकावेळी कुत्र्याची मादी सात ते आठ पिलांना जन्म देते, ही संख्या शासन कोठे आवरणार आहे आणि त्यामुळे माणसांना त्याचा फार त्रास होतो. ही संख्या इतकी वाढली आहे की, लहान मुलांना लचके तोडून खाण्यापर्यंत या भटक्या कुत्र्यांचा प्रकार गेला आहे.**



या कुत्र्यांना सध्या खाण्याची काही पंचायत नाही, जागोजागी, ठिकठिकाणी चिकन ६५ च्या गाड्या आहेत, माणसे हे चिकन ६५ खातात आणि तुकडे रस्त्याला टाकतात, या तुकड्यावर येथेच्छ ताव मारण्यासाठी ही भटकी कुत्री हजर असतात. प्रत्येक कॉर्नरच्या गाड्यावर आठ ते दहा कुत्री असतात, या गाड्यापासून ती हालत नाहीत, ही चिकन ६५ खाणारी मंडळी संध्याकाळी जरा तालातच असतात, त्यांना तुकडाही नीट टाकता येत नाही पण ते खाल्लेले खरकटे कसेतरी टाकत असतात आणि या रानटी कुत्र्यांना हे एक नवे खाद्य सुरु झाले. त्याचा परिणाम दिवसभर ही कुत्री कामावर जाणाऱ्या माणसाच्या मागे लागू लागली.

अनेक नागरिकांनी नगरपालिकेकडे, ग्रामपंचायतीकडे, कार्पोरेशनकडे या कुत्र्यांच्या त्रासासाठी अर्ज केले पण त्याकडे लक्ष देण्यास कोण तयार नाही. कारण शासनाची भुतदया एक केंद्रीय मंत्रीच या मागणीच्या पाठिशी आणि त्यामुळे शासकीय यंत्रणा लक्षच देत नव्हती. आता एक चांगले झाले या संबंधी सुप्रिम कोर्टानेच निर्णय दिला आणि या कुत्र्यांना शाळा, न्यायालये, दवाखाने, सार्वजनिक ठिकाण यापासून बाजूला ठेवण्यास सांगितले. या ठिकाणी दहशत चालणार नाही असा सज्जड दम दिला आणि हा दम देत असताना जर कोण आदेश पाळला नाही तर त्या राज्यावर कडक कारवाई करण्याची सक्त दहशत न्यायालयाने दाखवून दिली. हे करणे गरजेचे होते, अनेक ठिकाणी लहान मुले बाहेर पडत नव्हती, शाळेला जाणे मुश्किल होते, गल्लीच्या कॉर्नरला, रस्त्याच्या मध्यावर पाच सहा कुत्र्यांच्या टोळ्या या सहज फिरत असतात. आणि मग एखादे मूल खेळत खेळत त्या ठिकाणी आले तर त्याच्यावर ते हल्ला करत असतात. हे फार धोकादायक होते आणि म्हणूनच याच्यावर जी मंडळी कोर्टात गेली त्यांचे अभिनंदन करणे गरजेचे आहे आणि न्यायालयानेसुद्धा दिलेला निकाल अभ्यासपूर्ण दिलेला आहे. न्यायमूर्ती विक्रमनाथ, संदिप मेहता आणि एन.व्ही.अंगरीया यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे, पूर्ण खंडपीठ बसलेले होते.

त्यांनी सांगितले आहे की,सगळे रस्तेसुद्धा भटक्या कुत्र्यापासून मुक्त असले पाहिजेत. टोळ्या टोळ्या असलेली ही जमात दिसता कामा नये, अधिकारी वर्गाने नागरी हिताची कामे करणे गरजेचे आहे, मनापासून त्यांनी ही कामे केली पाहिजेत. न्यायमूर्तींनी याबाबतीत मानवी जीवनाला फार मोठे सहाय्य केले आहे. निरनिराळ्या ठिकाणच्या तक्रारीचा अभ्यास त्यांनी बारकाईने केला आहे. आणि त्यातूनच या निष्कर्षापर्यंत आले आहेत. सामान्य माणसाला आता न्यायालयाशिवाय गत्यंतर नाही हे पक्के झाल्यावरच मध्यमवर्गीय माणूस न्यायालयात दाखल झाला आणि तिन्ही न्यायमूर्तींनी योग्य तो निर्णय घेतला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**शामराव कुलकर्णी**



तब्बल आठ वर्षानंतर महानगरपालिकेच्या निवडणुका होत असल्याने यंदा राजकीय पक्षांची नेतेमंडळी, कार्यकर्ते यांसह सामान्य नागरिकांमध्ये ही उत्साहाचे वातावरण दिसून आले. मतदारांना आकृष्ट करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने आपल्या मतदार क्षेत्रातील गल्ली-बोळ पिंजून काढला आहे. नानाविध आश्वासने दिली आहेत,आजतागायत झालेल्या प्रचाराच्या व्याप्तीवरून पक्षाच्या प्रमुख मंडळींनी यश-अपयशाची गणिते मांडण्यासही सुरुवात केली आहे.

# मतदान करू चला

यंदा पक्ष आणि उमेदवार यांच्याकडून प्रचारासाठी जीवाचे रान केले गेले असले, तरी मतदान करण्यासाठी मतदार किती प्रमाणात घराबाहेर पडतात यावरून पक्षांचे आणि उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. महापालिका क्षेत्रातील समस्त सरकारी यंत्रणांनी मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. विविध माध्यमांतून जागृतीही केली आहे. शहरे दाट लोकवस्तीची असल्याने या ठिकाणी उभारण्यात येणारी मतदान केंद्रे नागरिकांच्या घरापासून जेमतेम एक किलोमीटरच्या अंतरात असतात. तरीही अनेक नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडण्यास, मतदानासाठी रांग लावण्यास इच्छुक नसतात हे आजतागायतचे निरीक्षण आहे. असे असले तरी काही गोष्टींचे कौतुकही वाटते. वयाची नव्वदी-शंभरी गाठलेले ज्येष्ठ नागरिक मतदानासाठी बाहेर पडतात, अधू, अपंग नागरिक इतरांच्या सहाय्याने उत्साहाने मतदान करताना प्रत्येक वेळेस दिसून येतात, नोकरी व्यवसायानिमित्त देशाबाहेर गेलेले काही नागरिक केवळ मतदान करण्यासाठी हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात येतात. या सर्वांचा उत्साह पाहिल्यावर जे नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडत नाहीत, मतदानानिमित्त मिळालेल्या सुट्टीचा उपयोग मौजमजा करण्यासाठी आणि सहलीला जाण्यासाठी करतात त्यांची लोकशाही उपभोगण्याचीच पात्रता नाही असे वाटते. नगरसेवक हा सामान्य नागरिकाचा सर्वात जवळचा लोकप्रतिनिधी असतो. आपल्या प्रभागातील नागरिकांना अनेकदा तो वैयक्तिकरित्या ओळखत असतो. आपल्या परिसरातील लहान सहान समस्या घेऊन त्याच्याकडे जाता येते. त्याचे साहाय्य घेता येते त्यामुळे हा लोकप्रतिनिधी निवडण्यात आपल्या प्रत्येकाचा सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. नगरसेवक निवडताना सध्या वारे कोणत्या पक्षाचे आहे, महापालिकेवर कोणत्या पक्षाची सत्ता असायला हवी या गोष्टी बाजूला ठेवून आपल्या प्रभागाच्या समस्या सोडवण्यास कोणता उमेदवार सक्षम आहे, स्वहितापेक्षा जनहिताला प्राधान्य देणारा उमेदवार कोणता आहे, नागरिकांच्या अडीअडचणींना उद्या कोण धावून येऊ शकतो या गोष्टी लक्षात घेऊन मतदान करायला हवे. मतदान म्हणजे कोण्या राजकीय नेत्यावर किंवा पक्षावर उपकार करणे नव्हे, तर आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधेसाठी योग्य लोकप्रतिनिधींची निवड करणे ही भावना लोकांमध्ये केव्हा जागृत होणार ? आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या भवितव्यासाठी आपले एक मतही बहुमोल कामगिरी करणारे ठरणार आहे त्यामुळे निरुत्साह झटकून मतदान करण्यासाठी घराबाहेर पडूया !

**जगन घाणेकर**

## वाचकांचा पत्रव्यवहार

### बँकांमधील बचत ठेवींमध्ये घट

बँकांमध्ये ठेवी ठेवण्याचे लोकांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते त्याच ठेवींसाठी म्युच्युअल फंड आणि शेअर बाजारातील गुंतवणुक वाढली आहे. सन २०१६- १७ मध्ये घरगुती वित्तीय संसाधनांच्या ६० टक्के रक्कम जी बँकांमध्ये ठेवली जात असे तिचे प्रमाण आता ३६ टक्क्यांवर घसरले आहे.त्याचवेळी म्युच्युअल फंड आणि इक्विटी शेअर्समधील गुंतवणूक सुमारे ४ ते ५ पट वाढल्याने कंपन्यांना त्यांच्या व्यवसायासाठी वाढत्या दराने वेगळे कर्ज काढण्याची आवश्यकता भासत नाही. लोकांनी बँकांबाहेर गुंतविण्यास सुरुवात केल्याने बँकांचे कर्ज आणि गुंतवणूक जवळपास समान पातळीवर आले आहे. बँकांमध्ये केलेल्या गुंतवणुकीवर आयकराच्या स्लॅब्सप्रमाणे कर भरणे व्यवहार्य ठरते. बदलत्या कर पद्धतीने बँकांमधील बचतीऐवजी लोकं जास्त उत्पन्न देणाऱ्या ठिकाणी गुंतवितात त्यामुळे बँकांमधील बचत कमी होऊ लागली आहे. याकरिता ज्या प्रकारे गुंतवणुकीसाठी हे धोरण आखले जातेय त्यांनी बँकांवरील व्याजदर करमुक्त केल्यास बँकांमधील बचत ठेवी वाढतील, बँकांना अधिक कर्ज देणे शक्य होईल बँकांची कर्ज देण्याची क्षमता वाढून उद्योगधंदे, व्यावसायिकांना कर्ज देणे बँकांना सोयीचे होईल. लोकांच्या बचतीवर व्याज जास्त दराने मिळत गेल्यास लोकांदेखील गुंतवणुकीत अधिक जोखीम पत्करावी लागणार नाही. याकरिता व्याजदर काही प्रमाणात मर्यादित ठेवण्याची गरज भासत असते. स्थिर दरात लोकांचे बचतीचे आणि कर्ज घेणाऱ्यांचे कर्ज स्थिर राहून आर्थिक व्यवस्था काही काळ स्थिरावस्थेत सुरू राहू शकतील.



**स्नेहा राज**

### हळदी-कुंकू इव्हेंट मधून संस्कृती, परंपरा आणि पावित्र्य जपणे गरजेचे


आपल्या भारतीय संस्कृतीत आजही हळदी-कुंकू कार्यक्रमाला मानाचे स्थान आहे पण गेल्या काही दिवसांपासून याला राजकीय वळण लागल्याचे दिसून येत आहे आजच्या महिला पुरुषांच्या बरोबरीने, खांद्याला-खांदा लावून सर्वच क्षेत्रांत वावरत आहेत हि स्वागतार्ह बाब आहे सद्या समाजामध्ये हळदी कुंकूची क्रेझ वाढत असून सोबत सांस्कृतिक आणि विविध स्पर्धांचे आयोजन केल्याने महिलांच्या कलागुणांना वाव मिळत आहे.

पूर्वी मकर संक्रातीपासून ते रथ सप्तमीपर्यंत हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जायचे. यामागे एकच उद्देश असायचा स्नेह वृद्धिंगत व्हावा, या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व महिला एकत्रित येवून हा इव्हेंट मोठ्या उत्साहाने साजरा करावा, महिलांना आनंद द्विगुणित करता यावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध होवून प्रोत्साहन मिळावे मात्र कालांतराने या कार्यक्रमाचे स्वरुप बदलून नवरात्र असो अथवा धार्मिक कार्यक्रम किंवा छोट्या - छोट्या कार्यक्रमात देखील अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जात असल्याने याला बाजारीकरणाचे स्वरुप प्राप्त झाल्याचे वास्तव नाकारता येत नाही अनेक राजकारणी लोक हाच मोका साधून आपल्या राजकीय कारकिर्दीसाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करुन फायदा घेत आहेत.

हळदी- कुंकूच्या नावाखाली महिलांना आकर्षक आणि किंमती वस्तू भेट म्हणून दिल्या जातात. एरव्ही या महिलांना कोणीही विचारत नाही, हेही तितकेच खरे आहे. मात्र भारत सरकारने महिलांची उन्नती व्हावी या उद्देशाने महिला बचत गटांना प्रोत्साहन दिले आहे.सध्या या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात हळदी - कुंकू कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महिला बचत गटांचाही वापर मोठ्या प्रमाणात राजकीय नेते करुन घेत आहेत. अशा प्रकारामुळे काहींची राजकीय गणिते बिघडली आहेत तर काहीजणांची सुधारली आहेत. त्यामुळे इव्हेंट जरुर असावा मात्र आपल्या भारतीय संस्कृतीचे जतन करुन सद्या होत असलेल्या बाजारीकरणाला थांबवून सणांचे पावित्र्य जपले पाहिजे तरचं हळदी- कुंकू कार्यक्रमाचा उद्देश सफल होईल !

**राजू जाधव**,मांगूर

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**गुरुवार,ता.१५.१.२०२६**, विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे उत्तरायणे, हेमंत ऋतो, पौष मासे,कृष्ण पक्षे,द्वादशी तिथी, २०.१७ नंतर त्रयोदशी तिथी,ज्येष्ठा नक्षत्र, २९.४८ नंतर मूळ नक्षत्र, वृश्चिक रास २९.४८ नंतर धनु रास, वृद्धीयोग २०.३८ नंतर ध्रुव योग,तैतिल करण२०.१७ नंतर गरज करण,दिनमान ११.०६,सुर्योदय ७.०९,सुर्यास्त १८.१५ (कोल्हापूरचे) राहू काळ दुपारी १.३० ते ३, किंक्रांत करि दिन,मंगळ मकर राशीत २८.२८ वाजता

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष**-अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल. कुटुंबातील सदस्यांची मदत तुमच्या गरजा पूर्ण करण्याची काळजी घेतील. गुंतवणूक लाभदायक असेल, पण आपल्या भागीदाराकडून काहीसा विरोध होण्याची शक्यता आहे.

**वृषभ**-मौजमजा करण्यासाठी बाहेरगावी जाऊन आनंद लुटाल, मजा कराल. तुमचा कुणी जुना मित्र आज व्यवसायात नफा मिळवण्यासाठी तुम्हाला सल्ला देऊ शकतो जर तुम्ही हा सल्ला अंमलात आणला तर, तुम्हाला धन लाभ होईल.

**मिथून**-तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. तुमच्याजवळील अतिरिक्त पैसा सुरक्षित स्थळी ठेवा.

**कर्क**-घरगुती वस्तुंची बेफिकीरपणे हाताळणी करणे तुम्हाला अडचणीत टाकू शकते. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**सिंह**-घरातील दुरुस्तीची कामे तुम्हाला व्यस्त ठेवतील. आज तुम्ही दिलेल्या कामाला ठरलेल्या वेळेच्या आधीच पूर्ण करू शकता.गृहोपयोगी वस्तूंची खरेदी कराल.

**कन्या**- स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल. नव्या संकल्पना फलप्रद ठरतील. मुलांच्या तक्रारीने त्रासून जाल.आजचा दिवस कामात जाईल.

**तुळ**-तुम्ही तुमच्या खास पद्धतीने लोकांना हाताळलेत आणि तुमची बुद्धिमत्ता वापरलीत तर लोकांना समजावण्यात, पटविण्यात तुम्ही यशस्वी होऊ शकाल.

**वृश्चिक** -आज तुम्हाला अनेक तणावांचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे आणि मतभेद झाल्यामुळे तुम्ही त्रासून जाल, आर्थिक टंचाई भासेल.

**धनु**-तुमच्यासमोर सादर झालेल्या गुंतवणूक योजनांचा नीटपणे विचार करायला हवा. कामानिमित्त खाजगी कार्यक्रमांना जाण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.

**मकर**-प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. पारंपरिक पद्धतीची गुंतवणूक कराल तर तुम्हाला त्यातून चांगली धनप्राप्ती होईल. नवे नातेसंबंध दीर्घकाळ टिकणारे आणि लाभ मिळवून देतील.

**कुंभ**-तुम्हाला अपेक्षित असलेली कौतुकाची थाप, मान्यता आणि पारितोषिके मिळण्याचा प्रसंग पुढे ढकलण्यात आल्याने तुम्ही निराश व्हाल.

**मीन**-तुमची प्रचंड बौद्धिक क्षमता तुम्हाला दुबळेपणाशी, अपंगत्वाशी सामना करण्यास मदतगार ठरू शकेल. पैशावरुन वाद होईल. अत्यंत सावधगिरीने वागा.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# काडापूरच्या कार्यक्षेत्रात १२ कोटींची कामे

## आम.प्रकाश हुक्केरी यांची माहिती

चिकोडी,ता.१४(वार्ताहर)-

**काडापूर गावच्या कार्यक्षेत्रात माझ्या तसेच स्थानिक आमदार गणेश हुक्केरी यांच्या प्रयत्नांतून १२ कोटींची कामे प्रगतीपथावर आहेत, अशी माहिती विधान परिषद सदस्य व राज्य सरकारचे दिल्ली विशेष प्रतिनिधी प्रकाश हुक्केरी यांनी दिली.काडापूर येथे स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय प्राथमिक ग्रामीण कृषी सहकारी संस्थेच्या इमारतीचे उद्घाटन करून ते बोलत होते.**



काडापूर : येथे विधान परिषद सदस्य व राज्य सरकारचे दिल्ली विशेष प्रतिनिधी प्रकाश हुक्केरी यांचा सत्कार करताना प्रकाश राचण्णवर, महांतेश पाटील व इतर प्रमुख मान्यवर.

श्री. हुक्केरी म्हणाले, बहुउद्देशीय प्राथमिक ग्रामीण कृषी सहकारी संस्थांच्या इमारतींच्या बांधकामासाठी ३६.१० लाख रुपयांचा निधी मंजूर असून, ही बांधकामे पूर्ण झाली आहेत. बसवेश्वर प्राथमिक कृषी संस्थेच्या इमारतीसाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन बांधकाम पूर्ण झाले आहे. याशिवाय विविध रस्ते व गटार कामांसाठी ८० लाख निधी मंजूर केला आहे. ग्रामपंचायतीमार्फत हनुमान मंदिर ते अंकली रस्त्यापर्यंत रस्ता रुंदीकरण व पथदिवे बसविण्यासाठी १ कोटी ५० लाख मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे. केदारेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी यापूर्वी १५ लाख रुपये आणि सध्या ७ लाख रुपये असे एकूण २२ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. अमोघसिद्धेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी यापूर्वी १० लाख रुपये व सध्या १० लाख असा २० लाख निधी मंजूर आहे.

भूमिगत केबल व विद्युत पथदिवे बसविण्यासाठी यापूर्वी २ कोटी २९ लाखाचा निधी देऊन काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी ५३.८० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. काडापूर गाव ते सीमालक्ष्मी मंदिर ते अंकली गावातील संशोधन केंद्रापर्यंत रस्ता सुधारण्यासाठी २ कोटी ५० लाखाचा निधी मंजूर झाला असून डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. काडापूर अंकली रस्त्यापासून सनदी मळा मार्गे सिध्दापूरवाडीपर्यंत तसेच जक्कव्वा मंदिर मार्गे रायण्णावर यांच्या शेतापर्यंत १ कोटी रुपयांच्या निधीतून डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

बसवण्णा मंदिर ते केरूर गावातील घूळिगुडीपर्यंत रस्ता सुधारण्यासाठी १ कोटी निधी मंजूर झाला आहे.सिध्दापूरवाडी बसस्थानक (बंकापूरे बेकरी) येथून काडापूर माने, शितोळे, शिंदे मळा मार्गे काडापूरअंकली रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यासाठी १ कोटी ५० लाख निधी मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे. गावात ७ लाख रुपयांच्या निधीतून बस शेल्टरचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.याप्रसंगी स्वामी विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष प्रकाश राचण्णवर, महांतेश पाटील, शिवाजी शिंदे, भरत कोळेकर, अप्पू सनदी, रवी ठुबाके, सुभाष सनदी व नागरिक उपस्थित होते.

## अकोळात बाळूमामांच्या बकऱ्यांचे आगमन

अकोळ,ता.१४(वार्ताहर)-

**आदमापुर येथील श्री सदगुरू बाळूमामा यांच्या बकऱ्यांचे अकोळनगरीत आगमन झाले. येथील आझाद गल्लीत असणाऱ्या संत बाळूमामा यांच्या जन्मघरी बग्गा क्र.६ मधील बकऱ्यांची भेट झाली.बाळूमामा जन्म घराचे पुजारी संतोष माने, विनायक माने यांनी आपल्या भागात बाळुमामांची बकरी आल्यावर बाळूमामांच्या जन्म घरी भेट व्हावी यासाठी प्रयत्नशील होते.**

बकऱ्यांचे आगमन झाल्यानंतर स्त्रियांनी बकऱ्यांवर फुलांची पुष्पवृष्टी करून बकरी बाळुमामांच्या घरी नेण्यात आली. त्यानंतर बाळूमामांची आरती करून एक तास बकरी दर्शनासाठी ठेवण्यात आली होती.बाळुमामांची बकरी पाहण्यासाठी महिलांसह, भक्तगण उपस्थित होते. याप्रसंगी चंद्रकांत खुरपे, युवराज बाचणकर, सागर परीट, लक्ष्मण टाकळे, गोटू भोपळे, हेमंत पाटील, अभी चव्हाण, राहुल मोहिते, ओंकार पानारी, राहुल दळवी उपस्थित होते.

# वाघापूरच्या विकासासाठी भरघोस निधी देऊ

## नाथाजी पाटील

कुर,ता.१४(वार्ताहर)-

**वाघापूर हे केदारलिंग देवस्थान मुळे महाराष्ट्र, कर्नाटक राज्यात प्रसिद्ध आहे.या गावच्या विकासासाठी महायुतीच्या सरकार कडून भरघोस निधी उपलब्ध करून देऊ,असे प्रतिपादन भाजपचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील यांनी केले.**



वाघापूर येथे विकासकामांच्या शुभारंभ प्रसंगी नाथाजी पाटील, बापूसो आरडे, वसंत प्रभावळे, संतोष पाटील व अन्य मान्यवर.

वाघापूर (ता.भुदरगड) येथे सह पालकमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या निधीतून दत्त मंदिर परिसरातील रस्ता व आरोग्य उपकेंद्र येथील देखभाल दुरुस्ती कामाच्या तसेच खास.धनंजय महाडिक यांच्या निधीतून मंजूर झालेल्या हाय मॅक्स पथदिवे उभारणी कामाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी सरपंच बापूसो आरडे हे होते. श्री.पाटील पुढे म्हणाले, वाघापूर हे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या अतिशय सक्षम असे गाव आहे. या गावातील सामाजिक एकोपा निश्चितच कौतुकास्पद आहे. या गावातील धार्मिक कार्यक्रमांना नेहमीच लोकांची मोलाची मदत मिळत असते त्यामुळे या गावच्या विकासासाठी विविध फंडातून निधी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी सह पालकमंत्री माधुरीताई मिसाळ व खास.धनंजय महाडिक यांच्या निधीतून,उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सहकार्यातून होत असलेल्या हाय मॅक्स पथदिवे कामाचा व दत्त मंदिर परिसर रस्त्याचा व आरोग्य उपकेंद्र देखभाल दुरुस्ती कामाचा शुभारंभ झाला.यावेळी अलकेश कांदळकर, वसंत प्रभावळे,बापूसो आरडे, भगवान शिंदे, संतोष पाटील, पांडुरंग वायदंडे, संजय भोसले, पंडित पाटील, वीरकुमार पाटील, मोहन सूर्यवंशी, बाळासाहेब शिंदे, मुकुंद कांबळे,दिलीप कुरडे, शिवाजी गुरव, किरण कुरडे, राजू अत्तार, मारुती गुरव, संजय जठार, दौलती परीट, यशवंत परीट, संग्राम परीट, दिपक परीट, सौरभ परीट, बी.एस.जठार,अनिल एकल, मारुती कामीरकर, विजय जठार व ग्रामस्थ उपस्थित होते. मारुती बरकाळे, संतोष बरकाळे यांनी नियोजन केले.

# पालकांनी मुलांच्यावर अपेक्षांचे ओझे ठेवू नये

## सागर माने

निपाणी,ता.१४(वार्ताहर)-

**हसत खेळत मिळणारे शिक्षण महत्वाचे आहे. मात्र सध्या विद्यार्थ्यांकडून पालकांच्या अपेक्षा वाढत आहेत. त्यांच्या बालमनाचा विचार केला जात नाही. त्यामुळे शिक्षणाचे दडपण विद्यार्थ्यांच्या बाल मनावर पडत असल्याचे प्रतिपादन रयत गुरूकुल पब्लिक स्कूल कुंभोजचे मुख्या.सागर माने यांनी केले.**



निपाणीः कार्यक्रमात दिपप्रज्वलनप्रसंगी सहकाररत्न चंद्रकांत कोठीवाले,पप्पू पाटील,संजय शिंत्रे,सागर माने व इतर मान्यवर.

येथील विद्या संवर्धक मंडळाच्या सीबीसी स्कूलच्या वार्षिक उत्सव समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन सहकाररत्न चंद्रकांत कोठीवाले हे होते. अध्यक्ष भाषणात सहकाररत्न चंद्रकांत कोठीवाले म्हणाले, विद्या संवर्धक मंडळ मराठी, कन्नड आणि इंग्रजी माध्यातून शिक्षण सेवा देत आहे. युकेजी ते पदवी आणि अभियांत्रिकीपर्यंत शिक्षण उपलब्ध आहे. दर्जेदार शिक्षण आणि सुविधा उपलब्ध करण्यात संचालक मंडळ नेहमी अग्रेसर राहिल्याने आज विद्या संवर्धक मंडळाच्या संकुलात ६ हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे सांगितले.

यावेळी संचालक अॅड. संजय शिंत्रे, व्हा.चेअरमन पप्पू पाटील यांनीही आपले विचार व्यक्त केले. प्राचार्या निलीयन शान यांनी वार्षिक आढावा घेतला. बेस्ट बॉय म्हणून रोहन पासवान, बेस्ट गर्ल्स साक्षी दावणे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास उपाध्यक्ष सुनिल पाटील, सेक्रेटरी समिर बागेवाडी, संचालक संजय मोळवाडे, आनंद गिंडे, सचिन हालपण्णावर, रावसाहेब पाटील,रूद्र कुमार कोठीवाले आदी उपस्थित होते.

# गारगोटी आगाराला तब्बल ४.६६ लाखाचे उत्पन्न

## आगार प्रमुख अनिकेत चौगले यांची माहिती

गारगोटी,ता.१४(प्रतिनिधी)-

**नवीन वर्षाची सुरुवात भक्तीभावाने, समाधानाने आणि सुरक्षित प्रवासाने व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य मार्गपरिवहन महामंडळाच्या गारगोटी आगाराने अंगारकी संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने श्री क्षेत्र गणपतीपुळे येथे चालविलेल्या जादा बस सेवेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, या विशेष वाहतुकीतून गारगोटी आगाराला तब्बल ४ लाख ६६ हजार रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले असल्याची माहिती आगार प्रमुख अनिकेत चौगले यांनी दिली.**



गारगोटी व मुरगुड पंचक्रोशीतील भाविकांसाठी ४ जानेवारी व ६ जानेवारी रोजी थेट गणपतीपुळे येथे जाण्यासाठी विशेष जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या. या उपक्रमाला भाविकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत तब्बल १५ बसेस पूर्णतः आरक्षित झाल्या. या बसेसच्या माध्यमातून हजारो भाविकांनी सुरक्षित, सोयीस्कर व परवडणाऱ्या दरात श्री गणेशाचे दर्शन घेतले.

'लालपरी'ने केवळ भाविकांना गणरायाच्या चरणी पोहोचवले नाही, तर धार्मिक पर्यटनाला चालना देत एसटीच्या आर्थिक स्वावलंबनातही मोलाची भर घातली आहे. ग्रामीण भागातील भाविकांसाठी ही सेवा म्हणजे जणू एक भक्तीपूर्ण सुवर्णसंधीच ठरली.

याच धर्तीवर येत्या २२ जानेवारी रोजी गणेश जयंतीनिमित्त देखील गारगोटी आगारातर्फे जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.किमान ४० भाविकांचा गट असल्यास त्यांच्या गावातून थेट गणपतीपुळे येथे बस सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून काही बसेस आगाऊ आरक्षणासाठी खुल्या करण्यात आल्या आहेत.या सुविधेचा लाभ भाविक-प्रवाशांनी घ्यावा, असे आवाहन गारगोटी आगाराचे व्यवस्थापक अनिकेत चौगले यांनी केले आहे.

## गडहिंग्लज उपनगराध्यक्षपदी महेश सलवादे यांची निवड

गडहिंग्लज,ता.१४(वार्ताहर)-

**गडहिंग्लज नगरपालिका उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे महेश सलवादे यांची तर स्वीकृत नगरसेवक म्हणून बाळासाहेब घुगरे आणि राजू जमादार यांची निवड करण्यात आली.नगराध्यक्ष महेश तुरबतमठ यांच्या अध्यक्षतेखाली या निवडी करण्यात आल्या.यावेळी मुख्याधिकारी देवानंद ढेकळे यांच्यासह सत्तारूढ आघाडीचे नगरसेवक उपस्थित होते.**



नगरपालिकेची नुकतीच निवडणूक झाली. मंत्री हसन मुश्रीफ यांच्या यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने जनता दल, भाजप, शिंदे शिवसेनेचा पराभव करीत दणदणीत विजय मिळविला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांची सुकानू समितीच्या समवेत बैठक झाली.या बैठकीत नूतन उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत सदस्य नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.गडहिंग्लज नगराध्यक्ष पद मागासवर्गीय गटासाठी आरक्षित होते. तथापी बेडा जंगम गटातील नगराध्यक्षपद निवडणूक रिंगणात आणून राष्ट्रवादी काँग्रेसने घवघवीत यश मिळविले होते. मागासवर्गीय गटात यामुळे नाराजीचे सूर होते. पण महेश सलवादे यांच्या रूपाने उपनगराध्यक्षपद देऊन मागासवर्गीय गटातील नाराजी राष्ट्रवादी काँग्रेसने दूर केली आहे तर स्वीकृत नगरसेवक म्हणून साखळी पद्धतीने दरवर्षी दोघांची निवड केली जाणार आहे. यावर्षी बाळासाहेब घुगरी व राजू जमादार यांची निवड केली आहे.

## बेनिक्रेच्या दिव्यज्योती मंडळाच्या अध्यक्षपदी शुभम चौगले यांची निवड

मुरगूड,ता.१४(प्रतिनिधी)-

**बेनिक्रे (ता.कागल) येथील सामाजिक परिवर्तनाचे केंद्रस्थान असलेल्या दिव्यज्योती कला, क्रीडा व सामाजिक सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षपदी शुभम वसंत चौगले यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी मयूर शशिकांत काळुगडे यांची निवड झाली.तसेच सचिवपदी अमर अण्णाप्पा गुरव यांची तर खजिनदार तेजस संतराम पाटील यांची निवड करण्यात आली.**



यावेळी संस्थापक अध्यक्ष रमेश पाटील यांच्यासह वसंत चौगले, शंकर गुरव, रवींद्र वाडकर, वसंत जाधव,बापुसो मगदूम, प्रकाश वाडकर, अमोल चौगले, आदेश बिराडे, बाजीराव कांबळे, विलास काळुगडे, दत्तात्रय फेगडे, बाळासो पाटील आणि श्रीकांत हासबे उपस्थित होते.



## ममदापूरात लाभार्थींना गॅस कीटचे वितरण

अकोळ,ता.१४(वार्ताहर)-

**माजी खास.अण्णासाहेब जोल्ले, आम.शशिकला जोल्ले यांच्या प्रयत्नातून ९ महिला लाभार्थींना गॅस सिलेंडर किटचे वितरण ममदापूर केएल येथे मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. हालशुगरचे संचालक सुहास गुगे यांनी प्रास्ताविकात जोल्ले दांम्पत्यांने मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केल्याचे सांगितले.**

यावेळी मदन आवटे,बाळासो कदम यांनी मनोगत व्यक्त केले.अकोळ बिरेश्वर शाखेमध्ये नवीन संचालक म्हणून निवड झालेल्या तुषार चौगुले, मदन आवटे, प्रकाश शंकर पाटील, बाळासाहेब बेलेकर व ग्रामीण भाजप अध्यक्ष बाळासो कदम यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास रावसाहेब फराळे, सुहास गुगे, विकास संकपाळ, दीपक जाधव, वैभव रांगोळे, ए.डी.कदम, मधाळे सर, संजय आवटे, अण्णासाहेब चौगुले, जयदेव चव्हाण, राजू माने, संजय कदम, शिवाजी हरेल, ग्रामस्थ उपस्थित होते.स्वागत बाळासो चौगुले यांनी केले.सूत्रसंचालन रवींद्र मधाळे यांनी केले.

# वाचनातून खरे व्यक्तीमत्व समृद्ध होते-डॉ.कुराडे

गडहिंग्लज,ता.१४(प्रतिनिधी)-

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, शिवराज महाविद्यालय, ग्रंथालय विभाग व यशवंतराव चव्हाण अग्रणी महाविद्यालय हलकर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विद्यार्थी, वाचन आणि व्यक्तिमत्व विकास' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.**



शिवराज महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ.अनिलराव कुराडे सोबत इतर प्रमुख मान्यवर.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.एम.कदम हे होते. प्रारंभी या कार्यशाळेचे उदघाटन शिवराज विद्या संकुलाचे सचिव डॉ.अनिलराव कुराडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवराज विद्या संकुलाच्या संचालिका प्रा.सौ. बिनादेवी कुराडे व पर्यवेक्षक प्रा. तानाजी चौगुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कुंडीतील रोपाला पाणी घालून कार्यशाळेचा प्रारंभ करण्यात आला.ग्रंथपाल संदीप कुराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या कार्यशाळेत सचिव डॉ.अनिलराव कुराडे यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्तिमत्व विकास आणि वाचन हा ज्ञानाचा मुख्य घटक आहे. विद्यार्थ्यांनी या दोन्हींची सांगड घालून आपले व्यक्तिमत्व सुधारले पाहिजे. खरे तर व्यक्तिमत्व हे वाचनातून समृद्ध होते.

या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात प्रा.पी.डी.पाटील यांनी 'व्यक्तिमत्व विकासासाठी वाचलेच पाहिजे!' या विषयावर तर द्वितीय सत्रामध्ये डॉ.आर.पी. हेंडगे यांनी 'विवेकी वाचनातून समृद्धीकडे' या विषयावर मार्गदर्शन केले.कार्यशाळेत प्राचार्य डॉ.एस.एम.कदम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये प्रा.सौ.पौर्णिमा कुराडे, डॉ.ए.एस. आरबोळे, डॉ.विजय मुसाई, डॉ.आप्पासाहेब बुडके, ग्रंथपाल राजेंद्र सावेकर यांच्यासह अग्रणी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

डॉ.विजय मुसाई, वेदांती पालकर, अस्मिता सुतार यांनी मनोगत व्यक्त केले.अग्रणी महाविद्यालय अंतर्गत या कार्यशाळेसाठी उपस्थित राहिलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र वाटप करून या कार्यशाळेची सांगता करण्यात आली.डॉ.श्रद्धा पाटील यांनी सुत्रसंचालन केले आभार डॉ. अशोक मोरमारे यांनी मानले.

## स्तवनिधी पार्श्वनाथ गुरुकुलचा शनिवारपासून वार्षिकोत्सव समारंभ

निपाणी,ता.१४(वार्ताहर)-

**बाहुबली ब्रह्मचर्याश्रम बाहुबली संचलित पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम गुरुकुल संस्थेचा ८७ वा वार्षिकोत्सव समारंभ ता.१७ व १८ जानेवारीला साजरा होणार आहे.यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

शनिवार ता.१७ रोजी सायंकाळी ५.३० वा. जिनरत्न रोटे यांच्या अध्यक्षतेखाली आ.प्रकाश हुक्केरी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार असून तहसीलदार सुरेश मुंजे, गटशिक्षणधिकारी महादेवी नाईक, चिकोडीचे शिक्षणाधिकारी आर.एस. सीतारामू व अल्पसंख्याक कल्याण विभाग बेळगावचे एफ. यु.पूजेर व प्रवीण नंदा चिकोडी यांच्या उपस्थितीत बाल विकास मंदिराच्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.ता.१८ रोजी सकाळी ८ वा. विशाळी अमावस्येनिमित्त १००८ भगवान पार्श्वनाथ महामूर्तींचा चरणाभिषेक व विधान त्यानंतर सायंकाळी ५.३० वा. विज्ञान प्रयोगशाळा व संगणक कक्षाचे उद्घाटन व त्यानंतर संध्याकाळी ६ वा. प्राथमिक व माध्यमिक विभागातील सांस्कृतिक कार्यक्रम, वार्षिक सभा व सत्कार कार्यक्रम होणार आहे.

# अंतुर्ली, झित्रेवाडीत पहिल्यांदाच धावली लालपरी

## ग्राहक पंचायतीच्या पाठपुराव्याला अखेर यश

गारगोटी,ता.१४(प्रतिनिधी)-

**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून कोल्हापूर जिल्ह्याच्या भुदरगड तालुक्यातील पश्चिम भागातील ऐतिहासिक रांगणा किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या अंतुर्ली, झित्रेवाडी यासारख्या डोंगराच्या पायथ्याशी आणि जंगल भागात राहणाऱ्या वाडी वस्तीतील लोकांसाठी आज पहिल्यांदाच गारगोटी आगाराची एस टी बस सेवा सुरु झाली. ग्राहक पंचायतच्या पाठपुराव्याला आज यश आले.**



भुदरगड तालुक्यातील अंतुर्ली या खेडेगावात पहिल्यांदाच लालपरी धावली. यावेळी उपस्थित ग्रामस्थ.

भुदरगड तालुक्यातील पश्चिम भागाला अजूनही दळणवळणाची साधने नाहीत.या दुर्गम गावात एस.टी बस सुरू झालेली नव्हती. त्यामुळे या गावातील लोकांना अनेक वर्षे विविध अडचणींना तोंड द्यावे लागत होते. या गावांतील लोकांचे, खास करून आजारी लोकांचे सर्वात जास्त हाल पावसाळ्यात होत होते तसेच दररोज पाच-सात किलोमीटर पायपीट करून लांबच्या शाळेत जाणाऱ्या मुला मुलींचे प्रचंड हाल होत होते. या दुर्गम गावातून दिवसातून किमान एक वेळ तरी एखादी एस टी बस सोडावी यासाठी अनेक वर्षे अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करून बघितले. परंतु त्यांना यश येत नव्हते, प्रशासनाकडून दाद घेतली जात नव्हती. पण ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी प्रशांत शरदराव पुजारी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने आजपासून त्या सर्व गावकऱ्यांसाठी त्यांच्या गावात हक्काची, कायमची एस टी बस सुरू झाली आणि त्यांच्या जीवनातील सुमारे ७७-७८ वर्षांचा वनवास संपला.आणि या वाडीवस्तीत लाल परी धावू लागली.

गावचे सरपंच रामदास देसाई यांनी मागील जानेवारीत याबाबत एस टी व्यवस्थापकांना पत्र दिले होते व पाठपुरावा केला.परंतु, दाद मिळाली नाही. शेवटी त्यांनी ग्राहक पंचायतचे त्यानंतर प्रशांत पुजारी यांचेकडून पाठपुरावा सुरु केला.


वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जाऊन भेटल्यावर,व्यवस्थित समजावल्यावर अक्षरशः चारच दिवसात नोटीस पत्र काढून त्या गावात एस टी रुटचा सर्वे करण्यासाठी संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांच्यासह एक प्रशिक्षणार्थी एस टी बस सोडली. साधारण एका आठवड्यात सर्वेचा सकारात्मक रिपोर्ट तयार झाला. त्यामुळे त्या भागात एस टी बस सुरू व्हायचा मार्ग मोकळा झाला. परंतु त्यानंतर आगारातून अनेक एस टी बसेस यात्रेसाठी आणि तालुक्यातील विविध गावच्या शाळेतील सहलीसाठी देण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे बसेस उपलब्ध होत नव्हत्या. पण शेवटी जास्त वाट न बघता रात्री एस टी प्रशासन, आगार व्यवस्थापक यांना संपर्क करून त्यांनी बसचे नियोजन केले आणि सकाळी ९ वाजता पहिली एस टी बस त्या गावात पोचली. अनेक वर्षे, प्रचंड दीर्घ काळ लाल डब्याची डोळ्यात प्राण आणून वाट बघणाऱ्या त्या तीन-साडेतीन हजार लोकसंख्या असलेल्या दोन-तीन गावातील गावकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.

शाळेत जाणाऱ्या मुलींच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले होते. प्रशांत पुजारी यांनी पहिल्या एस टी बसचे पूजन केले. यावेळी ग्रुप ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच रामदास देसाई, उपसरपंच सौ.शिंदे, ग्रामपंचायत सदस्य, माजी ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, ग्रामस्थ उपस्थित होते.

## मोळीहाळ शाळेला २५ लाखाचा निधी

चिकोडी,ता.१४(वार्ताहर)-

**विजापूर जिल्ह्यातील ताळीकोटी तालुक्यातील मोकीहाळ गावातील सरकारी माध्यमिक शाळेला २ वर्ग खोल्या बांधण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे आम.प्रकाश हुक्केरी यांनी सांगितले.**



ते म्हणाले, मोकीहाळ गावातील सरकारी माध्यमिक शाळेला वर्ग खोल्यांची कमतरता होती. त्यामुळे २ वर्ग खोल्या निर्मितीसाठी निधी मंजूर करण्यासाठी मुद्देबिहाळ येथील आमदार आप्पाजी सी. एस. नाडगौडर यांनी मागणी केली होती. शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने सन २०२५ सालामध्ये आपल्या स्थानिक प्रदेश विकास योजनेअंतर्गत सदर माध्यमिक शाळेच्या २ वर्ग खोल्या निर्माण करण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## कोगनोळीत काजवे महाराजांची पुण्यतिथी साजरी

कोगनोळी,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील वैष्णव मंदिरामध्ये वैकुंठवासी हभप.बाळकृष्ण काजवे महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. त्यानिमित्त शिप्पूर (ता. हुक्केरी) येथील हभप.अर्जुन जाधव महाराज यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.**

अर्जुन जाधव महाराज म्हणाले, मानवी जीवनाला मोठेपण प्राप्त होण्याकरिता मानवी जीवनात संत संगतीची गरज आहे. याप्रसंगी गोपाळ शिंदे (हणबरवाडी) यांनी मृदंगसाथ केली.रामकृष्ण पाटील (यमगे), नामदेव माने (कोडणी), महादेव केसरकर (यरनाळ), गणपती पाटील (शंकरवाडी), बाळासो रांगोळे(लिंगनूर दुमाला), पांडुरंग सुतार (हंचिनाळ के.एस), रामदास पाटील (सुळगाव) आदींनी गायनसाथ केली.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**मिरची कांडप मशीन** व मसाला बारीक करणे मशीन विकणे आहे. संपर्क-९९२१२३६२९२

**कॉम्प्युटर इन्स्टीट्युट सेटअप** विकणे आहे. चालू कंडिशनमधील १० कॉम्प्युटर, ११ टेबल, १४ खुर्च्या. संपर्क-९८२३७३८८८४

**जिजाऊ फॅशन-** आमचेकडे फॅन्सी लेडीज स्वेटर (श्रग) होलसेल व रिटेल दरात मिळतील. पत्ता-तोरणानगर, शहापूर. फोन-८७९३१०९२६३

**६४ गुंठे प्लॉटिंगचे** जमीन विकणे. यशवंत कॉलनी, आयकोसमोर, शिवनाकवाडी. ९९२२८१०२०२

**नवीन कोल्हापूर** नाक्याजवळ, कोल्हापूर रोडटच इचलकरंजी येथे ३६१६ स्क्वे. फूट क्षेत्र जागा व त्यावरील आरसीसी बांधकाम असलेली इमारत विकणे आहे. संपर्क-९४०४१०४०६७, ९३७२००४०६७

**विकणे आहे.** कौंटर-१, कपाट-३, झेरॉक्स मशिन-१, स्टेशनरी मालासहीत विकणे. संपर्क-९०४९४९४४१३

**त्वरीत विकणे आहे.** श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे मुख्य कमानीजवळ व दत्त हायस्कूलच्या पाठीमागे आरसीसी दुमजली घर त्वरीत विकणे आहे. प्रत्येक मजला ४५० स्क्वे. फूट एरिया, ॲटॅच बाथरूमसहीत संपर्क-९४२२४१६४२९

**त्वरीत विकणे आहे.** आवाडे अपार्टमेंटमधील दोन खोल्यांचा सर्व सोयीनियुक्त असलेला 'ब्लॉक' त्वरीत विकणे आहे. संपर्क-९४२२३३३४३०

**जेवणावळी व गणेशजयंतीसाठी** गाय-म्हैसीचे चांगल्या प्रतीचे कणीदार तूप होलसेल दरात मिळेल. ८७८८२०४५१३

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ. तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क-८३१७२९१००८

## आरोग्य विषयक

**नैसर्गिक पध्दतीने** वजन कमी करा अथवा वाढवा. कसे करायचे ते मला विचारा. नरेंद्र पवार-९३५६८०६१४५

**मानसिक आजार-** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्राचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क-८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

## बोअरवेल विषयक

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**श्री साई बोअरवेल** आमचेकडे ४।। व ६।। इंची बोअर, रिकामा प्लॉट व शेतामध्ये योग्य दरात मारून मिळेल. संपर्क-९८८१३५५८१३, ९९२२७७२०३६

**चौगुले बोअरवेल-** ४३ वर्षाची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४।।। व ६।। इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क-डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅन्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

## * नोकरी विषयक *

**सेवा भारती संचलित** डॉ. हेडगेवार रूग्णालय इचलकरंजी येथे महिला वैद्यकीय मदतनीस तथा पंचकर्म थेरपिस्टपदी प्रशिक्षणार्थी गरजू महिला नेमणे आहे. आवश्यक प्रशिक्षण घेण्याची तयारी असावी. शैक्षणिक पात्रता ANM किंवा १२ वी सायन्स पास असावी. ४/१८५, नाट्यगृह चौक, डॉ. हेडगेवार रूग्णालय इचलकरंजी येथे आपले अर्ज जमा करावेत. संपर्कासाठी फोन- (०२३०) २४२२६१७१

**औषध दुकानात** पार्ट टाईम/फूल टाईम कामासाठी कामगार पाहिजे. संपर्क-९६७३७००८१८

**आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये** कामासाठी गरजू मुलगा व मुलगी पाहिजे. संपर्क-८८८८५११५२२

**ऑफिस कामासाठी** कॉम्प्युटरची माहिती असलेली लेडीज पाहिजे. संपर्क-वर्धमान हौसिंग सोसायटी, जैन मंदिरसमोर, रावका सदन, इचलकरंजी. भेटणेची वेळ- दु. ३ ते सायं. ७.

**पेट्रोल पंपावर** पेट्रोल व डिझेल सोडणेकरीता जेंटस, लेडीज कामगार पाहिजे. संपर्क-९५४५४८४३१७, ९३५६६७०७४६

**अनुभवी कॉस्मेट्रोलॉजीस्ट**/ब्युटी थेरपिस्ट पाहिजेत. ब्युटी सलून किंवा क्लिनिकल कॉस्मेटीलॉजीचा अनुभव आवश्यक. कामासाठी जबाबदार व प्रशिक्षित उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. पत्ता-राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. फोन-८६६८७६३५२०

**अनुभवी नर्स पाहिजे.** क्लिनिक/हॉस्पिटलचा अनुभव आवश्यक. जबाबदार व प्रशिक्षित उमेदवारांनाच प्राधान्य. संपर्क-राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. फोन-८६६८७६३५२०

**फूलटाईम व पार्टटाईम** मार्केटिंग कामासाठी मुले/मुली पाहिजेत. संपर्क-७९७२८७४१६०, इचलकरंजी.

**प्लायवुड हार्डवेअर** दुकानात कामगार पाहिजे. शिक्षण-१० वी पास/नापास, वय-१८ ते ३० वर्षे. पगार-१००००. संपर्क-९२२५८३४८०२

**ऑफिससाठी** ऑफिसबॉय पाहिजे. पेढीसाठी आवक/जावक पहाणेसाठी किमान १० वी पास जेंटस संपर्क-९७७२०३८४१६

**मशिनशॉप मध्ये** हेल्पर कामासाठी गरजू मुलगा पाहिजे. तसेच बांधकामावर वॉचमन कामासाठी जोडपे पाहिजे आहे. ७७४४०४३२०७, ९९२२४०४७९५

**गिफ्ट शॉपीच्या दुकानात** सेल्सगर्ल, सेल्सबॉय, महिला पाहिजे. ९९ सुपर मॉल, इचलकरंजी. फोन-८०५५२८७५५५, ८२०८७३१८६८

**समर्थ इंडस्ट्रिज,** टाकवडे येथे वेल्डर, हेल्पर मुले पाहिजेत. इएसआयसी, पीएफ सुविधा उपलब्ध. संपर्क-९३७१५९५६६६

**घरबसल्या** शॉम्पू पावडरचे पॅकिंग व विक्रीचे काम करून दररोज ५००/- रूपये कमविण्याची सुवर्णसंधी. संपर्क-९१५६३००८९०

**कामगार पाहिजेत.** होलसेल औषध दुकानात कामासाठी लेडीज पाहिजेत तसेच पॅकिंग व गोडाऊनमध्ये कामासाठी जेंटस कामगार पाहिजेत. पत्ता-पंचवटी टॉकीजजवळ, टेकईट मॉलशेजारी. प्रो. सुशिल लाईक केअर एलएलपी. मो. ९४२३२७५२७६, ९८६०२२९१६७

**किडस वेअर दुकानात** अनुभवी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजेत. संपर्क-९२७०७१२००५, ९०७५११७९३३

**गाडीमधील** स्टॉल घेणेसाठी वयस्कर दिवाणजी पाहिजे. संपर्क-जयकिसान पशू खाद्य, इचलकरंजी. फोन-९४२२०४४२९२

**पाहिजेत.** साडी फॉल दुकानात कामासाठी लेडीज व जेंटस कामगार पाहिजेत. पत्ता-नॅशनल साडी फॉल, इचलकरंजी. मो. ९०४९६६१८९९

**झोले बाजार** कबनूरमध्ये नोकरीची संधी! अनुभवी सेल्स स्टाफ आणि मॅनेजर हवेत. संपर्क-९५५२१२२३४५, ८६८६१२२३४५

**दुकानात कौंटरसाठी** मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क-गणेश ड्रायक्लिनर्स, विक्रमनगर, इचलकरंजी. ७८८७७९५७२६

**नवीन ई-कॉमर्स** प्लॅटफॉर्मसाठी डिजीटल मार्केटिंगसाठी मुलगा/मुलगी पाहिजेत. सोशल मिडीया (FB/IG) गुगल ॲडसचा अनुभव आवश्यक. पार्वती इंड. इस्टेट, यड्राव. फोन-९९२३०३४००६, ८२०८६३७७४६

**फूड टेक्नॉलॉजीस्ट** लॅब टेक्निशियन पाहिजे. चहा उत्पादन कंपनीमध्ये पार्वती रोड, इस्टेट यड्राव. फोन-९९२३०३४००६, ८२०८६३७७४६

**ड्रायव्हर पाहिजे.** अनुभवी पूर्ण वेळेकरीता लायसन्स, अर्जासह भेटा. ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**VMC ऑपरेटर पाहिजेत.** बस स्टॅन्डजवळ, स्टेशन रोड, भारत पेट्रोल पंपसमोर, इचलकरंजी. फोन-९८२३२१६०००, ९८५४८४१००८

**सिक्युरिटी गार्ड पाहिजे.** आवाडे पार्क, तारदाळ नाका, ८ तास व १२ तास तीन शिफ्टमध्ये. ८१०९१७७५१६, ८३२०९५५१२५

**पाहिजे.** डेअरी प्रॉडक्ट डिलेव्हरीसाठी डिलेव्हरीबॉय व आईस्क्रीम पार्लरसाठी कामगार पाहिजे. संपर्क-९४०४३५६६७७, ९१४५३८५००९

**मावशी पाहिजे.** घरकाम करण्यासाठी मावशी हव्या आहेत. (गावभागातल्यांना प्राधान्य) वेळ सकाळी-९ ते १, पत्ता-श्रीपाद नगर, चांदणी चौक, इचलकरंजी. मो. ९०४९०४२३७५

**टर्नर, ग्रायडिंग ऑपरेटर** पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा. केदार प्रिसीजन कंपोनंटस. आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. फोन-९४२२४२८१९६, ९११२२७३१७१

**सेल्समन पाहिजे.** नमकीन ऑर्डरीसाठी सेल्समन पाहिजे. गाडी असणे आवश्यक. गरजू, अनुभवी, प्रामाणिक संपर्क-९५२७७६६११२, ९५२७७६४४६०

**शाकाहारी जेवण** बनविणेसाठी साफसफाईकरिता व धुणे भांडी करणेसाठी बाई पाहिजे. महासत्ता चौक, इचल. संपर्क-९६३५७५७३३३, ९५८९५५५७११

**अर्जंट पाहिजे.** दुकानात काम करण्याकरीता फूलटाईम/पार्ट टाईम जेंन्टस/लेडीज पाहिजे आहेत. संपर्क-९२८४४०१०१६, ७८७५५११९९७२

**सिमेंट पाईप कंपनीमध्ये** मॅनेजर पाहिजे. इचलकरंजी-७३८५२४८२९०

**ड्रायव्हर पाहिजे.** ४०७ बोलेरो ट्रक वरती निर्व्यसनी, लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे, इचलकरंजी. ७३८५२४८२९०

**पार्वती इंडस्ट्रियल,** शहापूर, कोरोची आवाडे पार्ककरिता सिक्युरिटी गार्ड त्वरीत नेमणे आहे. संपर्क-९८५०९४५२२६, ९५११७५९६७६

**अर्जंट सिक्युरीटी** गार्डस व लेडी गार्डस पाहिजेत. इचलकरंजी, पार्वती इंडस्ट्रिज व मुडशिंगीकरिता ड्युटी-८ व १२ तास, आकर्षक पगार, मो. ९७०२४२४७७२, ९५२९५४५४६८

**ड्रायव्हर पाहिजे.** पुण्यामध्ये राहणेसाठी उत्सुक टी परमिट गाडीवर लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-८६२३०५६८९०

**अकौटींग टॅली प्राईममध्ये** अनुभवी अकौटंट पाहिजे. विवाहीत लेडीज/जेंटस, २ वर्षे अनुभवी संपर्क-९८३४५७०१२७

**प्लंबिंग कामासाठी** शिकाऊ किंवा अनुभवी मुले पाहिजेत. इचलकरंजी शहर किंवा परिसरातील चालतील. आकर्षक पगार मिळेल. ९९२२२३०६१९

**जेंटस कामगार पाहिजेत.** वय-३२ पर्यंत. टू व्हिलर आवश्यक. संपर्क-९६३१३१६०३०

**पारले बिस्किट** एजन्सीमध्ये हेल्पर कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क-९६०४२६६०२१

**शिकाऊ, अनुभवी** सीएनसी/व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत. संपर्क-इंदू सीएनसी शॉप, दाते मळा, हॉटेल थाळी हाऊसमागे, इचलकरंजी. ९३७०१४३०३५

**इचलकरंजी शहरातील** जुन्या नामांकित पतसंस्थेमध्ये पिग्मी एजंट पदासाठी फिक्स पगार सह कमिशन बेसिसवर १० जागा भरायच्या आहेत अनुभवी तसेच बिगर अनुभवी उमेदवारानी त्वरित संपर्क करावा. ९३५६१६८६७२.

**पाहिजेत.** स्वस्तिक डाईंग ॲन्ड प्रिटींग मिल येथे महिला मदतनीस (हेल्पर) कामाची वेळ- ९ ते ६, पत्ता-गेट नं.३, स्टेशन रोड, बालाजी ड्रायव्हींग स्कूलच्यासमोर, इचलकरंजी. फोन-७७६८००८६०१

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती बसस्टॅन्डजवळ, पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी- दुपारी ३ ते रात्री ११ कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. फोन-८३२९०२८१४४

**केतन वाईन-** काऊंटर सेल्समन-२, कॉम्प्युटर ऑपरेटर-१, गोडावूनमध्ये-२. केतन वाईनमध्ये जागा भरती करणे आहे. पत्ता-हिरा टॉकीजजवळ, हुपरी. मो. ९६०४८२४१७२, ९८२२०४३२५६

**१० वी, १२ वी शिक्षण** चार चाकी गाडी शिकवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, आंबेडकर पुतळ्याशेजारी, इचलकरंजी. ९८५०११४६६०

**१२ वी शिक्षण** संगणक ज्ञान असणारी फूल टाईम मुलगी/मुलगा पाहिजेत. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, आंबेडकर पुतळ्याशेजारी, इचलकरंजी. ९८५०११४६६०

**बादशाह बजाज** शोरूमसाठी जनरल मॅनेजर, सेल्स एक्झिक्युटिव्ह व ऑफिस बॉय नेमणे आहे. आकर्षक पगार. संपर्क-८६०५८८२२००, ९५११९९००९२. इचलकरंजी, कुरूंदवाड, जयसिंगपूर.

**पाहिजे** - नामांकित ॲडव्हटायझिंग कंपनीमध्ये फोटोशॉपसाठी अनुभवी लेडीज पाहिजे. मंगलधामासमोर, गणपती मंदिरशेजारी, संपर्क - ८६५७१८१८१९.

**लाईटचे बोर्ड** तयार करणेसाठी प्रिटिंग सोडणेसाठी, लेझर मशिन चालविण्यासाठी कामगार पाहिजेत. अनुभवींस प्राधान्य. नवशिख्यास जीवनपयोगी कला शिकण्याची संधी. न्युक्लिअस, डी-मार्ट समोर, इचलकरंजी. संपर्क-९९२३४६००६६

**त्वरीत कामगार पाहिजेत.** ऑपरेटर कामगार-४, क्वॉलिटी इनस्पेक्टर-२. पत्ता- तीन बत्ती चार रस्ता, इचलकरंजी. संपर्क-८७९३१५५७११

**पाहिजेत.** प्रोडक्शन सुपरवायझर CNC, VMC प्रोग्रॅमिंग येणारा १ जागा, CNC, VMC ऑपरेटर-४ जागा, लाईन इन्स्पेक्टर- १ जागा. संपर्क-टेक्नीमेक कटिंग एज प्रा. लि. पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव. ९८८१३१६०४३

**माल काढणे** व चेकिंगसाठी लेडीज कामगार पाहिजे व माल वाटणे व गोडाऊनसाठी जेंटस कामगार पाहिजे. संपर्क-सुशिल व्हेंचर लि. डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. मो. ९३५६७८५५०७

## * भाड्याने देणे/घेणे *

**कॅबसन हॉटेलशेजारी** हॉटेल व्यवसाय, शोरूम इलेक्ट्रॉनिक्स, फर्निचर इत्यादीसाठी जागा भाड्याने देणे आहे. संपर्क-९०३९६९३९६९

**हिरापन्ना लस्सीसमोर** अरोमा बेकरीशेजारी कापड शोरूम बँक इत्यादीसाठी तसेच ग्राऊंड फ्लोअर व बेसमेंट खाद्य व्यवसायासाठी देणे आहे. भाडे-४५०००, संपर्क-९०३९६९३९६९

**नदीनाका पेट्रोल** पंपाच्या जागेवर खाद्य विक्रीसाठी अथवा इतर दुकानासाठी खुली जागा भाड्याने देणे आहे. संपर्क-९३५६६७०७४६, ९५४५४८४३१७

**१ आरके,** १ रूम किचन सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणेचे आहे. चिंतामणी गणपती मंदिर, कोरोची. संपर्क-९६८९५७९६५८

**भाड्याने देणे-** आरसीसी रूम सिंगल व डबल पहिला मजला सर्वसोयीनियुक्त छोट्या कुटूंबासाठी संपर्क-गुरूकृपा रेडीमेडस, गावभाग, नदीरोड, इचलकरंजी. ९५१८५४३६९५

**आमचेकडे कमीत कमी** फीमध्ये स्टडी रूमसाठी हॉल उपलब्ध आहे. पार्किंग सुविधा, ॲक्वाचे पाणी, १ वेळ चहा उपलब्ध आहे. लवकरात लवकर संपर्क करा. ९५७९८९०१९८, इचलकरंजी.

**२ बीएचके** आरसीसी घर भाड्याने देणे. सर्वसोयीनियुक्त बोअरसह, शिवाजी चौक, विठ्ठल मंदिरशेजारी, भगत गल्ली, तारदाळ. फोन-९६३७०८७३१५, ९९२२१८६३२८

**शॉपिंग सेंटरजवळ** तारा हॉटेलजवळ गाळा भाड्याने देणे आहे. कॅफे, खानावळ, गोडाऊन. संपर्क-९१३००१०२९९

**गोडाऊन भाड्याने देणे-** १५७० स्क्वे. फूट पोटमाळा, ऑफिस, संडास बाथरूम, पाणी सर्व सोयीनियुक्त, तीनबत्ती चौक, इचलकरंजी. ८६६८५१०९९१

**दुकानगाळा भाड्याने देणे-** रोडटच शाहू पुतळा, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. संपर्क-८८५५८४६१६२, ९३७२४५८७१७

**सर्व सुखसोयीनी सज्ज** वर्धमान चौकात २ बीएचके घर, बंगला भाड्याने देणे. भेटा-९९२३०२९०९०, वर्धमान सोसायटी.

**भाड्याने देणे-** १ बीएचके सर्व सोयीनीयुक्त डीमार्ट मागे, इचलकरंजी. फोन-९९२३२०८४५१

**राज कॅसल हॉटेलमागे** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क-८८०५२३३२४३, इचलकरंजी.

**भाड्याने देणे-** १ बीएचके दुकानगाळा १, तोरणानगर, शहापूर. फोन-७६२०३८५८३९

**शाकाहारी कुटूंबासाठी** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त आरसीसी फ्लॅट भाड्याने देणे आहे. सोन्या मारूती मंदिरमागे, पाटील बिल्डींग, इचलकरंजी. ८९५६६८९१६५

**३ बीएचके फ्लॅट** सर्व सोयीनियुक्त मध्यवस्तीत, दुसरा मजल्यावर भाड्याने देणे. महासत्ता चौक, स्वामी समर्थ केंद्राजवळ, इचलकरंजी. ९४२३२८६०९३, ९८५०२८६०९३

**व्हीएमसी/सीएनसी** मशिन शॉप चालू स्थितीत भाड्याने देणे आहे. संपर्क- ९४२११०७९०१, मौजे माणगाव.

**१ बीएचके सर्व** सोयीनियुक्त त्वरीत गहाणवट देणे आहे. शहापूर तारदाळ नाका, तारदाळ रोड, तारदाळ. संपर्क- ९१५६०५५९३२.

**१ बीएचके सुसज्ज** नवीन फ्लॅट भाड्याने देणे आहे. २४ तास पाण्याची सोय पत्ता- गणेशनगर, गल्ली नं. ४, खंजिरे इस्टेट रोड. संपर्क- ७८४१८४१९८६

**शहराच्या** मध्यवर्ती मोहन आर्केडमध्ये ऑफिस, गोडाऊन स्टार्टपसाठी गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-९९२३४६००६६

**भाड्याने पाहिजे.** डि-मार्ट च्याजवळ, पुढे किंवा मागे १५०० ते ३००० गोडाऊन पाहिजे. संपर्क-९२२६८३६४४३

## कर्ज विषयक

**झटपट लोन मिळेल.** संपर्क-९६५७१६३९८१

**फक्त असिसमेंट** उतारा व घरफाळा पावतीवर ७ लाखापर्यंत कर्ज मिळेल. सिबील ६५०+ पाहिजे. संपर्क- ९१४५७५३८१०.

## हॉटेल विषयक

**परमिट रूम बारसाठी** हेल्पर व वेटर पाहिजेत. संपर्क- ७५८८६२०५०५, ९८५०३१०५०५, इचलकरंजी.

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# उपचाराचे पैसे मागितल्यावरून युवकास मारहाण;
## १४०० ग्रॅम चांदी, सोन्याची चेन पळवली

**हुपरी, ता. १४ (वार्ताहर)**
**रायगड येथे झालेल्या अपघातानंतर उपचारासाठी मिळालेले पैसे परत मागितल्याच्या रागातून युवकास कुऱ्हाडीचा धाक दाखवून मारहाण करण्यात आली. तसेच घरातील ३ लाख २० हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने चोरून नेल्याची घटना हुपरीतील होळकर नगर येथे घडली. याप्रकरणी हुपरी पोलिसात एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.**

कृष्णा रामा भानसे (वय ४४, रा.होळकर नगर, बाळूमामा मंदिराच्या पाठीमागे, हुपरी) असे जखमीचे नाव आहे. याप्रकरणी सुनील संभाजी गळदगे (वय ३४), संभाजी कल्ल गळदगे (वय ६०) आणि जकुबाई संभाजी गळदगे (वय ५५, सर्व रा. होळकर नगर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी भानसे आणि आरोपी हे एकमेकांचे शेजारी आहेत. सप्टेंबर महिन्यात फिर्यादी व आरोपी सुनील हे आयशर टेंपो घेऊन रायगड येथे गेले असताना त्यांच्या वाहनाचा आणि स्विफ्ट कारचा अपघात झाला होता.यात कृष्णा भानसे जखमी झाले होते. त्यावेळी तडजोडीअंती स्विफ्ट कारच्या मालकाने भानसे यांच्या उपचारासाठी सुनील गळदगे यांच्याकडे पैसे दिले होते.

हे पैसे भानसे यांनी परत मागितले असता, आरोपींनी त्याचा राग मनात धरून १० जानेवारी रोजी सकाळी भानसे यांच्या घरात घुसून वाद घातला. आरोपींनी भानसे यांच्या डाव्या डोळ्याजवळ दगड मारून त्यांना जखमी केले, तसेच कुऱ्हाडीचा धाक दाखवला. यावेळी आरोपींनी संगनमत करून भानसे यांच्याकडील कामासाठी आणलेली १४०० ग्रॅम चांदी आणि गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन तोडून घेतली. असा एकूण ३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल आरोपींनी जबरदस्तीने चोरून नेला.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक माया वायकर करत आहेत.

# ब्लॅकमेलिंगला कंटाळून युवतीची आत्महत्या

**हुपरी, ता. १४ (वार्ताहर)-**
.......................
**फोटो व्हायरल करण्याची धमकी आणि विवाहित असूनही लग्नाचे आमिष दाखवून सतत होणाऱ्या ब्लॅकमेलिंगला कंटाळून यळगूड (ता. हातकणंगले) येथील एका युवतीने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.**

याप्रकरणी मयत युवतीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोघांवर हुपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आकाश सुरेश चव्हाण (रा. यळगूड) आणि अनिकेत आदगोंडा पाटील (वय ३२, सध्या रा. चिक्कोडी, मूळ रा. यळगूड) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. मयत युवती आणि संशयित आकाश चव्हाण यांचे काही एकत्र फोटो होते. हे फोटो आकाशने सर्वांना दाखवून बदनामी करण्याची धमकी युवतीला दिली होती.

तर दुसरा संशयित अनिकेत पाटील हा स्वतः विवाहित असतानाही त्याने संबंधित युवतीला लग्नाचे आमिष दाखवले होते. तसेच आकाशच्या मोबाईलमधील फोटो वगैरे घेऊन येण्यासाठी तो तिच्याकडे तगादा लावत होता.

या दोन्ही संशयितांनी युवतीला प्रचंड मानसिक त्रास दिला. या सततच्या त्रासाला आणि बदनामीच्या भीतीला कंटाळून सदर युवतीने २२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी लोखंडी हुकाला नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणी अखेर १३ जानेवारी २०२६ रोजी हुपरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रसाद कोळपे करत आहेत.

# रविवारपासून वि.स. खांडेकर व्याख्यानमाला सुरू

**कोल्हापुर,ता.१४,(प्रतिनिधी)**
**करवीर नगर वाचन मंदिर तर्फे साहित्यिक कै.वि.स. खांडेकर यांच्या स्मृत्यर्थ १८ जानेवारी पासून व्याख्यानमाला सुरू होत आहे. यामध्ये उत्तमोत्तम लेखक, साहित्यिकांची व्याख्याने रसिक श्रोत्यांसाठी आयोजित केली आहेत.**

अमिता गद्रे यांचे व्याख्यान, रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी दीर्घायुष्याचे गुपित या विषयावर व्याख्यान होणार आहे. सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सध्दम्म व संतत्व या विषयावर ॲड. दिनकरराव कांबळे आपले विचार मांडणार आहेत. मंगळवार दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी अनुभवकथन नभ.... जल.... भू शुभदा गोडबोले, प्रसाद गोडबोले हे सादर करणार आहेत, अशाप्रकारे तीन दिवस व्याख्यानमाला सुरू राहणार आहे. व्याख्यानमाला दररोज सायं. ६.०० वाजता न्यू एज्युकेशन सोसायटी, राम गणेश गडकरी सभागृहात पार पडणार आहे. यासाठी सर्वांना मोफत प्रवेश असून या व्याख्यानाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन व्याख्यानमाला समिती प्रमुख अभिजित भोसले यांनी केले.

# येडुर-जोतिबा नूतन बसचे मलिकवाड येथे स्वागत

**एकसंबा,ता.१४( वार्ताहर)**
**कोल्हापूर आगाराची येडुर - जोतिबा नूतन बस सेवा नुकताच सुरू झाली असून या नूतन बससेवेचे मालिकवाड येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. सदर बसमुळे एकसंबा, सदलगा, मलिकवाड, येडुर आदी परिसरातील नागरिकांना याचा लाभ होणार आहे.**



प्रारंभी अक्षय इंगळे, रावसाहेब कुंभार यांच्या हस्ते बसचे पूजन करण्यात आले.त्यानंतर आण्णासाहेब इंगळे, आण्णासाहेब केरुरे, आसिफ मुल्ला यांच्याहस्ते चालक, वाहक यांचा सत्कार करण्यात आला. ही बस जोतिबा, कोल्हापूर, पट्टणकडोली, हुपरी, बोरगाव, सदलगा, मलिकवाड, एकसंबा मार्गे येडुर येथे जाते. याप्रसंगी आण्णासाहेब इंगळे, पांडुरंग पाटील, निवास करजगे, वाल्मीक कोळी, कृष्णा खोत, कृष्णा संकपाळ, शरद संकपाळ, अमर पाटील, बाळू गुडे, आप्पासो गुडे, धनु पाटील, महादेव पाटील, मकरंद द्रविड, यादनवाडीचे रमेश शिंदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवारी 'टेकस्प्रिंट : डायमेन्शन एक्स' हॅकेथॉनचे आयोजन

**कोल्हापूर, ता. १४ (प्रतिनिधी)**
**डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय येथे गूगल डेव्हलपर ग्रुप ऑन कॅम्पस - डीवायपीसीईटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग विभागाच्या सहकार्याने 'टेकस्प्रिंट: डायमेन्शन एक्स' या नाविन्यपूर्ण हॅकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. हे हॅकाथॉन १६ व १७ जानेवारी रोजी होणार असून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचारसरणी, तांत्रिक कौशल्ये आणि प्रत्यक्ष समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.**

अंतिम फेरीत सहभागी संघांना सलग २४ तास प्रकल्प विकास, सादरीकरण तसेच तज्ज्ञ परीक्षकांकडून मूल्यांकनाची संधी मिळणार आहे. विजेत्यांना ३० हजार रुपयांचे पारितोषिक, प्रमाणपत्रे आणि विविध सन्मान प्रदान करण्यात येणार आहेत.

हॅकेथॉनचे नेतृत्व गूगल डेव्हलपर ग्रुप ऑन कॅम्पस - डीवायपीसीईटीचे लीड आयुष वसवाडे करत आहेत.

इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ किंवा आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बाल विवाह रोखण्यासाठी आवाहन

**कोल्हापूर ता. १४ (प्रतिनिधी):** बाल विवाह रोखण्यासाठी जागरुकतेने समाज प्रबोधन होणे आवश्यक असून नागरिकांनी देखील स्वतःहून पुढाकार घ्यावा. बाल विवाह रोखण्यासाठी १०९८ या चाईल्ड हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधा किंवा संबंधित बाल कल्याण समितीस अवगत करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुहास वाईंगडे यांनी केले आहे.

# मिरज ऊरूसास प्रारंभ; चर्मकार समाजाचा पहिला गलेफ

**मिरज, ता. १४ (प्रतिनिधी)**
**येथील हजरत ख्वाजा शमणा मीरा आणि हजरत ख्वाजा मोहम्मद मीरा यांच्या ६५१ व्या उरूसाची सुरुवात गुरूवारी पहाटे चर्मकार समाजाच्या वतीने पारंपरिक चादर अर्पण करून करण्यात आली.**

पहाटेच्या वेळी चादर अर्पण करण्याचा मान चर्मकार समाजाला असून, या विधीनंतरच उरूसाला अधिकृत प्रारंभ होतो, अशी अनेक वर्षांपासूनची परंपरा आहे. भजन, कीर्तन आणि कव्वालीच्या गजरात गल्ली परिसरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या पवित्र सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक व इतर राज्यांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या परंपरेमुळे सर्वत्र सामाजिक सलोखा, बंधुत्व आणि एकोप्याचे दर्शन घडले.चर्मकार समाजाने श्रद्धा व भक्तिभावाने चादर अर्पण केल्यानंतर फातेहा, सामूहिक दुवा



**हजरत ख्वाजा शमणा मीरा व हजरत ख्वाजा मोहम्मद मीरा यांच्या उरूसास उत्साहात प्रारंभ झाला आहे.मानाचा पहिला गलेफ चर्मकार समाजाच्या वतीने घालण्यात आला.**

(प्रार्थना) तसेच कव्वालीचे कार्यक्रम पार पडले. उरूस काळात दरवर्षीप्रमाणे यंदाही शेकडो भाविक दर्शनासाठी येणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. उरूसाच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाच्यावतीने कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज आहे.गेल्या ६५१ वर्षांपासून अखंडपणे चालत आलेली ही परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने व उत्साहात जोपासली जात असून समाजात एकोप्याचा संदेश देत आहे.

यावेळी प्रशांत सातपुते, श्रीकांत सातपुते, हिरालाल सातपुते, विशाल सातपुते, उमेश सातपुते, अनिकेत सातपुते, दयानंद सातपुते आदी मानकरी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भीषण अपघातात एकाचा मृत्यू

**इंदापूर,ता.१४**
**उसाचा ट्रॅक्टर आणि स्विफ्ट गाडी यांच्यामध्ये झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे. तर, दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. सदरचा अपघात भिगवण राशीन राज्य महामार्गावर डिकसळ (ता. इंदापूर) गावच्या हद्दीत मंगळवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घडला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.**

अतुल बाबूलाल गजरमल (वय ३८ रा. कात्रज ता. करमाळा, जि. सोलापूर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

विजय हनुमंत शिंदे (वय ३८) आणि दादासो सर्जेराव डुबे (वय ३५, दोघेही रा. कात्रज ता. करमाळा जि. सोलापूर) हे दोघे गंभीररित्या जखमी झाले आहेत.

# प्रत्येकाने निसर्गाशी एकरुप होणे आवश्यक : प्रा.गायकवाड

सांगली,ता.१४(प्रतिनिधी)–

**महाविद्यालयात असणाऱ्या प्राणीविज्ञान विषयाचा अभ्यास करायचा असेल तर तो पुस्तकापेक्षा प्रत्यक्ष निसर्गात जावून केला पाहिजे. प्रत्येकाने निसर्गाशी एकरुप होणे अत्यंत आवश्यक असून आपण जेवढे एकरुप होवू तेवढे निसर्ग आपल्याला भरभरुन देत असतो, असे मत ज्येष्ठ निसर्गप्रेमी प्रा.सुरेश गायकवाड यांनी व्यक्त केले.**

डॉ. पी. बी. पाटील यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त नवभारत शिक्षण मंडळ शांतिनिकेतन आणि प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील सोशल फोरमच्या वतीने प्रा.गायकवाड यांना ब्रिगेडियर सुरेश पाटील आणि विनया घोरपडे यांच्या हस्ते कर्मयोगी पुरस्कार देण्यात आला. एक लाख रुपये आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.शांतिनिकेतन लोकविद्यापीठात लोकरंगभूमीतर्फे लोकोत्सव सुरू आहे.२० जानेवारीपर्यंत लोकोत्सव असणार आहे. संचालक गौतम पाटील यांनी स्वागत केले. प्रा. गायकवाड म्हणाले, उमेदीच्या कालावधीत सुमारे सात वर्षापासून मायणी तलाव परिसराचा अभ्यास केला. तेथे फ्लेमिंगो आणि राजहंस पक्षी स्थलांतर करुन येतात हे यानिमित्ताने सर्वांना समजण्यास मदत झाली.

यावेळी भूमी गायकवाड हिने प्रा. गायकवाड यांच्या निसर्गवेळा विषयी माहिती दिली. रंगावलीकार सचिन अवसर, चित्रकार सत्यजीत वरेकर, मानपत्र लेखक राजेंद्र पोळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रा. शामराव पाटील, ॲड. सतीश पाटील, अशोक सावंत उपस्थित होते. सूत्रसंचालन सदानंद गाडगीळ यांनी केले. याप्रसंगी रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.




प्रा.सुरेश गायकवाड यांना कर्मयोगी पुरस्कार देताना ब्रिगेडियर सुरेश पाटील,विनया घोरपडे शेजारीइतर.

# गळतग्यात शुटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेचे उदघाटन

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)–

**गळतगा (ता.निपाणी)येथील ग्रामदैवत श्री रेणुकादेवी व श्री सरस्वादेवी गादी यल्लम्मा यात्रेनिमित्त गळतगा व्हॉलीबॉल संघ व ग्रामस्थांच्यावतीने शुटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. माजी जि.पं. सदस्य व चिक्कोडी जिल्हा कॉंग्रेस समितीचे उपाध्यक्ष आण्णासाहेब हावले, माजी जि.पं.सदस्य पंकज पाटील व माजी जि.प. सदस्य राजेंद्र वड्डर–पवार, गळतगा ग्रामपंचायत अध्यक्ष अलगोंडा पाटील व महावीर निटवे–चौगुले यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.**

यावेळी आनंद गिंडे, मल्लु रगे, महावीर चौगुले, ग्रा. पं.सदस्य राहुल वाकपट्टे, वर्धमान रगे,धीरज वड्डर, वसंत धारव, डॉ.महावीर चेंडके, बाबु खोत, शितल बेडकिहाळे, अल्ताफ मुल्ला, मिलिंद कोंडेकर, कुमार मरबिट्टे, ॲड.राजु शिंदे, अशोक उगारे यांच्यासह गळतगा व्हॉलीबॉल संघाचे सदस्य, ग्राम पंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. स्पर्धेत निपाणी, चिक्कोडी तालुक्यासह, बेळगांव, इचलकरंजी, कुरुंदवाड, सांगली, जयसिंगपूर, कागल व कोल्हापूर येथील नामवंत संघानी सहभाग घेतला आहे.



शूटिंग हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना आण्णासाहेब हावले, राजेंद्र वडर, पंकज पाटील व इतर

## छ.संभाजी महाराजांचा उद्या राज्याभिषेक सोहळा

निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)–

**स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्यभिषेक सोहळा शुक्रवारी १६ जानेवारी रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक येथे होणार आहे.**

यावेळी शास्त्रोक्त पद्धतीने विधिपूर्वक पूजन होणार असून निपाणी भागातील शिवशंभु प्रेमी सकाळी ६ वाजता हजर राहून अभिषेक करणार आहेत,असे श्रीरामसेना हिंदुस्थान निपाणी चिक्कोडी जिल्हाध्यक्ष ॲड.निलेश हत्ती व पदाधिकारी यांनी सांगितले.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन :– इचलकरंजी येथील सि.स.नं. १४७९६/५१ एकूण क्षेत्र ३१८७ चौ.मी. (याचा रि.स.नं.४५५/२अ, ४५५/२ब, ४५६/२ व ४५६/ब) यासी चतु:सिमा पुर्वेस – सि.स.नं.१४८५१, १४८५२, १४८५३ ची मिळकत, पश्चिमेस – सि.स.नं.१४७९६/५९ ची मिळकत, दक्षिणेस – १८ मी. रुंदीचा डी. पी. रस्ता, उत्तरेस– सि.स.नं. १४४५५ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु: सिमेतील मिळकतीवर मथुरा कॉम्प्लेक्स या नावाने अपार्टमेंटचे बांधकाम चालू असून त्या बांधकामसह संपुर्ण मिळकत.

येणेप्रमाणे वर नमूद मिळकत ही श्री. हिंदुराव तुकाराम शेळके, सुनंदा हिंदुराव शेळके, अतुल हिंदुराव शेळके, विवेक हिंदुराव शेळके, रा. इचलकरंजी यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी अपार्टमेंटचे वाणिज्य व रहिवासी बांधकामसह आमचे अशिलांना खरेदी देणेचे तोंडी ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा दिलेला आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे.

सबब वर नमुद मिळकतीवर कोणाचा काही कायदेशीर हक्क, करार, दावा, कर्ज, लिज, दान, जप्ती आदेश, ॲकीझिशन व रिझर्व्हेशन इ. कसलाही हक्कसंबंध असलेस तो त्यांनी ७ (सात) दिवसात खाली नोटीस प्रसिध्द करणार यांना लेखी स्वरुपात कागदपत्रासहीत कळवावा. मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस मिळकत निर्वेध समजून व्यवहार पुरा केला जाईल म्हणून प्रसिध्द केली नोटीस. ता. १४/०१/२०२६

**ॲड. धीरज पृथ्वीराज पारख**

१०/५, पवन रेडिमेड, तारा हॉटेल जवळ, इचलकरंजी. फोन नं. ९९२२०९९५६७

# अज्ञातांकडून नेटवर्क केबल कापण्याच्या प्रकारामुळे बीएसएनएलची सेवा ठप्प

धामोड,ता.१४( प्रतिनिधी)–

**राधानगरी तालुक्यात बीएसएनएलची सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. गेले चार दिवस नरतवडे–सोळांकूर घाटामध्ये बीएसएनएलची ऑप्टिकल फायबर केबल अज्ञातांकडून कट केल्यामुळे संपूर्ण राधानगरी तालुका तसेच येथूनच कनेक्शन असल्यामुळे गगनबावडा तालुक्यातील काही भागातील बीएसएनएलचे नेटवर्क पूर्णपणे बंद झाले होते. त्यामुळे शासकीय कामे, बँक व्यवहार यासह सर्व सेवा चार दिवस ठप्प झाली होती.**

तालुक्यात केबल कापण्याचे प्रमाण वाढले असून बीएसएनएलने पेट्रोलिंगची टीम कार्यरत केली आहे. असे कृत्य करताना सापडेल त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा बीएसएनएलने दिला आहे. तुरंबे, सरवडे, नरतवडे, सोळांकूर या भागात जाणीवपूर्वक वारंवार केबल कापण्याचे प्रकार घडत आहेत. गतवर्षी तुळशी – धामणी खोऱ्यातही असे प्रकार घडले होते. ग्राहक स्पर्धेतून असा घटना घडविल्या जात असल्याचे बोलले जाते. या भागातीलच काही व्यक्ती हे काम करत असल्याचा बीएसएनएलचा कयास आहे. त्याचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती धामोड बीएसएनएल विभागातून मिळाली आहे.

दरम्यान, राधानगरी बीएसएनएलचे उपमंडल अभियंता प्रशांत माणगांवकर यांनी सांगितले की, राधानगरी तालुक्यात बीएसएनएल नेटवर्क केबल कापण्याचे प्रमाण वाढले आहे. बीएसएनएलने पेट्रोलिंगची टीम कार्यरत केली असून असे कृत्य करताना आढळल्यास पोलिसांत तक्रार देण्यात येईल.

# भादोलेच्या मातीत कबड्डीचा रणसंग्राम

## ७७ संघांची झुंज;'बाल शिवाजी व शिवमुद्रा संघांची बाजी

भादोले,ता.१४(वार्ताहर)–

**भादोले (ता. हातकणंगले) येथील भादोले क्रीडा मंडळातर्फे आयोजित भव्य कबड्डी स्पर्धेला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत कोल्हापूर व सांगली जिल्हातील ७७ संघांनी सहभाग नोंदविला.**

७० किलो वजनी गटात शिरोळच्या बाल शिवाजी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. सांगलीवाडीच्या तरुण मराठा संघ उपविजेता ठरला, तर हेर्लेच्या जय शिवराय संघाने तृतीय क्रमांक मिळवला.४५ किलो वजनी गटात शिवमुद्रा कौलव संघाने प्रथम क्रमांक पटकावला. जय शिवराय संघाने द्वितीय, तर इचलकरंजीच्या बालभारती संघाने तृतीय क्रमांक मिळवला.कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने प्रो–कबड्डी नियमानुसार व अनुभवी पंचांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा झाल्या. लाल मातीच्या मैदानावर खेळण्याचा आनंद खेळाडूंच्या चेहऱ्यावरून स्पष्टपणे दिसून येत होता.यावेळी आदर्श संघ,अष्टपैलू खेळाडू उत्कृष्ट चढाई,उत्कृष्ट पकड यांना वैयक्तिक पुरस्कार देण्यात आला.महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत यश मिळविलेल्या भादोलेतील अधिकारी यांचा विशेष सत्कार झाला.भादोले क्रीडा मंडळाने अनेक वर्षांची कबड्डी परंपरा यंदाही यशस्वीपणे जपली.

स्पर्धेचे उद्घाटन आम.डॉ. अशोकराव माने यांच्या हस्ते झाले. बक्षीस वितरण वडगाव पोलीस स्टेशनचे निरीक्षक प्रमोद शिंदे यांच्या हस्ते झाले.यावेळी सुरेश पाटील, डॉ. मिलिंद हिरवे, गुरुप्रसाद यादव, धोंडीराम पाटील, हिम्मत पाटील, निलेश पाटील, माजी आम.राजूबाबा आवळे, अजय थोरात, वैभव कांबळे, प्रकाश माने, सचिन पाटील, दिलीप पाटील, शिवाजी माने, अशोक पाटील, कपिल पाटील, राहुल पाटील, नानासो जाधव, रोहित पाटील, अभिजीत पाटील, हिम्मत पाटील, निलेश पाटील तसेच विविध गावांचे सरपंच व नामवंत खेळाडू उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वीतेसाठी सचिन पाटील, गजानन पाटील, अविनाश पाटील, रोहित पाटील, महादेव बड्डू, समीर विजापूरे, इर्शाद मकानदार, सौरभ लोहार आदींनी योगदान दिले.प्रास्ताविक व समालोचन दयानंद पाटील व विनायक जामदार यांनी केले.आभार चेतन चव्हाण यांनी मानले.



प्रथम क्रमांकांचे पारितोषिक स्वीकारताना शिवमुद्रा कौलव संघ. सोबत पो. नि.प्रमोद शिंदे, अशोक पाटील, सुरेश पाटील, कपिल पाटील, अभिजीत पाटील, राहुल पाटील, हिम्मत पाटील आदी.

## जाहिर नोटीसीस उत्तर

तमाम लोकांना व वित्तीय संस्थांना सदर जाहिर उत्तरी नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे यांनी दि १४/०१/२०२६ इ. रोजी दै. महासत्ता मध्ये दिलेल्या नोटीसीस आमचे अशिल मंगल आनंदा पाटील रा. रुई यांचेमार्फत जाहिर उत्तर वजा इशारा असे की,

मिळकतीचे वर्णन–

मौजे कबनूर येथील गट नंबर ६९६ पैकी क्षेत्र ०.१०.०० आर ची शेतजमीन मिळकत यासी चतु: सिमा पूर्वेस–वंदना चव्हाण यांची मिळकत, पश्चिमेस– दीपक व रामराव कृष्णा फराडे यांची मिळकत, दक्षिणेस –२० फूटी सरकारी रस्ता, उत्तरेस –संजय क्षितिजा वगैरे यांची मिळकत. या क्षेत्र मिळकती संदर्भातील जाहिर नोटीसीमधील मजकूर पूर्णत: खोटा चुकीचा, लबाडीचा आहे.

सदरची मिळकत संदर्भात मालक यशवंत भाऊ फराडे रा. कबनूर यांनी आमचे अशिलांच्याकडून भरीव रक्कम घेऊन यापूर्वी करार केलेला आहे. अशी परिस्थिती असताना सदरची मिळकत दुसऱ्या व्यक्तीस परस्पर विक्री करत आहेत.

सबब आमचे अशिलांनी वरील नमूद मिळकती बाबत वैध करार केला असून, इतर कोणीही कोणत्याही प्रकारे खरेदी– विक्रीचा व्यवहार केलेस तो बेकायदेशीर होईल. तसेच सदरचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही म्हणून दिले नोटीसीस उत्तर.

म्हणून दिले जाहिर नोटीसीस उत्तर दि १४/०१/२०२६

**ॲड. अजित शंकर लटके**

लक्ष्मीनगर, गल्ली नं. ३, कबनूर. मो. ७७०९६४५८९७.

# हुतात्मा दिन गांभीर्याने पाळा

निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)–

**कर्नाटक –महाराष्ट्र सीमा प्रश्नाच्या संघर्षात निपाणीच्या स्व. कमळाताई मोहीते यांचा गोळीबारात बळी गेला. हा दिवस मराठी भाषिक प्रतिवर्षी हुतात्मा दिन म्हणून पाळतात.तसेच सीमालढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन करतात. या वर्षी शनिवारी १७ रोजी हुतात्मा दिन गांभीर्याने पाळावा असे आवाहन महाराष्ट्र एकीकरण समितीने केले आहे.**

सकाळी १०:३० वाजता बॉरिस्टर नाथ पै चौक (बेळगांव नाका) येथे व ११ वाजता साखरवाडी येथे मोहीते यांच्या बलीदानस्थळी अभिवादन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

कार्यक्रमास मराठी भाषिक, शिवसेना, महाराष्ट्र एकीकरण समीती,युवा समिती शहर व ग्रामीण परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे. २१ जानेवारीला सीमाप्रश्नाच्या सुनावनीस सुप्रिम कोर्टात सुरूवात होत असून या पार्श्वभूमीवर मराठी भाषिकांनी आपली ताकद दाखविणे आवश्यक आहे.

## जाहिर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ५०४ पैकी प्लॉट नं. ५+१३+२२एफ चे क्षेत्र – ६१ – ४५ चौ. मी. खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस–महाजन यांची मिळकत, पश्चिमेस – १५ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस – चौगले यांची मिळकत, उत्तरेस– प्लॉट नं.५+१३+२२सी ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही प्रविण प्रकाश रेडेकर यांचेकडून परशराम रामचंद्र कोरवी रा. इचलकरंजी यांनी वटमुखत्यारपत्राने घेतली असून त्यांनी आमचे अशिलाशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारुन त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ.वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी .म्हणुन दिली नोटीस. सही

ता. १४/०१/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**

पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफिस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी. मो. ७८२०९०९७०५

## खरेदीपुर्व जाहिर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन :– जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी मौ. कोरोची ग्रामपंचायत हद्दीतील मिळकतीचा क.ग.नं. ६३८/६३९/१ क्षेत्र हे.३ – ९१.३० आर आकार रु. ९–१० पैसे यापैकी बिगरशेती प्लॉट नं. ८ / अ क्षेत्र ५२५ चौ. फुट याचे ४८.७९ चौ.मी.ची खुली जागा व यामधील आरसीसी इमारत मिळकत याचा मालमत्ता नं. ७६८९ असून यामधील लाईट, पाणी कनेक्शन सह यांसी चतु: सिमा –पुर्वेस– सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. १५ ची मिळकत, पश्चिमेस – २० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस– सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. ८/ब ची मिळकत, उत्तरेस– सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. ७ ची मिळकत.

२) वर नमुद केलेली मिळकत ही श्री विजय काशिनाथ बदी, रा. इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारुन मिळकत तोंडी करारपत्राने विक्री करणेचे ठरलेले आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज,आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खाली नमुद केले पत्त्यावर लेख कळवावे, म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. १४/०१/२०२६ इ. रोजीचे

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**

रा.१७/२९४, पुजारी मळा, राजमाता नगर, इचलकरंजी. मो. ९३२६०२२३८५.

## जाहिर नोटीस

मौजे कबनूर येथील इमनपा मध्ये नव्याने समाविष्ट झालेले शहापूर – कबनूर वि. याचा सि.स.नं. २३२५३ (क.ग.नं. ७८/१२५) याचे एकुण क्षेत्र ६२८ चौ. मी. यापैकी क्षेत्र ३९.८४ चौ.मी. याचे ४२८.६७ चौ. फुटाची जागा व त्यावरील घर मिळकत सर्व. यांसी चतु:सिमा– पूर्वेस – २५ फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस बद्रुन्निसा खाटीक यांची मिळकत, दक्षिणेस– श्री. संभाजी पाटील यांची मिळकत व उत्तरेस– अनुसया कोरवी यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु: सिमेतील मिळकत ही श्री. सोहेल रहिमतुल्ला खाटीक रा. जवाहरनगर, इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची मिळकत असून श्री. सोहेल खाटीक यांनी सदर मिळकतीचे खरेदीपुर्व करारपत्र आमचे अशिलांना संचकार रक्कम स्विकारुन करुन दिलेले आहे. सदर मिळकतीवर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.इचलकरंजी शाखा–इंडस्ट्रियल इस्टेट या बँकेचा बोजा असुन या व्यतिरिक्त अन्य कोणाचा हक्क, करार, दावा, आरक्षण, शासकीय देणे, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिद्धीपासुन ०७ (सात) दिवसाचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. तारीख – १४/०१/२०२६

**ॲड. राहुल मानसिंग महाजन**

राधाकृष्ण टॉकीज चौक, कापड मार्केट हौसिंग सोसा. रोड, इचलकरंजी मो. ९८८१९७९८८

## खरेदीपुर्व जाहिर नोटीस

मिळकतीचे वर्णन – मौजे यड्राव ग्राम पंचायत हद्दीतील क. गट नं. ४७३ /अ/१/३९ बिगरशेती प्लॉट नं. ३९ याचे क्षेत्र ३६९–१० चौरस मिटर याचे क्षेत्र ३९७१–५१ चौरस फूट ची खुली प्लॉट जागा मिळकत सर्व . यांसी चतु:सिमा पुर्वेस :– ६ मिटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस :– लागुन प्लॉट नं. ४०ची मिळकत, दक्षिणेस :– पद्मावती डेव्हलपर्स यांची मिळकत, उत्तरेस :– प्लॉट नं. ३८ ची मिळकत.

सदरची मिळकत ही सौ. तृप्ती नरेश मालू, रा. इचलकरंजी. यांचे मालकीची व वहिवाटीची असून त्यांनी आमचे मित्र यांना कायम व खुष खरेदी देणेचे ठरवून खरेदीपूर्व करारपत्र करून संचकार रक्कम स्विकारली आहे व सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा त्यांनी निर्वाळा दिलेला आहे सबब वर नमुद केले मिळकतीबाबत करार, मदार तसेच कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, तारण, गहाण, दान, हिस्सा, पोटगी, चालु दावा, अँटॅचमेंट, आरक्षण रिझर्व्हेशन, इजमेंट वगैरे हितसंबंध असलेस सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे नंतर कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक १४–०१–२०२६ इसवी.

**श्री.एस.डी. दरीबे**

बाँण्ड रायटर ४/१५०, झेंडा चौक, इचलकरंजी. मो. ९४०४९५४२८२.

## जाहिर नोटीस

मिळकतीचे वर्णन :– जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी मौजे कोरोची येथील :–

क.ग.नं.६५३ पैकी बिगरशेती प्लॉट नं. १४ क्षेत्र ४७.६७ चौ.मि.ची खुली जागा, ऑन लाईन ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे.आर.चौ. ०.००.४८ ची खुली मिळकत सर्व. यासी चतु:सिमा याचे पूर्वेस : प्लॉट नं. १३ ची पाल यांची मिळकत, पश्चिमेस : प्लॉट नं. १५ ची गोरे यांची मिळकत, दक्षिणेस : १२ फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस : आत्माराम चव्हाण यांची मिळकत, येणे प्रमाणे चतु: सिमेतील खुली जागा आतील तदंगभुत वस्तुसह व इजमेंटी हक्कासह सर्व. सदर मिळकत सौ. रुक्साना अस्लम इचलकरंजी रा.बंडगर माळ इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असून सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरविले असून त्यांनी संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कसलाही हक्क, दावा, पोटगी, लिज बक्षिसपत्र तारण, आरक्षण, वहीवाटी बाबत हरकत असलेस सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसात खालील पत्त्यावर कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी तक्रार नोंदवावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे आशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुरा करतील याची समज असावी. म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक १४/०१/२०२६.

**ॲड. बाबासो एम. पाटील**

नोटरी पब्लिकसो (भारत सरकार) १७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी. मो. ९२२६८८७००१.

## जाहिर नोटीसीस हरकत

सर्व तमाम लोकांना कळणेकरीता ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे, रा.३/३५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, इचलकरंजी यांनी ता. ०७/०१/२०२६ इ. रोजी दैनिक महासत्ता मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिर नोटीसीस हरकत तथा उत्तर असे की,

कबनूर गट नं.६१० पैकी क्षेत्र हेक्टर ०.३०.४५ आर, आकार रू.०.५६ पैसे ची जमीन ही पवनकुमार विजय आरोरा व चेतनकुमार विजयकुमार आरोरा यांचे सामाईक मालकी वहिवाटीची असून पवनकुमार आरोरा यांच्या हिस्सेची १/२ मिळकत याचे क्षेत्र हेक्टर ०.१५.२२ आर व यातील हेक्टर ०.५ आर ची बंदिस्त कारखाना शेड लाईट कनेक्शन व बोर कनेक्शनसह ही मिळकत आमच्या अशिलांना कायम खरेदी देणेचे ठरवून ता.१६/०२/२०२१ इ.रोजी लेखी करार लिहून देऊन रक्कम रू.५,००,०००/– संचकार स्विकारला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल वरील मिळकत खरेदी करून घेणेस सदैव तयार होते व आहेत. अशा स्थितीत जाहिर नोटीसीतील मिळकत ही चेतन विजयकुमार आरोरा यांच्या एकट्याच्या मालकीची नाही व त्याला सर्व मिळकत विक्री करण्याचा हक्क व अधिकार नाही. तसेच, करारातील शर्ती अटी प्रमाणे नोंदणीकृत वाटणीचा दस्त करून मिळकत विक्री करण्याचे ठरले असल्याने नोंदणीकृत वाटणीपत्र झालेचे जाहीर नोटीसीत नमूद नाही. सबब, दिलेली नोटीस ही आमचे अशिल यांनी खरेदी कराराने देऊ केलेल्या मिळकतीवर व खरेदी घेण्याच्या हक्कावर बंधनकारक नाही. सबब, बेकायदेशीर नोटीसीआधारे कोणीही खरेदी विक्री व्यवहार करू नये. केल्यास व्यवहार बेकायदेशीर होणार आहे. याची नोंद घ्यावी. म्हणून दिली हरकत सही ता.१३/०१/२०२६.

**ॲड. विश्वास पां. चुडमुंगे**

पत्ता– ४/२००, व्यंकटेश अपार्टमेंट, कोर्ट बिल्डींग मागे, इचलकरंजी. मो. ९४२२०४३६५७.

## जाहिर नोटीस

मिळकतीचे वर्णन:–

''जिल्हा – कोल्हापूर, तालुका – हातकणंगले येथिल मा. दुय्यम निबंधकसो, वर्ग २ इचलकरंजी यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे कोरोची येथिल क. ग. नंबर ७७३ याचे क्षेत्र हे. ३.७२.०० आर, यापैकी हे. ०.०१.३६ आर म्हणजेच १३६ चौरस मिटरची खुली जागा (खरेदी पत्राप्रमाणे क्षेत्र १३५.६८ चौ. मिटर) व यावरील कोरोची ग्रामपंचायत कोरोची यांचेकडे मिळकत नंबर २३७० (याचा जुना मिळकत नंबर ३४३९) ने नोंद असलेली मिळकत याची चतु: सिमा–

पूर्वेस – ४० फुट रूंदीचा रस्ता

पश्चिमेस – श्री. आगलावे यांची मिळकत

दक्षिणेस– श्री. विलास भरडे व सद्या श्री. दत्ता पाटील यांची मिळकत

उत्तरेस– श्री. मोहन शिंदे यांची मिळकत

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत व त्यातील जल, तरू काष्ठ, पाषाण, तदंगभूत वस्तुसह व इजमेंटी हक्कासह सर्व यास यापूढे मिळकत असे संबोधले आहे.

वर नमुद केलेली मिळकत ही सौ. पद्मा मोहन शिंदे यांचे मालकीची व वहीवाटीची आहे. त्याच प्रमाणे सौ. पद्मा मोहन शिंदे या वर नमुद मिळकत ही ''श्रीधर मोहन शिंदे'' तर्फे प्रो. प्रा श्री. श्रीधर मोहन शिंदे यांचे कर्जास नांदणी सहकारी बँक लि. नांदणी, शाखा– कबनूर या बँकेस तारण देणार आहेत. सबब या जाहिर नोटीसीने सर्वांना कळविणेत येते की, सदर वर नमूद केले मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क संबंध, करार, अधिकार, बोजा वगैरे असलेस तो त्यांनी आजपासून ०७ दिवसाचे आत आम्हास वर नमुद केले पत्त्यावर कागदपत्रांसह लेखी पटवून द्यावे. सबब तदनंतर येणारी हरकत, तक्रार वगैरे आमचे आशील बँकेवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहिर नोटीस दिनांक १४/०१/२०२६

**ॲड. मंजूनाथ व्ही. भाट**

कोर्ट समोर, वन वे रोड, जामा मस्जिदशेजारी, इचलकरंजी. मो. ८४८४९८४०८४.

# तांत्रिक प्रगती सोबत सामाजिक भान आवश्यक

-डॉ.जे.के.पवार

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**तांत्रिक प्रगती सोबत सामाजिक भान आवश्यक आहे. शिक्षणसंस्थांची भूमिका ही केवळ कौशल्य निर्मिती असू नये तर मूल्य निर्मितीची असायला हवी. समाजामध्ये बदल घडवायचा असेल तर प्रत्येकाने स्वत: पासून परिवर्तन सुरू केले पाहिजे; हीच समाज सुधारकांच्या विचारांची खरी प्रस्तुतता आहे.**



विकारमुक्त आणि विकासयुक्त समाजनिर्मितीसाठी आजच्या काळातही समाजसुधारकांच्या विचारांची प्रस्तुतता अधिक तीव्रतेने जाणवते, असे विचार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व लेखक प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांनी भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये बोलताना मांडले. भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल, कोल्हापूर यांच्यावतीने भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त आणि भारती विद्यापीठाचे कार्यवाह व भारती अभिमत विश्वविद्यालयाचे प्र-कुलगुरु आम.डॉ.विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित डॉ.पतंगराव कदम स्मृती व्याख्यानमालेत 'समाज सुधारकांच्या विचारांची आजच्या काळातील प्रस्तुतता' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी डॉ. पवार प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

आज आपण २१ व्या शतकात वावरत असून प्रगत विज्ञान-तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या या युगात आपण भौतिक प्रगतीत उच्चांक गाठले आहेत. तरीही सामाजिक विषमता, जातिभेद, स्त्री-पुरुष असमानता, अंधश्रद्धा, गरिबी, अन्याय-अत्याचार या आणि अशा समस्या संपलेल्या नाहीत; असेही डॉ. पवार यांनी सांगितले.त्याचबरोबर त्यांनी महात्मा फुले,महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशा अनेक समाजसुधारकांच्या विचारांचा आढावा घेतला.शिक्षण, समता, सामाजिक न्याय, मानवी मूल्ये आणि विवेकशीलता या तत्त्वांची आजच्या डिजीटल व तंत्रज्ञानप्रधान युगात अधिक आवश्यकता असल्याचे सांगितले.आजच्या काळातील विचारांच्या प्रदूषणावर समाजसुधारकांचे विचारच जालीम उपाय असल्याचे त्यांनी आधोरेखित केले.

स्वागत व प्रास्ताविक ईटीसी विभागप्रमुख डॉ.के.आर.देसाई यांनी केले. आभार प्रा.विकास पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.प्रियदर्शनी माळी यांनी केले. प्रा.डॉ.व्ही.आर.घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, सेवक वर्ग आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## ॲड.वर्षा देशपांडे यांना पुरस्कार जाहीर

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्टतर्फेयावर्षीचा माऊली आनंदी पुरस्कार महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, लिंगसमता, कायद्याविषयक जनजागृती तसेच समाज हितासाठी केलेल्या दिर्घकालीन, निर्भिड व प्रेरणादायी कार्याबद्दल सातारा येथील ॲड.वर्षा लक्ष्मणराव देशपांडे यांना देण्यात येणार असल्याची माहिती विश्ववती आयुर्वेदिक निरंजनदास सांगवडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

यावेळी विश्ववती ट्रस्टचे अध्यक्ष आनंदनाथ सांगवडेकर व विश्वस्त रामाराया सांगवडेकर उपस्थित होते.दरवर्षी समाजातील दीन, दुबळ्या,अनाथ व दुर्लक्षित समाजबांधवांची माता होऊन निरपेक्ष सेवा करणाऱ्या व्यक्तींचा माऊली आनंदी पुरस्काराने सन्मान करण्यात येतो.

# रेन हार्वेस्टिंगसारखे उपक्रम राबविण्याची गरज

सौ.भक्ती कुलकर्णी

इचलकरंजी,ता.१४-

**देशभक्त बाबासाहेब खंजिरे शिक्षण संस्थेचे दि न्यू हायस्कूल व ज्युनि.कॉलेज इचलकरंजी येथे राष्ट्रीय हरित सेना व निसर्ग क्लब यांच्यावतीने व सामजिक वनीकरण विभाग कोल्हापूर परिक्षेत्र हातकणंगले यांच्या अंतर्गत चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.**



दि न्यू हायस्कूल व ज्युनि.कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना प्रा.सौ.भक्ती कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित प्रमुख मान्यवर.

यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून न्यू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कोल्हापूर येथील प्रा.सौ.भक्ती कुलकर्णी या उपस्थित होत्या.त्यांनी पाण्याचे जीवनातील महत्व मुलांना पटवून दिले.पाण्याचा काळजीपूर्वक व काटकसरीने वापर करावा,असा संदेश त्यांनी दिला.शिवाय वाया जाणाऱ्या पावसाच्या पाण्याचा वापर कसा करावा,याची घ्यावयाची काळजी व त्यावर उपाय म्हणून रेन हार्वेस्टिंग यासारख्या उपक्रमाची गरज आहे,असे त्यांनी आपल्या मनोगतामधून सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष हायस्कूलचे मुख्या.बी.ए.कोळी यांनी वातावरणातील होणारे बदल थांबवायचे असेल तर पर्यावरणाचे संवर्धन करणे काळाजी गरज आहे. यासाठी वृक्षारोपण सारख्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग वाढवावा,असे त्यांनी मत व्यक्त केले.

यावेळी पवनकुमार गर्ग, किशोरकुमार येळे यांनी मार्गदर्शन केले. सौ.एल.एस.सुर्यवंशी,प्रभाकर पवार, वनपाल सौ.सुनीता मन्तोडे यांच्या हस्ते हर्षद पट्टणकर,धैर्यशिल कोळेकर, हर्षवर्धन लोंढे, सिद्धी बिरंजे, प्रतीक्षा जाधव या चित्रकला स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. एस. एम. शिंदे यांनी सुत्रसंचालन केले.आभार पी.एस.कोळेकर यांनी मानले.

## महेश क्लबतर्फे रविवारी मोफत नेत्रतपासणी शिबीर

इचलकरंजी,ता.१४-

**महेश क्लब ऑफ इचलकरंजी,स्व.श्रीमती राजदेवी शिवप्रसादजी खटोड आणि नॅब नेत्र रूग्णालय मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने इचलकरंजीत मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन रविवार ता.१८ जानेवारी रोजी केले आहे.**

सदरचे शिबीर महेश क्लब ऑफ इचलकरंजी,श्री तुकाराम दादोबा आरगे उद्यान ,मंगलमूर्ती चित्रमंदिर जवळ,इचलकरंजी या ठिकाणी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत होईल.या शिबीरामध्ये मिरज येथील नॅब नेत्र रूग्णालयाचे नामवंत नेत्र तज्ञांमार्फत तपासणी केली जाणार आहे.तपासणीनंतर मोतीबिंदूसाठी पात्र रूग्णांवर मोफत शस्त्रक्रिया नॅब नेत्र रूग्णालय मिरज येथे केली जाणार आहे.मोतीबिंदूसाठी निवड केलेल्या रूग्णांच्या सर्वप्रकारच्या नेत्र शस्त्रक्रिया आधुनिक पद्धतीने दुर्बिणाखाली मोफत केल्या जाणार आहेत तसेच गॉगल्स व औषध मोफत दिले जातील.तरी इचलकरंजी व परिसरातील इच्छुक व गरजू रूग्णांनी या नेत्र शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रोजेक्ट कमिटी चेअरमन गिरीधारीलाल काबरा यांनी केले आहे.इच्छुक रूग्णांनी आपली नावे महेश क्लब ऑफ इचलकरंजी येथे नोंदवावी असे आवाहन करण्यात आले आहे.



जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनातील यशस्वी विद्यार्थिनीस मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उर्दू शाळा क्र.५७ सुयश

इचलकरंजी,ता.१४

**मॉडर्न सैनिक शाळा,आळते येथे आयोजित करण्यात आलेल्या ५३ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम महानगरपालिका उर्दू शाळा क्र.५७ च्या विद्यार्थिनीने यश संपादन केले आहे.**

या विज्ञान प्रदर्शनात एकुण १८४ विज्ञान मॉडेल्स सादर करण्यात आली होती.उद्योन्मुख तंत्रज्ञान या वियषांतर्गत आपत्ती व्यवस्थापन या उपविषयावर विद्यार्थिनी आलिया तौफिक तेहसीलदार हिने जीवन बचाव मशीन हे अभिनव व समाजोपयोगी मॉडेल सादर केले.या उत्कृष्ट सादरीकरणाच्या आधारे आलिया तेहसीलदार हिने उच्चप्राथमिक गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावला असून तिची नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे.या विद्यार्थिनीस शिक्षक असीम शहापुरे,मुख्या.शाकेरा पटेल तसेच रूबीना कोचरगी यांचे मार्गदर्शन लाभले.

## ढोणेवाडीत आजपासून हरिनाम सप्ताह

ढोणेवाडी,ता.१४(प्रतिनिधी)

**ढोणेवाडी येथे श्री अष्टविनायक सोंगी भजनी,श्री महालक्ष्मी दिलबहार सोंगी भजनी मंडळ, ओंकार सोंगी भजनी मंडळ यांच्यावतीने गणेश जन्मोत्सवनिमित्त गुरुवार ता.१५ ते ता.२२अखेर ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम सप्ताह व भव्य सोंगी भजन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.**

तरी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन गणेश जन्म सोहळा कमिटी गणेश मंदिर ढोणेवाडी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# कौलव येथे पाणंद रस्ता कामाचा शुभारंभ

भोगावती,ता.१४(प्रतिनिधी)-

**जिल्हा परिषदेच्या पाणंद रस्ते दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत अभिषेक डोंगळे यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या कौलव परिसरातील पाणंद रस्ता दुरुस्ती कामाचा शुभारंभ भोगावती शिक्षण मंडळाचे संचालक अभिषेक डोंगळे यांच्या हस्ते व अमृता डोंगळे यांच्या उपस्थितीत झाला.**



या परिसरातील कौलव, सिरसे,आमजाई,व्हरवडे,बरगेवाडी पिंपळवाडी या गावातील पाणंद रस्ते दुरुस्तीसाठी अभिषेक डोंगळे यांच्या विशेष प्रयत्नातून चार कोटी छप्पन लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. या गावांमधील पाणंद रस्त्यांची दुरुस्ती झाल्यामुळे ग्रामस्थांना चांगल्या प्रकारच्या दळणवळणाची सुविधा उपलब्ध होऊन शेतकऱ्यांची गैरसोय दूर होणार असल्याचे अभिषेक डोंगळे यांनी सांगितले. यावेळी सुभाष पाटील, अशोक पाटील, वसंतराव पाटील, आ.रा.पाटील, निकिता कांबळे, सरपंच अमृता चौगले, बाजीराव चौगले, राजेंद्र चौगले, मुकुंद पाटील, शिवाजी कांबळे, बापूसाहेब लिंगडे, सुरेश ढेरे, महादेव जाधव, सुभाष जाधव, युवराज पाटील, नेताजी जाधव, तुकाराम जाधव, संतोष पोपले, रणजित पाटील,केरबा पाटील, विजय पाटील, मनोज पाटील, दशरथ पाटील, शहाजी पाटील, अशोक पाटील, सुरज पाटील, रंगराव पाटील, संजय बरगे आदी उपस्थित होते.

# सुलतानपुरे शाळेत विविध राज्यांचे प्रदर्शन संपन्न

इचलकरंजी,ता.१४-

**वीरशैव उत्कर्ष मंडळ, संचलित,श्री मृगेंद्रआण्णा सुलतानपुरे प्रा.वि.मं श्री ज्ञानबातात्या दत्तवाडे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज आणि डी.एम.बिरादार बाल विद्यामंदिर इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने इ.१ ली ते ८ वी पर्यंतच्या वर्गाचे विविध राज्यांचे प्रदर्शन व बालवाडी विभागाचे ग्रहांची ओळख व जीवन व्यवहार प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले.**

या प्रदर्शनाचे प्रमुख म्हणून सेवानिवृत्त न्यायाधीश दुंडाप्पा हातरोटे हे उपस्थित होते.त्यांच्या हस्ते सर्व वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.या प्रदर्शनात महाराष्ट्र,आसाम, उत्तरप्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश,बिहार व तामिळनाडू या राज्यांची वेशभूषा,खेळ,पर्यटन स्थळे, मंदिरे,नृत्य,खानपान याविषयी देखावा करण्यात आला होता. कार्यक्रमास प्रवीण फाटक,अशोक पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास गजानन सुलतानपुरे, एस.टी. खोत, श्री.मुरदुंडे, श्री. तोडकर, सौ.हेमल सुलतानपुरे, उपाध्यक्षा सौ.शहापुरे, संचालिक सौ.धड्डु, श्री.कित्तुरे, श्री.पाटील, श्री.अनुरे उपस्थित होते.



## जयसिंगपूरात रविवारी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

जयसिंगपूर,ता.१४ -

**जयसिंगपूर येथे दक्षिण भारत जैन सभेचे ग्रॅज्युएटस असोसिएशन यांच्यावतीने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा रविवार ता.१८ रोजी सकाळी ९.३० वाजता सोनाबाई इंगळे सभागृह, गल्ली नंबर ४ येथे आयोजित केला आहे.**

या मेळाव्यात ज्येष्ठ करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर (पुणे) हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील आहेत.या कार्यशाळेचा लाभ विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा,असे आवाहन दक्षिण भारत जैन सभा, ग्रॅज्युएटस असोसिएशनने केले आहे.

# एकलव्य स्कूलमध्ये चित्रकला स्पर्धा उत्साहात

इचलकरंजी,ता.१४-

**अखिल भारतीय रंगोत्सव चित्रकला स्पर्धा येथील एकलव्य स्कूलमध्ये उत्साहात पार पडल्या.यावेळी केंद्रावर रंगोत्सव सेलिब्रेशन आंतरराष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**

यामध्ये विविध शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. कोल्हापूर जिल्ह्यातील शाळांकडून याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये कोल्हापूर परिसरातील ६० शाळांनी भारतस्तरीय स्पर्धेत भाग घेतला. २५ शाळा भारतस्तरीय फेरीत सक्रियपणे सहभागी झाल्या असून या शाळांमधून ३०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून विजय जाधव, सौ.प्रज्ञा बाकलीवाल, प्रथमेश इंदुलकर, संदीप नाईक,अश्विनी नाईक, सरस्वती एन.देवडा हे उपस्थित होते.



एकलव्य स्कूलमध्ये आयोजित सत्कार प्रसंगी विजय जाधव प्रथमेश इंदुलकर, संदिप नाईक व इतर प्रमुख मान्यवर.


आम्ही रसिक आयोजित... (सहकार्य-अ.भा.मराठी नाट्य परिषद इचलकरंजी शाखा)
आजच गुरु. १५ जाने. रात्री ठीक ९.३० वा. घोरपडे नाट्य. इचल.
नव्या दमाच्या आणि उत्स्फूर्त व दर्जेदार कलाकारांची
सर्वच रसिकांना गुंतवून टाकणारी हास्य स्फोटक धमाल नाट्यकृती



सूत्रधार प्रणित बोडके निर्मिती श्रीपाद पद्माकर, दिलीप जाधव संपर्क- ९७६७०८६७५८, ९१२०८८५७३०
तिकीट दर - ५००, ४००, ३००/- | तिकीट विक्री १२ जानेवारीपासून नाट्यगृहावर.
ऑनलाईन बुकींग bookmyshow | फोन बुकींग 9579573855 | काही जागा राखीव

श्रीहरी
शुक्रवार, ता.०९/०१/२०२६ पासून
दुपारी १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
हवस
प्रौढांसाठी सायं. ७ वा.
A ऑफिस गर्ल A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ९ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
द लास्ट मुज
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार ता. १६ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज १ खेळ १२ वा. | रोज ३ खेळ ३*६*९ वा.



क्रांतिज्योती विद्यालय (मराठी)



अगं अगं सुनबाई ! काय म्हणताय सासूबाई ? (मराठी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
शुक्रवार ता. ९ पासून रोज ४ खेळ
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.




कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.९ पा
१२,३,६,९ वा




गुरु शुक्रवार ता.९ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.१५ * ३.३० * ६.३० व ९.३० वा.
प्रभासचा फुल्ल फॅमिली एंटरटेनमेंट




RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow




"रप्पाटा" (मराठी) 10:15 AM, 01:15 PM 04:00 PM, 07:00 PM 09:45 PM
"द राजा साब" (हिंदी) 11:30 AM, 03:30 PM 06:45 PM, 10:30 PM
"धुरंधर" (हिंदी) 11:45 AM, 06:30 PM, 10:15 PM
"क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम" (मराठी) 03:45 PM
आता कोणताही शो पहा फक्त 70/-* मध्ये

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11




क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम (MAR) (U/A) 01.15, 04.45, 07.45, 10.00pm
रप्पाटा (MAR) (U/A) 11.00am, 02.30, 07.30, 10.30pm
दि राजा साब (HIN) (U/A) 11.00am, 06.15pm
धुरंधर (HIN) (A) 02.30, 04.00, 10.00pm
मतदान करून लोकशाही साजरी करूया फोर्चून सिनेप्लेक्स सोबत.
आज पहा कोणताही शो फक्त ७० रुपयात.

# डांबरी रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी कॉंक्रीटचा वापर

## शिवसेनेचा आक्षेप; नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ होत असल्याचा आरोप

महाबळेश्वर,ता.१४(वार्ताहर)

**महाबळेश्वरकडे जाणारा लिंगमळा-महाबळेश्वर हा अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा डांबरी रस्ता पावसाळ्यानंतर मोठ्या प्रमाणात खड्डेमय झाला होता. त्यानंतर महाबळेश्वर येथे राज्यपाल दौऱ्यावेळी घाईगडबडीत तयार केलेला हा रस्ता पंधरा दिवसात पुन्हा उखडून गेला होता. खराब झालेल्या रस्त्यावर डांबराऐवजी कॉंक्रीटच्या मलमपट्टीमुळे रस्ता आणखी खराब झाल्याने वाहन चालक, स्थानिक नागरिक व पर्यटकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मात्र या रस्त्याच्या दुरुस्तीच्या नावाखाली सुरू असलेल्या कामात तांत्रिक नियमांना छेद दिला जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) ने केला आहे.**

या गंभीर प्रकाराविरोधात शिवसेना विभाग प्रमुख शंकर ढेबे आणि शहराध्यक्ष राजू गुजर यांनी पुढाकार घेत आक्रमक भूमिका घेतली. हैदराबाद येथील केएलएन कंपनीकडून सुरू असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामात डांबरी रस्त्यावर पडलेले खड्डे डांबराने बुजवण्याऐवजी थेट रेडी मिक्स कॉंक्रीटचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले.

डांबरी रस्त्याच्या संरचनेशी कॉंक्रीट सुसंगत नसल्याने भविष्यात रस्त्याचे मोठे नुकसान होण्याची आणि अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता असून, हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या सुरक्षिततेशी थेट खेळ असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे. तसेच कॉंक्रीटने बुजवण्यात आलेल्या खड्ड्यामधून वाहन जावून पुन्हा तिथे खड्डा निर्माण होत असल्याचे शिवसेनेचे राजू गुजर यांनी ठेकेदाराला दाखवून दिले.



लिंगमळा-महाबळेश्वर या खराब झालेल्या रस्त्यावर डांबराऐवजी कॉंक्रीटचे पॅचवर्क केल्याचे छायचित्रात दिसत आहे.

हा प्रकार उघडकीस येताच शंकर ढेबे आणि शहराध्यक्ष राजू गुजर यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देत केएलएन कंपनीच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. रस्त्याची दुरुस्ती ही तात्पुरती मलमपट्टी न करता शासनाच्या तांत्रिक निकषांनुसार, दर्जेदार आणि दीर्घकालीन पद्धतीनेच करावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी बोलताना शहराध्यक्ष राजू गुजर म्हणाले की,'लिंगमळा महाबळेश्वर रस्त्यावर सुरू असलेले नियमबाह्य आणि निकृष्ट काम शिवसेना सहन करणार नाही. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या कोणत्याही कामाला आम्ही थारा देणार नाही.तर विभाग प्रमुख शंकर ढेबे यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, संबंधित प्रशासन आणि कंपनीने त्वरित योग्य तांत्रिक निर्णय घ्यावा. अन्यथा शिवसेना (उबाठा) च्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल.

या भूमिकेला टॅक्सी चालक आणि स्थानिक नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळाला. टॅक्सी युनियनचे अध्यक्ष यशवंत भिलारे यांनी रस्त्याच्या दुरवस्थेमुळे दररोज अपघातांचा धोका निर्माण होत असल्याचे सांगितले. खड्ड्यांमुळे वाहनांचे मोठे नुकसान होत असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान,शिवसेनेच्या ठाम विरोधामुळे आणि स्थानिक नागरिकांच्या रोषामुळे केएलएन कंपनीने कॉंक्रीटीकरण थांबवून डांबरीकरणास सुरुवात केल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र तालुक्यात एकूणच कॉंक्रीट रस्त्यांविरोधात नागरिकांचा असंतोष वाढत असून, भविष्यात याबाबत जनआक्रोश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

यावेळी अंकुश बावळेकर, राजेश साळवी, शाहनवाज खारखंडे,दिपक ताथवडेकर, आसिफ महापुळे, अमोल साळुंखे, जितेश कुंभारदरे यांच्यासह अनेक शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

पर्यटन हंगामाच्या तोंडावर लिंगमळामहाबळेश्वर रस्त्याची अशी अवस्था राहिल्यास महाबळेश्वरच्या पर्यटन प्रतिमेला मोठा धक्का बसू शकतो. त्यामुळे प्रशासनाने वेळकाढूपणा न करता त्वरित नियमांनुसार, दर्जेदार आणि कायमस्वरूपी रस्ता दुरुस्ती करावी, अन्यथा शिवसेना (उबाठा) रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल,असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

## दिव्यांगांच्या हक्कांचे संरक्षण करणे अधिकाऱ्यांची जबाबदारी-पाटील

सातारा,ता.१४(प्रतिनिधी)-

**दिव्यांग हे समाजाचा अविभाज्य घटक असून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही प्रशासनातील प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. दिव्यांगांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्याबरोबर स्वयंरोजगारसाठी प्रशिक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयामार्फत दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ३६ अन्वये दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री.पाटील यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गावडे, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी विद्यानंद चल्लावार, महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा सुचित्रा काटकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. दिव्यांग बांधवाचे विविध विभागांना कामासंदर्भात अर्ज येतात.या अर्जांवर विभाग प्रमुखांनी सकारात्मक विचार करुन तातडीने अर्ज निकाली काढावे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, दिव्यांगांची काम करणे ही एक प्रकारे ईश्वरी सेवाच आहे. दिव्यांग बांधवाचे एकही निवेदन प्रशासनाला येणार ही या पद्धतीने कार्यालय प्रमुखांनी कामे करावीत. अशा कामांची दखल नक्की घेण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी श्री.पाटील यांनी सांगितले.

## खाडे शैक्षणिक संकुलात 'आनंद बाजार' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

मिरज,ता.१४(प्रतिनिधी)-

**थंडीमध्ये ऊब देणारा आणि माणसामाणसांत गोडवा निर्माण करणारा मकर संक्रांत हा सण खाडे शैक्षणिक संकुल येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी 'भाजी बाजार' अर्थात 'आनंद बाजार' भरवून संक्रांतीचा आनंद द्विगुणित केला.**

या उपक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी स्वतः भाजीपाला विक्री करत व्यवहारज्ञान, संवादकौशल्य व आत्मविश्वासाचा अनुभव घेतला. या अनोख्या उपक्रमाला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवून मुलांची भाजी खरेदी केली.अशा शैक्षणिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञानच नव्हे तर संस्कार,सहकार्य,आत्मनिर्भरता व सामाजिक जाणीव विकसित होते,असे मत यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी स्वाती खाडे यांनी व्यक्त केले. मुख्याध्यापिका संगीता पाटील व करुणा माने यांनी केलेल्या या सुंदर उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

## शिराळ्यात उद्यापासून विवेकानंद व्याख्यानमालेचे आयोजन

शिराळा,ता.१४(प्रतिनिधी)-

**शिराळा येथील श्री विवेकानंद व्याख्यानमाला शुक्रवार ता.१६ जानेवारीपासून सुरू होणार आहे. या व्याख्यानमालेत वृक्ष संगोपन स्पर्धा व आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण होणार आहे, अशी माहिती संस्थापक मानसिंगराव नाईक व अध्यक्ष सुमंत महाजन यांनी दिली.**

शुक्रवार ता.१६ जानेवारी रोजी सोलापूरचे साहित्यिक व अभिवाचक ॲड.आनंद देशपांडे तो बहिर्जी होता या विषयावर प्रथम पुष्प गुंफणार आहेत.यावेळी श्री विवेकानंद चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत घेण्यात आलेल्या वृक्ष संगोपन स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांचे बक्षिस वितरण होणार आहे.शनिवार ता.१७ रोजी तालुक्याचे सुपूत्र व प्रधान आयकर आयुक्त अभिनय कुंभार हे द्वितीय पुष्प गुंफणार आहेत. त्यांचा विषय अस्वस्थ वर्तमानात आजची युवापिढी हा आहे. यावेळी स्व.पांडूरंग काळे व स्व.सौ.कल्पना काळे यांच्या स्मरणार्थ देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण होणार आहे. रविवार ता. १८ रोजी सायंकाळी ७ वाजता स्वरनक्षत्राचे देणे हा अभंग, भावगीत व नाट्यसंगीताची मैफील होणार आहे. प्रसिद्ध युवा गायक अभिषेक काळे आपली कला सादर करणार आहेत. हे सर्व कार्यक्रम पुल गल्ली शिराळा येथील श्री दत्त मंदिर सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता होणार आहेत.तरी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मानसिंगराव नाईक, सुमंत महाजन,कार्यवाह प्रा. वैजनाथ महाजन, उपाध्यक्ष प्रा. प्रदीप पाटील, सचिव संतोष देशपांडे, कोषाध्यक्ष बी.टी.निकम,निमंत्रक श्रेयस महाजन यांनी केले आहे.

# माजी सैनिकांच्या अडीअडचणींबाबत संपर्क साधावा

### आम.सचिन पाटील यांचे आवाहन

फलटण,ता.१४(वार्ताहर)-

**भारतीय जवान देशसेवेत सतत कार्यरत असून सैनिक देशाच्या सीमेवर रात्रंदिवस कर्तुत्व बजावतात म्हणूनच आपण सर्व नागरिक देशात सुरक्षित असल्याचे विचार व्यक्त करत माजी सैनिकांना कोणतीही अडचण असल्यास त्यांनी सरळ आपल्याशी संपर्क करावा, असे आवाहन आमदार सचिन पाटील यांनी केले.**




माजी सैनिकांच्या समस्या जाणून घेताना आमदार सचिन पाटील, लेफ्ट.कर्नल सतीश डांगे, प्रांत प्रियंका आंबेकर, तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव, नायब तहसीलदार अभिजीत सोनवणे व इतर.

फलटण तालुक्यातील माजी सैनिकांच्या अडीअडचणी बाबत तहसील कार्यालय फलटण येथे आमदार सचिन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा सैनिक अधिकारी लेफ्ट.कर्नल सतीश डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात आली.त्यावेळी आमदार सचिन पाटील बोलत होते. यावेळी प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर, तहसीदार डॉ अभिजीत जाधव, नायब तहसीलदार अभिजीत सोनवणे, नायब तहसीलदार तुषार गुंजवटे,गटविकास अधिकारी बोंबले, शहर पोलीस निरीक्षक श्री काळे, ग्रामीण पोलीस निरीक्षक श्री. जगताप, फॉरेस्ट आरएफओ निकिता बोटकर यांचेसह विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत माजी सैनिकांच्या एकूण २० तक्रारी आल्या व यामधील १३ तक्रारींचे जागीच निवारण झाले तर ३ तक्रारी न्यायप्रविष्ट असून ४ तक्रारी साठी मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यात प्रथमच अशी माजी सैनकांची प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्या विविध अडचणीवर जागीच तोडगा होत असल्याने माजी सैनकांसह तालुक्यातील नागरिकाच्यात आनंदाचे वातावरण असल्याचे यावेळी माजी सैनिकांनी मत व्यक्य केले.यावेळी लेफ्ट. कर्नल सतीश डांगे यांनी बोलताना सांगितले की, तालुक्यातील माजी सैनिकांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यावर जागीच तोडगा काढा व शक्यतो सैनिकांना कचेरीत हेलपाटे मारावे लागू नयेत याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

## कन्या शाळा शिराळा येथे पारितोषिक वितरण उत्साहात

शिराळा,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील हायर एज्युकेशन सोसायटी संचलित कन्या शाळा, शिराळा येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रघुवीर रामदासी हे उपस्थित होते. प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रिया सरदेसाई यांनी शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनींनी शैक्षणिक, क्रीडा, बौद्धिक व सांस्कृतिक क्षेत्रात मिळवलेल्या यशाचा आढावा घेतला.**

शैक्षणिक, बौद्धिक व शारीरिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वैद्यनाथ महाजन, चेअरमन रमेश हसबनीस, संचालक प्रदीप हसबनीस व कार्यवाह दिगवडेकर यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.कार्यक्रमास शाळा समिती सदस्य एस. जी. कुलकर्णी,एन. व्ही. जोशी, सुदाम गायकवाड, नागेश जोशी,सुमंत महाजन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन चांदणे व सौ. सोनुले यांनी केले. पारितोषिकांचे वाचन श्री.खोत, सौ.पवार व सौ. अनुजा महाजन यांनी केले. अहवाल वाचन सौ.अनुजा महाजन व सौ. संपदा माझा यांनी केले.

# राजकारणाचा स्तर दिवसेंदिवस ढासळतोय

### बाळासाहेब पाटील

मसूर ,ता.१४(प्रतिनिधी)-

**पक्षात इनकमिंग झालं म्हणजे पक्ष विजयी होतो, असं नाही. सत्ताधाऱ्यांकडून पूर्व इतिहास न बघता प्रवेश दिला जात आहे. सोडून गेलेल्यांनी आमच्यावर अन्याय झाला असा प्रचार करू नये. राजकारणाचा स्तर दिवसेंदिवस ढासळत चालला आहे, असे मत माजी सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.**



मसूर (ता.कराड) येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी जशराज पाटील, सागर पाटील, सह्याद्री साखर कारखान्याचे उपाध्यक्ष कांतिलाल पाटील, जिल्हा परिषदेच्या अर्थ व शिक्षण समितीचे माजी सभापती मानसिंगराव जगदाळे, महिला सेलच्या प्रदेशाध्यक्ष संगीता साळुंखे, युवक आघाडीचे अध्यक्ष प्रशांत यादव, सरपंच परिषदेचे संघटक शंकरराव खापे, प्रणव ताटे, सुहास बोराटे, नेताजी चव्हाण, दत्तात्रय चव्हाण, सिद्धार्थ चव्हाण, संजय घोलप यांच्यासह आजी-माजी संचालक व कार्यकर्ते उपस्थित होते.

बाळासहोब पाटील म्हणाले,हणबरवाडी-धनगरवाडी योजनेचा पाया आम्ही रचला. शिखर आम्ही बांधले आणि कलशारोहणाचे भाग्य तुम्हाला मिळाले. विकासकामात आम्ही कधीही कमी पडलो नाही. नवीन विकास कामांसाठी शासनाकडे सध्या निधी नाही. मात्र, पुढील दीड वर्षात मंजूर होणारी विकासकामे आमच्या कार्यकाळातीलच असतील.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत चांगले आणि सक्षम उमेदवार निवडून आणण्याची काळजी घ्या. या माध्यमातून खऱ्या अर्थाने विकास करता येतो.जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याचेही बाळासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले.

प्रशांत यादव, सुहास बोराटे, संगीता साळुंखे, मानसिंगराव जगदाळे आणि कांतिलाल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशांत यादव यांनी प्रास्ताविक केले. संजय घोलप यांनी आभार मानले.

# शेतकरी कर्जमाफीबद्दल सरकारने भूमिका स्पष्ट करावी-शेळके

सातारा,ता.१४(प्रतिनिधी)-

**एकच नारा सातबारा कोरा अन्यथा पुन्हा नाही थारा. एक महिना अवधी घ्या, पण आत्ताच शेतकरी कर्ज माफीबद्दल स्पष्ट भूमिका जाहीर करा अन्यथा पश्चिम महाराष्ट्र पेटेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांनी निवेदनाद्वारे दिला.**



प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद केले की, निवडणुकीपूर्वी कर्जमाफीची आश्वासने देऊन शेतकऱ्यांची मते मिळवणाऱ्या सरकारने निवडणुका संपताच शेतकऱ्यांकडे पाठ फिरवली आहे. सार्वजनिक कार्यक्रमांत कर्जमाफीची आठवण करून दिली असता आमदार व मंत्र्यांकडून उर्मट, अहंकारी आणि बेजबाबदार उत्तरे दिली जात आहेत. हा शेतकऱ्यांचा उघड अपमान आहे. १ जुलैपासून कर्जमाफी देण्याच्या घोषणा करून शासन फक्त वेळकाढूपणा करत आहे. प्रत्यक्षात कर्जमुक्ती योजना विसंगत, गोंधळात टाकणारी आणि शेतकरीविरोधी पद्धतीने राबवली जात आहे.एका बाजूला ऊसबिलातून कर्जकपात नको, कर्ज भरण्यास मुदत ;तर दुसऱ्या बाजूला फक्त २०२५ पूर्वी थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांचीच माहिती मागवली जात आहे. हा दुहेरी खेळ शेतकऱ्यांना थकबाकीत अडकवण्याचा प्रयत्न आहे. थकबाकी यादीत नाव नसेल तर कर्जमाफी नाही आणि थकबाकी ठेवली तर नियमित शेतकऱ्याचे लाभ नाहीत. म्हणजे शेतकरी कुठल्याही परिस्थितीत अडचणीतच राहिला पाहिजे, अशीच शासनाची भूमिका असल्याचे स्पष्ट होत आहे. सरकारने जास्ती जास्त शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ कसा होईल यासाठी आपल्या डोक्याचा वापर करावा त्याऐवजी जास्ती जास्त शेतकरी कर्जबाजारी कसे होतील असे नियम निकष लावू नये अन्यथा शेतकरी सरकारचे डोके चांगलेच ठिकाणावर आणतील. स्वाभिमानी शेतकरी संघटना सरकारला ठाम इशारा देते 'तुम्हाला एक महिना अवधी घ्यायचा असेल तर घ्या, पण कर्जमाफीबाबत आताच स्पष्ट, लेखी आणि सर्वसमावेशक भूमिका जाहीर करा.अन्यथा संघर्ष अटळ आहे.

## ढालेवाडी येथील सहा युवकांची सैन्य दलात भरती

कवठेमहांकाळ,ता.१४(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्ह्यातील ढालेवाडी हे एक छोटेसे खेडे गाव या गावातील एक नव्हे, दोन नव्हे, तीनपण नव्हे तब्बल सहा तरुण मुले भारतीय सैन्य दलात भरती झाले आहेत.**

सामान्य कुटुंबात जन्मलेली ही मुले आपल्या बरोबर आपल्या कुटुंबाचा उद्धार होईल या अंतर मनाने त्यांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांना अखेर यश मिळाले. ढालेवाडी गावातील शुभम विलास साळुंखे,संकेत दिलीप साळुंखे, रितेश दिलीप साळुंखे,प्रसाद वीरभद्र कोष्टी, रोहन संजय जाधव, सौरभ तानाजी मलमे या सहाही मुलांनी ढालेवाडी गावचे नाव यशाच्या शिखरावर अधोरेखित केले. या यशाबद्दल या मुलांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चांदोलीतील पर्यटनाला चालना मिळण्याची शक्यता धुसर

शिराळा,ता.१४(प्रतिनिधी)-

**सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रातील चांदोली राष्ट्रीय उद्यानात दोन वाघांचे आगमन झाले आहे. त्यामुळे चांदोली परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून,पर्यटन वाढेल अशी चर्चा सुरू झाली आहे. वाघांच्या उपस्थितीमुळे पर्यटनाला चालना मिळण्याची शक्यता असली, तरी प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळी असल्याचे चित्र दिसून येत आहे.**



**मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे पर्यटकांची गैरसोय**

**पर्यटन विकासासाठी स्थानिकांनी पुढाकार घ्यावा**

देशातील अनेक व्याघ्र प्रकल्पांमध्ये पर्यटनाचा विकास हा स्थानिक नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे शक्य झाला आहे. त्याच धर्तीवर चांदोलीतही स्थानिकांचा (मणदूर) सहभाग वाढल्यास पर्यटनाचे भविष्य निश्चितच उज्ज्वल ठरू शकते. मात्र सध्याच्या परिस्थितीत चांदोली परिसरात स्थानिकांचा सहभाग अत्यल्प असल्याचे स्पष्ट होत आहे. चांदोलीतील अनेक हॉटेल्स व रिसॉर्ट्समध्ये मनुष्यबळाची तीव्र कमतरता जाणवत आहे.स्थानिक महिला व पुरुषांना कामासाठी बोलावले असता अनेकजण काम करण्यास इच्छुक नसल्याचे दिसून येते. कूक,व्यवस्थापक, गार्डन, साफसफाई तसेच इतर हॉटेलसंबंधित कामांसाठी स्थानिक कर्मचारी मिळत नसल्याने हॉटेल मालकांना नाईलाजाने बाहेरून मनुष्यबळ आणावे लागत आहेत. विशेष म्हणजे, चांदोली परिसरातच उपलब्ध असलेल्या हॉटेल्समध्ये स्थानिकांना स्थिर व चांगल्या उत्पन्नाची संधी असतानाही शहरांकडे स्थलांतर करण्याकडे किंवा बेरोजगारीकडे कल असल्याचे दिसून येते.

पर्यटक वाहनांच्या बाबतीतही स्थानिकांकडून नकारात्मक भूमिका घेतली जात आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी प्रशासनाने नियमांमध्ये न बसणाऱ्या स्थानिक मणदूरमधील वाहनांवर बंदी घातली होती. ही वाहने विना कागदपत्रांची, नादुरुस्त, फिजिकल फिटनेस नसल्याने वनविभागाने ती पर्यटक वाहतुकीसाठी अमान्य ठरवली होती. त्यानंतर वनविभागाने स्थानिकांना नियमात बसणारी पर्यटक वाहने खरेदी करण्यासाठी प्रोत्साहन दिले,मात्र गेले चार वर्षे कोणीही पुढाकार घेतलेला दिसत नाही. इतकेच नव्हे तर काही हॉटेल मालक व पर्यटन व्यवसायाशी संबंधित व्यक्ती स्वतःची वाहने पर्यटकांसाठी वापरण्यास तयार असतानाही त्यास मणदूरमधील स्थानिकांकडून विरोध केला जात असल्याचे दिसून येते.या सर्व बाबींमुळे चांदोलीतील पर्यटन वाढण्याऐवजी पर्यटकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

ताडोबा व्याघ्र प्रकल्पमध्ये २०० पेक्षा जास्त सफारी गाईड व पर्यटक वाहने स्थानिक लोक व भागधारक यांच्या सहभागातून दररोज येणाऱ्या पर्यटकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देतात. दरवर्षी ताडोबा व्याघ्र प्रकल्प मधील पर्यटनातून स्थानिकांना दरवर्षी सर्वसाधारण १६-१७ कोटीचा आर्थिक फायदा मिळतो.या पार्श्वभूमीवर चांदोलीतील स्थानिक पुढाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारून पर्यटन विकासासाठी पुढाकार घेणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा चांदोली पर्यटन विकासासाठी जे लोक काम करण्यास इच्छुक आहे, त्यांना पुढे जाण्यासाठी सहकार्य करावे.चांदोलीत वाघांचे अस्तित्व असले तरी त्याचा प्रत्यक्ष फायदा पर्यटनवाढीत आणि स्थानिक विकासात दिसून येणार नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# 'सेवासदन'मध्ये रूग्णावर बेंटॉल्स शस्त्रक्रिया यशस्वी

मिरज,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील सेवासदन हॉस्पिटलमध्ये प्रगत वैद्यकीय सुविधा, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आणि वेळेवर घेतलेल्या अचूक निर्णयामुळे आणखी एका रुग्णाचा जीव वाचवण्यात यश आले आहे.**



बेंटॉल्स ही अवघड शस्त्रक्रिया करणारे सेवासदनचे डॉ.शिरीष पारगांवकर,डॉ.अमृतराज नेर्लीकर,डॉ.पृथ्वीराज पाटील,डॉ. मिलिंद आरोते, डॉ.सम्राट मदनाईक व इतर.

डिसेक्टिंग एओर्टिक ॲन्युरिझम या अत्यंत जीवघेण्या आजाराने ग्रस्त असलेला एक रुग्ण गंभीर अवस्थेत सेवासदन हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. हृदयातून जाणाऱ्या मुख्य रक्तवाहिनीत झालेला मोठ्या प्रमाणातील फुगवटा व फाटण्याची ही अवस्था अचानक जीवघेणी ठरू शकते. अशा परिस्थितीत तात्काळ शस्त्रक्रियाच एकमेव प्रभावी उपचार असल्याने कोणताही विलंब न करता सेवासदन हार्ट फाउंडेशनच्या तज्ज्ञ टीमने आपत्कालीन एओर्टिक रूट रिप्लेसमेंट अर्थात बेंटॉल्स प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. डिसेक्टिंग एओर्टिक ॲन्युरिझम ही हृदय विकारातील अत्यंत गुंतागुंतीची परिस्थिती मानली जाते. सेवासदन हॉस्पिटलमधील तज्ज्ञ हृदयरोग व रक्तवाहिन्यांच्या शस्त्रक्रिया (सीव्हीटीएस) टीमने अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर व क्रिटिकल केअर सुविधांच्या सहाय्याने ही आपत्कालीन बेंटॉल्स शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर आहे.

सेवासदन हेल्थकेअर ग्रुपचे अध्यक्ष डॉ. रविकांत पाटील म्हणाले, अत्यंत गुंतागुंतीचे आणि उच्च-जोखमीचे उपचार स्थानिक पातळीवर, परवडणाऱ्या खर्चात उपलब्ध करून देणे हा सेवासदन हॉस्पिटलचा नेहमीच उद्देश राहिला आहे.

या यशस्वी शस्त्रक्रियेमध्ये डॉ. शिरीष पारगांवकर (प्रमुख सेवासदन हार्ट फाउंडेशन),डॉ.अमृतराज नेर्लीकर व डॉ. पृथ्वीराज पाटील (सीव्हीटीएस सर्जन), डॉ. मिलिंद आरोते (शस्त्रक्रिया सहाय्यक)आणि डॉ.सम्राट मदनाईक(हृदय शस्त्रक्रिया भूलतज्ज्ञ) यांनी मोलाची भूमिका बजावली.

# जि.प.निवडणुकांसाठी प्रशासनाची तयारी सुरू

## जिल्ह्यात ६८ गटासाठी तर १३६ गणासाठी निवडणूक जाहीर

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या ६८ गटासाठी तर पंचायत समितीच्या १३६ गणासाठी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे तर ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीसाठी प्रशासनाने युध्दपातळीवर तयारी सुरु केली आहे.जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठकांचे सत्र चालू केले आहे.**



कोल्हापूर जिल्हा परिषदेसाठी तर जिल्हयातील शाहुवाडी,पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर,गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा,गडहिंग्लज आणि चंदगड या १२ पंचायत समित्यांसाठी या निवडणुका होत असल्याने गेल्या कित्येक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर मिनीमंत्रालयासाठी ग्रामीण भागात निवडणुकीचा ज्वर चढू लागला आहे. राजकीय पक्ष तसेच स्थानिक आघाडया आणि इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीसाठी उभे राहण्यासाठी तयारी सुरु केली आहे. निवडणूक जाहीर होताच इच्छुकांनी तिकिटासाठी नेत्यांच्या गाठी-भेटी घेण्यास सुरुवात केल्याने ग्रामीण भागात वातावरण तापू लागले आहे.

आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणूक कार्यक्रमाच्या सूचनेची प्रसिद्धी- १६ जानेवारी नामनिर्देशनपत्र स्वीकारणे- १६ जानेवारी ते २१ जानेवारी , नामनिर्देशनपत्रांची छाननी- २२ जानेवारी २०२६, उमेदवारी माघारीची अंतिम मुदत- २७ जानेवारी , निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम उमेदवारांची यादी २७ जानेवारी मतदानाचा दिनांक- ५ फेब्रुवारी तर मतमोजणीचा दिनांक- ७ फेब्रुवारी २०२६.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. संबंधित क्षेत्रातही आचारसंहिता लागू झाली असली तरी अन्य ठिकाणीदेखील संबंधित जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही; परंतु नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही.

**जिल्हा परिषदा व पंचायत समिती निवडणुकांसाठी उमेदवारांना खर्च मर्यादा-**

**७१ ते ७५ निवडणूक विभाग** असलेल्या जिल्हा परिषदांसाठी ९ लाख आणि त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ६ लाख रुपये खर्च मर्यादा असेल.

**६१ ते ७० निवडणूक विभाग** असलेल्या जिल्हा परिषदांसाठी ७ लाख ५० हजार आणि त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी५ लाख २५ हजार रुपये खर्च मर्यादा असेल.

**५० ते ६० निवडणूक विभाग** असलेल्या जिल्हा परिषदांसाठी ६ लाख आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ४ लाख ५० हजार रुपये खर्च मर्यादा असेल.

# महापालिकेसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर महापालिका निवडणुकीसाठी शहरातील ५९५ मतदान केंद्रावर आज सकाळी ७.३० ते ५.३० वाजेपर्यंत मतदान होत आहे. शहरातील २० प्रभागातील ४ लाख ९४ हजार ७११ मतदार आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावतील. या मतदान प्रक्रियेसाठी निवडणुक यंत्रणा सज्ज असून मतदारांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन महापालिका प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी केले आहे.**

मतदान प्रक्रिया मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी महापालिका व पोलिस यंत्रणा सज्ज असून कोठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस दलाने शहरात सर्वत्र काटेकोर बंदोबस्त तैनात केला आहे. तसेच आवश्यक ती पथके तैनात केली असून तपासणी नाक्यावरही स्वतंत्र पथक तैनात केले आहे.कोल्हापूर महानगरपालिकेसाठी यंदा २० प्रभागातून ८१ उमेदवार निवडून द्यायचे आहेत. शहरातील २० प्रभागामधील एकूण मतदारांपैकी २ लाख ४४ हजार ७३४ पुरुष मतदार, २ लाख ४९ हजार ९४० स्त्री मतदार आणि ३७ इतर मतदारांचा समावेश आहे. शहरातील २० प्रभागामधील एकूण ४ लाख ९४ हजार ७११ मतदारांमध्ये सर्वाधिक म्हणजे ३२ हजार ७४ इतके मतदार प्रभाग क्रमांक २० मध्ये असून सर्वात कमी म्हणजे २० हजार ७२१ इतके मतदार प्रभाग क्रमांक ३ मध्ये आहेत.



**शुक्रवारी चार ठिकाणी मतमोजणी**

कोल्हापुर महापालिकेसाठी आज होणाऱ्या मतदानाची मतमोजणी शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी शहरातील चार ठिकाणी होत असून प्रशासनाने मतमोजणीचीही तयारी पूर्ण केली आहे. मतमोजणी व्ही. टी. पाटील सभागृह, गांधी मैदान, रमणमळा आणि दुधाळी अशा चार ठिकाणी होत आहे.

यामध्ये १) रमणमळा धान्य गोदाम येथे प्रभाग क्रमांक १,२,५,१२,१३,१४,१६,१७ आणि १८ या प्रभागातील मतदानाची मोजणी होणार आहे, २) व्ही. टी. पाटील सभागृह येथे प्रभाग क्रमांक ३,४,९,१५ आणि २० या प्रभागातील मतदानाची मोजणी होणार आहे, ३) गांधी मैदान पॅव्हेलियन येथे प्रभाग क्रमांक १०,११ आणि १९ या प्रभागातील मतदानाची मोजणी होणार आहे, ४) दुधाळी पॅव्हेलियन येथे प्रभाग क्रमांक ६,७ आणि ८ या प्रभागातील मतदानाची मोजणी होणार आहे.

**कोल्हापूर शहरातील २० प्रभागामधील प्रभागनिहाय एकूण मतदारांची संख्या खालीलप्रमाणे**

| प्र.क्रमांक | संख्या |
|---|---|
| १ | २३ हजार ९६० |
| २ | २२ हजार ८८९ |
| ३ | २० हजार ७२१ |
| ४ | २४ हजार ५७९ |
| ५ | २३ हजार ५५२ |
| ६ | २४ हजार ०५९ |
| ७ | २६ हजार ४२२ |
| ८ | २५ हजार ०५९ |
| ९ | २६ हजार ५८५ |
| १० | २४ हजार ५२२ |
| ११ | २५ हजार ५०६ |
| १२ | २८ हजार ०७० |
| १३ | २५ हजार ९५२ |
| १४ | २५ हजार २६५ |
| १५ | २५ हजार ३६० |
| १६ | २२ हजार १९६ |
| १७ | २० हजार ९३३ |
| १८ | २२ हजार ८८४ |
| १९ | २४ हजार १२३ |
| २० | ३२ हजार ०७४ |

## शहरात कडेकोट बंदोबस्त;उद्या चार ठिकाणी होणार मतमोजणी

# राधानगरी तालुक्यातील राजकीय घडामोडी गतीमान

## जि.प.व पं.समिती निवडणूक कार्यक्रम जाहीर;उद्यापासून अर्ज सादर करण्यास सुरूवात

शिरगाव,ता.१४(आनंदराव चौगले)-

**ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सातत्याने पुढे ढकलण्यात येणाऱ्या राज्यातील जिल्हा परिषद निवडणूकांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने अखेर जाहिर केला आहे. त्यामुळे या निवडणूकांचे बिगुल वाजल्याने राधानगरी तालुक्यातील इच्छूक उमेदवारांनी सुटकेचा नि:श्वास सुटला आहे.**

तालुक्यात राजकीय घडामोडी गतिमान झाल्या आहेत. सर्वच मतदार संघात अटीतटीच्या लढती होण्याची शक्यता आहे. राधानगरी तालुक्यात पक्षीय पातळीवरील राजकारणापेक्षा गटा-तटाचे राजकारण अधिक प्रमाणात पहावयास मिळते. भोगावती, तुळशी धामणी, व दुधगंगा नदीकाठावर विभागलेल्या प्रत्येक मतदार संघात विशिष्ट राजकीय पक्षाच्या गटाच्या नेत्यांचे वर्चस्व आहे.राज्यात सध्या महायुतीच्या भाजप , राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना एकनाथ शिंदे व मित्र पक्ष तर राष्ट्रीय काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट , शिवसेना उद्धव ठाकरे व मित्र पक्ष यांची महाविकास आघाडी असे चित्र आहे. मात्र सध्याच्या बदलत्या राजकीय समिकरण व इच्छूक उमेदवारांच्या भाऊगर्दीमुळे युती-आघाडी धर्म पाळला जाणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.



तालुक्यात पाच जिल्हा परिषद व दहा पंचायत समिती गण आहेत.राशिवडे बुद्रुक व राधानगरी मतदार संघ सर्वसाधारण पुरुष खुला झाल्याने येथे तुल्यबळ लढत पहावयास मिळणार आहे. कसबा तारळे व सरवडे हे दोन मतदार मतदार संघ सर्वसाधारण महिलांसाठी खुले असल्याने अनेक इच्छुकांच्या पदरी निराशा पडली आहे. मात्र आपल्या घरातील महिला उमेदवारांना निवडणूक रिंगणात उतरून निवडणूकीची जोरदार तयारी सुरु आहे. कसबा वाळवे मतदार संघात नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण पडल्याने येथे लक्षवेधी लढतीची शक्यता आहे.

पंचायत समितीच्या कसबा वाळवे, अनुसुचित प्रवर्ग महिला, कसबा तारळे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला , राधानगरी, तुरंबे, राशिवडे बुद्रुक, सर्वसाधारण महिला,धामोड, फेजिवडे , सरवडे, सोळांकूर , हे सर्वसाधारण असल्याने या सर्व मतदार संघात इच्छूकांची संख्या अधिक प्रमाणात आहे. पंचायत समितीचे सभापती पद सर्वसाधारण महिलांसाठी आहे.

दरम्यान इच्छूक उमेदवारांनी निवडणूक कार्यक्रम जाहिर होण्याअगोदरच निवडणूकीची जोरदार तयारी सुरु केली होती . उमेदवारांना निवडणूक कार्यक्रम जाहिर होण्याची प्रतिक्षा होती. ही प्रतिक्षा अखेर संपल्याने इच्छूकांचे उमेदवारी मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होणार आहेत. एकूणच इच्छूकांची भाऊगर्दी असल्याने बंडखोरी थांबविण्यासाठी नेते मंडळींचा कस लागणार आहे.

एकंदरीत निवडणूक कार्यक्रम जाहिर झाल्याने तालुक्यात आता राजकीय धुरळा उडणार आहे. मात्र महायुती व महा आघाडीचे नेते युती - आघाडी बाबत काय निर्णय घेतात, उमेदवारीची माळ कोणाच्या गळ्यात पडणार,उमेदवारी न मिळालेले नाराज काय निर्णय घेणार हे अर्ज माघारीनंतर स्पष्ट होणार असून निवडणूकीतील लढती निश्चित होणार आहे.

# निवडणूक प्रचारादरम्यान विविध व्यावसायिकांची मोठी उलाढाल

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने कोल्हापूर शहरात राजकीय हालचालींसोबतच व्यावसायिक उलाढालही मोठी झाली आहे. या निवडणुकीमुळे शहरातील विविध क्षेत्रांत मोठी आर्थिक व व्यावसायिक उलाढाल झाल्याचे पहायला मिळत आहे.**

उमेदवारांनी आपापल्या प्रभागात मोठे होर्डिंग्स आणि बॅनर लावण्यासाठी मोठी गुंतवणूक केली. यामुळे फ्लेक्स प्रिंटिंग आणि जाहिरात एजन्सींच्या कामात वाढ झाली आहे. प्रत्येक पक्षाकडून आपला जाहीरनामा, विकासकामे मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी आकर्षक पत्रके छापण्यात आली. हॉटेल,केटरिंग व्यवसाय, वाहन, लाऊडस्पीकर पुरवठादारांना मोठ्या प्रमाणावर काम मिळाले. आयटी व सोशल मीडिया व्यवस्थापन, डिजिटल मार्केटिंग, एकंदरीतच निवडणुकीच्या या वातावरणात कोल्हापूरच्या बाजारपेठेत उसळी आली.



कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत रिक्षाचालकांसाठी अच्छे दिन आले होते. प्रचाराचा जोर वाढल्याने रिक्षा व्यवसायाला मोठी उभारी मिळाली. अनेक उमेदवारांनी आपली चिन्हे आणि घोषणा मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी रिक्षांना प्राधान्य दिले होते. राजकीय पक्षांशी संलग्न असलेल्या रिक्षा संघटनाही सक्रिय झाल्याचे दिसून आले.प्रवासी वाहतूकीसाठी असलेले रिक्षा थांब्यावर कमी दिसत होत्या. त्यामुळे नागरिकांची काहीशी गैरसोय झाली.

कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीमुळे शहरातील हॉटेल्स आणि लॉज, परमीट रूम हाऊसफुल्ल होते.या व्यवसायाची भरभराट झाली. आदर्श आचारसंहितेमुळे उमेदवारांना शासकीय विश्रामगृहे किंवा सर्किट हाऊस बुक करता येत नाहीत. परिणामी, राजकीय पक्षांचे नेते, निरीक्षक आणि कार्यकर्ते यांच्या निवासासाठी खासगी हॉटेल्समध्ये मोठ्या प्रमाणात खोल्या आरक्षित केल्याने हॉटेल व्यवसायाला मोठे आर्थिक बळ मिळाले. या काळात मटन व चिकनला फार मोठी मागणी होती. निवडणूक धामधुमीत सुशिक्षित आणि कुशल बेरोजगारांनाही मोठ्या प्रमाणावर हंगामी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. या निवडणुकीमुळे केवळ शहरातच नव्हे, तर ग्रामीण भागातील बेरोजगारांनाही कोल्हापुरात येऊन हंगामी काम करण्याची संधी मिळाली.

या निवडणुकीत मंडप डेकोरेटर्स आणि साऊंड सिस्टीम मालकांना अक्षरशः लॉटरी लागली. लग्नसराईच्या सीझनपेक्षाही जास्त बुकिंग्स सध्या राजकीय कार्यक्रमांमुळे झाले. सभेचे थाट वाढवण्यासाठी प्रभागांमधील कोपरा सभांपासून ते महायुती आणि महाविकास आघाडीच्या मोठ्या जाहीर सभांपर्यंत प्रत्येक ठिकाणी भव्य स्टेज, सोफे आणि बॅरिकेडिंगसाठी मंडप व्यावसायिकांना मोठी कंत्राटे मिळाली. उमेदवारांनी यावेळी इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्यांचा मोठा सहभाग घेतल्याचे दिसून आले. कोल्हापूर मनपा निवडणूकीला इव्हेंटचे स्वरूप आले होते. त्याचा फायदा सर्वच व्यावसायिकांना झाला.

**हॉटेल,केटरिंग,होर्डिंग्ज,बॅनर,मंडप,डेकोरेटर्स, साऊंड सिस्टीम व्यावसायिकांना लॉटरी**

## थोडक्यात

### नृसिंहवाडी श्री दत्त देव संस्थान निवडणुकीत आठ जागा बिनविरोध

नृसिंहवाडी,ता.१४(वार्ताहर)-

**श्री नृसिंह सरस्वती स्वामी दत्त देव संस्थान नृसिंहवाडी या संस्थेच्या विश्वस्त निवडणुकीत नऊ जागांपैकी आठ जागा बिनविरोध निवड झाल्या तर एका विश्वस्तांची बहुमताने निवड झाली.**

महाराष्ट्र राज्यासह अनेक राज्यात श्री दत्ताची राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री नृसिंह सरस्वती स्वामी दत्त देव संस्थान नृसिंहवाडी या संस्थानची विश्वस्तपदाची मुदत संपलेने चार वर्षे कालावधीसाठी आठ तर एक वर्ष मुदतीसाठी एका जागेसाठी निवडणूक घेणेत आली.

या निवडणुकीत फडा एक विभाग एक मधून प्रा गुंडो श्रीपाद पुजारी, विभाग दोनमधून अवधूत दिगंबर पुजारी, फडा दोन विभाग एक मधून योगेश दामोदर घाटे पुजारी, भाग दोन मधून पुष्कर नारायण बड्डपुजारी, फडा तीन भाग एक मधून रामचंद्र विश्वनाथ गेंडे पुजारी, भाग दोन मधून नरेंद्र गणेश विभूते, फडा चार भाग एक मधून महेश मुकुंद हावळे, भाग दोन मधून मेघश्याम नारायण पुजारी तर फडा तीन मधून नवव्या जागेसाठी एक वर्षांसाठी विश्वस्त म्हणून मुरारी प्रभाकर पुजारी यांची निवड झाली. यातील आठ जागा बिनविरोध निवडून आल्या तर योगेश दामोदर घाटे पुजारी यांची बहुमताने निवड झाली. निवडणूक अधिकारी म्हणून गजानन दत्तात्रय गेंडे पुजारी यांनी काम पाहिले.

### मंडलिक कारखान्याची ऊसबिले बँक खात्यावर जमा- चेअरमन मंडलिक

मुरगूड,ता.१३(प्रतिनिधी)-

**लोकनेते सदाशिवराव मंडलिक कागल तालूका सहकारी साखर कारखाना लि,. सदाशिवनगर, हमिदवाडा कारखान्याची चालू हंगामात दिनांक १ ते १५ डिसेंबर (या पंधरवडयात) गाळपास आलेल्या एकूण ७०४७५ मे. टन ऊसाची प्र. टनास रु. ३,४१०/- प्रमाणे होणारी ऊस बिलाची रक्कम २४ कोटी ०३ लाख २० हजार ६३१ संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांचे बँक खात्यात वर्ग केली असलेची माहीती कारखान्याचे चेअरमन प्रा. संजय मंडलिक यांनी दिली.**

ऊस पुरवठादारांनी आपले बँकेशी संपर्क साधून ऊस बिले घेवून जावीत. त्याचप्रमाणे दिनांक ०१ ते १५ डिसेंबर अखेर या पंधरवडयाची तोडणी-वाहतूक बिले सुध्दा संबधितांचे बँक खात्यात वर्ग केलेली आहेत.सर्वांच्या सहकार्याने आज अखेर ७२ दिवसांमध्ये कारखान्याचे ३,३७,१६० मे.टन उसाचे गाळप झाले असून ३,५४,३०० क्विंटल साखर पोती उत्पादन झाले आहे. व सरासरी साखर उतारा १२.१२ टक्के इतका आहे. तसेच सहवीज निर्मिती प्रकल्पातून वीज निर्यात केली आहे.यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन आनंदा फराकटे, संचालक प्रकाश पाटील,विरेंद्र मंडलिक, विश्वास कुराडे, कृष्णा शिंदे,सत्यजित पाटील, तुकाराम ढोले,सौ.मंगल तुकान, सौ.प्रतिभा पाटील आणि कारखान्याचे कार्यकारी संचालक एन. वाय. पाटील, इन. चिफ अकौंटट एस.डी. पाटील आदी उपस्थित होते.

# घोसरवाड येथे मोकाट कुत्र्यांची दहशत

घोसरवाड,ता.१४(वार्ताहर)-

**शिरोळ तालुक्यातील घोसरवाड परिसरात मोकाट कुत्र्यांनी अक्षरशा उच्छाद मांडला असून त्यामुळे नागरिकात भीतीची छाया पसरली आहे रात्रीच्या वेळी अंगावर धावून येणे,वाहनांचा पाठलाग करणे त्यामुळे नागरिकात व वाहनधारकांतून भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे.या मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.**



**नागरिकांतून तीव्र संताप; प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष**

घोसरवाड येथील वन विभागाच्या माळभागेतील जागेत सदरची मोकाट कुत्रे शहरातून आणून सोडली जातात असे काही नागरिकांनी सांगितले.सदरची मोकाट कुत्रे माळभागात खाण्यासाठी काही नसल्याने गावात येऊन हैदोस घालत आहेत. सदरची कुत्रे कळपाने येतात. त्यामुळे नागरिकात भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे.नागरिकांच्या वस्तीत फिरणे, शाळेला जाताना मुलांच्या पाठीमागे लागणे,वाहन चालकांच्या मागे लागणे,नागरिकांच्या अंगावर धावून जाणे असे प्रकार होत आहेत.

घोसरवाड येथील बसस्थानक ते शाळा ते हायस्कूलपर्यंत मोकाट कुत्र्यांचा वावर मोठा दिसतो. त्यामुळे या भागातून फिरताना भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले. शेतकरी वर्ग रात्री शेतीला पाणी पाजण्यासाठी जात असतात.काही नागरिक रात्रीच्या वेळी मोटरसायकलने कामावर जात असतात अशावेळी सदरची कुत्रे अंगावर धावून जात आहेत त्यामुळे भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे.अनेक दिवसांपासून सदरची मोकाट कुत्रे गावात व माळभागात फिरत आहेत प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष आहे.त्यामुळे नागरिकातून तीव्र असंतोष पसरला असून या मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांतून व वाहनधारकातून होत आहे.

# कोरोची जिल्हा परिषदेसाठी इच्छुकांची भाऊगर्दी

## कोरोचीला उमेदवारी देण्याची ग्रामस्थांची मागणी

कोरोची,ता.१४(वार्ताहर)-

**कोरोची जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजले असून जिल्हा परिषदसाठी सर्वसाधारण महिला व पंचायत समितीसाठी सर्वसाधारण पुरुष असे आरक्षण पडले असून या मतदारसंघाकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. या मतदारसंघात निवडणूक लढवण्यासाठी अनेक इच्छुक तयारीला लागले आहेत. निवडणूक लक्षवेधी ठरणार आहे. तसेच जिल्हा परिषद पक्षाची उमेदवारी कोरोची गावाला द्यावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.**

कोरोची जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक १६ जानेवारी २०२६ ते २१ जानेवारी २०२६ पर्यंत उमेदवारी अर्ज सादर करणे, २२ जानेवारी रोजी अर्जाची छानंनी, २७ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज माघार घेणे, ५ फेब्रुवारी रोजी मतदान व ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी असा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला असून जिल्हा परिषदसाठी सर्वसाधारण महिला आरक्षित असल्यामुळे माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.प्रेमला दीपक पाटील, सौ. समिधा सुमेध ओहूळकर, माजी सरपंच सौ.शैलजा शितल पाटील, सौ.सुरेखा सिताराम निकम इच्छुक असून व पंचायत समिती साठी सर्वसाधारण पुरुष असे आरक्षण असून उद्योगपती विजय चव्हाण, माजी ग्रामपंचायत सदस्य सनी उर्फ सुमेध ओहूळकर, माजी उपसरपंच आनंदा शेट्टी, माजी तंटामुक्त अध्यक्ष रणजीत शिंदे, सचिन पवळे,समाधान निकम, राजेंद्र निकम इच्छुक असून मतदारसंघाकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. कोरोची जिल्हा परिषद मतदार संघात कोरोची-तारदाळ- खोतवाडी या तीन गावचा मतदारसंघ असून गेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत तारदाळ गावाला पक्षाची उमेदवारी दिली होती यंदा कोरोची गावाला पक्षाची उमेदवारी मिळावी अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे.

**कोरोची गावातील इच्छुक उमेदवार**

**जिल्हा परिषद**-सौ.प्रेमला पाटील, सौ. समिधा ओहळकर, सौ. शैलजा पाटील

**पंचायत समिती**- विजय चव्हाण,सनी ओहुळकर, आनंदा शेट्टी,रणजीत शिंदे,सचिन पवळे

## तारदाळमधून प्रियंका खोबरे यांचे नाव चर्चेत

तारदाळ,ता.१४(वार्ताहर)-



**कोरोची जि.प.मतदारसंघातून मा.जि.प.सदस्य प्रसाद खोबरे यांच्या स्नुषा सौ.प्रियंका प्रविण खोबरे यांचे नाव चर्चेत असून उमेदवारी कोणाला मिळणार याकडे मतदारसंघाचे लक्ष लागून राहिले आहे.गत पाच वर्षात प्रसाद खोबरे यांनी जि.प.मतदारसंघात विकासकामांचा डोंगर उभा केला आहे.**

सध्यस्थितीत तारदाळ खोतवाडी ग्रामपंचायतीवर भाजपची निर्वीवाद सत्ता आहे. दोन्ही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शासकीय योजना घराघरात पोहचविण्यात त्यांना यश मिळाले आहे.प्रसाद खोबरे यांच्या पुढाकारातून जिल्ह्यात एकमेव ५३ कोटीची जलजीवन मिशन पाणी योजना तारदाळमध्ये आणून ती कार्यान्वीत करण्यात आली आहे तसेच कोरोना काळात कोरोची तारदाळ खोतवाडीमध्ये कोरोना केंद्र उभारून जनतेला आरोग्याचा दिलासा दिला आहे.महिलांना घरोघरी उज्वला गॅस देण्यात पुढाकार घेतला. शेतकऱ्यांसाठी अनेक बंधारे उभा करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. या विकास कामांच्या आधारावर जिल्हा परिषदेच्या निवडणूकीसाठी खोबरे यांच्या सुनबाई सौ प्रियंका प्रविण खोबरे या इच्छूक असून मतदारांची पहिली पसंती असल्याचे बोलले जात आहे.याशिवाय प्रसाद खोबरे यांच्या माध्यमातून महावितरणचे पहिले सबस्टेशन प्राइड इंडिया जवळ चालू झाले आहे व दुसऱ्या सबस्टेशनचे कॉलेजच्या पाठीमागे काम चालू आहे ,दोन महिन्यांमध्ये ते सबस्टेशन चालू होणार आहे.शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दिवसा लाईट मिळावी यासाठी पाठपुरावा करून शेतीसाठी दिवसा लाईट मिळण्यासाठी प्रयत्न केले. जिल्हा परिषद कडून देण्यात येणारा मानाचा राजर्षी शाहू छत्रपती २०२० पुरस्कार मिळाला. जि.प.मराठी शाळा बांधण्यासाठी मोफत जागा देणाऱ्या व्यक्तीचे नाव शाळेवर देण्यासाठी जिल्हा परिषदच्या मीटिंगमध्ये ठराव करून पहिल्यांदाच तारदाळ मधील गौरीशंकर नगर येथे शाळेसाठी मोफत जागा दिलेल्या कै. लक्ष्मीबाई कलगोंडा पाटील यांचे नाव शाळेवर देण्यात आले.

# सरकारी नोकरी लावण्याच्या आमिषाने १३ लाखाची फसवणूक

## पेठ येथील व्यावसायिकाची तक्रार; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

ईश्वरपूर,ता.१४ (प्रतिनिधी)–

**मुलास कारागृह विभागात वरिष्ठ लिपिक पदावर सरकारी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून तब्बल १३ लाख १० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी चौघांवर ईश्वरपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाजीराव जोती पाटील (रा. वाडीभाग ता. शिराळा), गणेश दिनकर जाधव, नागेश दिनकर जाधव, मनिषा गणेश जाधव (तिघे रा. पाचगाव जि. कोल्हापूर) अशी संशयीतांची नावे आहेत. याबाबत अर्जुन आण्णासो देशमुख(रा.विष्णूनगर,कापूरवाडी पेठ) यांनी फिर्याद दिली आहे.**

अर्जुन आण्णासो देशमुख व संशयीतांची ओळख एका जमीनीच्या व्यवहारातून झाली होती. संशयीत बाजीराव पाटील यांनी स्वत: जेल अधिकारी असल्याचे भासवून व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी ओळख असल्याचे सांगत देशमुख यांच्या मुलास नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यासाठी १५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली.

यानंतर बाजीराव पाटील यांच्यासह गणेश दिनकर जाधव, नागेश दिनकर जाधव व मनिषा गणेश जाधव (सर्व रा. पाचगाव, जि. कोल्हापूर) यांनी देशमुख कुटुंबाकडून वेळोवेळी आरटीजीएस, गुगल पे, तसेच रोख स्वरूपात पैसे स्वीकारले. देशमुख पिता-पुत्रांकडून एकूण १५ लाख १० हजार रुपये संबंधित व्यक्तींना देण्यात आले.

मात्र, बराच कालावधी उलटूनही मुलास सरकारी नोकरी मिळाली नाही. पैसे परत मागितल्यावर आरोपींकडून टाळाटाळ करण्यात आली. दरम्यान, बाजीराव पाटील यांनी दिलेला १५ लाखांचा धनादेश बँकेत जमा केल्यानंतर तो बाऊन्स झाला. चौकशीनंतर संशयीत आरोपींकडून केवळ २ लाख रुपये परत करण्यात आले असून अद्याप १३ लाख १० हजार रुपये मिळणे बाकी असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या प्रकरणी संशयीत चौघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस करत आहेत.




# डॉ.ज्ञानेश्वर मुळे यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन

इचलकरंजी,ता.१४–

**डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशन व रोटरी क्लब, ऑफ इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.ज्ञानेश्वर मुळे यांच्या जीवनावर आधारित सुप्रसिद्ध लेखिका सायली वैद्य यांनी लिहिलेले ''जीप्सी'' या पुस्तकाचा प्रकाशन रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी येथे संपन्न झाला.**

त्याप्रसंगी नुकतेच मधून निवड झालेले सहाय्यक आयुक्त तथा मुख्याधिकारी तन्मय अनिल मांढरेकर यांचा व फौंडेशनच्या आघाडीच्या कार्यकर्त्यां प्रेमलता साळी यांची शासकीय मिशन वात्सल्य कमिटी वर निवड झालेबद्दल यथोचित सत्कार माजी परराष्ट्र सचिव, सदस्य मानव अधिकार आयीग व जेष्ठ साहित्यिक डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे हस्ते पार पडला.

या कार्यक्रम प्रसंगी रोटरी चे अध्यक्ष संजय घायतिडक, संजय मुळे, अनिल नानिवडेकर, वृषाली साळी , मुकेशजी हुंडोया व संतोष पाटील, संजय लोटके, श्री मांगुरे , डॉ. ज्योती बडे, माधुरी काजवे, मनोहर कांबरे, बाबासाहेब निकम,माऊली गजानन खेतमार, प्रसाद कुलकर्णी, तसेच पिरगोंडा पाटील, नेमीनाथ कोथळे, मुकुंद माळी, राजू नंदाफ व सुनील मांगलेकर तसेच रजनी शिंदे व शुभांगी मुळे , प्रकाश गौड,उपस्थित होते.

# कुरुंदवाड शहराच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढणार

## आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर

कुरुंदवाड,ता.१४(प्रतिनिधी)–

**जवळपास नऊ वर्षांनंतर झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये नागरिकांनी पारंपरिक पॅनल आणि सत्तांतराच्या राजकारणाला बाजूला ठेवत राजर्षी शाहू विकास आघाडीवर विश्वास दाखवला आहे. या विश्वासातून शहराचा अनेक वर्षांपासून रखडलेला विकासाचा बॅकलॉग भरून काढण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींवर आली असून, पाणीपुरवठा, भुयारी गटार योजना, स्वच्छता, नागरी सुविधा, शिक्षण, क्रीडा, रोजगार, उद्योगवाढ आणि पर्यटन विकासाला प्राधान्य देत सर्वसमावेशक विकास साधला जाईल, असे प्रतिपादन आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी केले.**



कुरुंदवाड नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांनी पदभार स्वीकारल्यानिमित्त आयोजित सभेत बोलताना आम राजेंद्र पाटील

कुरुंदवाड नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांनी पदभार स्वीकारल्यानिमित्त आयोजित सभेत ते बोलत होते. लोकनियुक्त नगराध्यक्ष मनीषा डांगे,उपनगराध्यक्ष दीपक गायकवाड, माजी नगराध्यक्ष रामचंद्र डांगे आदी प्रमुख उपस्थित होते.

पुढे बोलताना आम.डॉ.पाटील-यड्रावकर म्हणाले की, नूतन लोकप्रतिनिधींनी प्रामाणिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभार करणे आवश्यक आहे. पक्षीय भेद, गटबाजी बाजूला ठेवून सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. पुढील काळात विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी नगराध्यक्ष मनीषा डांगे म्हणाल्या की, संघर्ष, समाजसेवा आणि जनतेच्या विश्वासातूनच हे स्थान मिळाले आहे. पुढील पाच वर्षांत पारदर्शक आणि विकासाभिमुख कारभार करून जाहीरनाम्यातील प्रत्येक बाब प्रत्यक्षात पूर्ण केली जाईल.

यावेळी प्रस्ताविक अ‍ॅड विजय जमदग्नी यांनी केले. माजी सरपंच अभिजित जगदाळे, रामदास मधाळे, नगरसेवक वैभव उगळे, बाळासाहेब गायकवाड, रामचंद्र डांगे, उपनगराध्यक्ष दीपक गायकवाड यांनी मनोगते केली. याप्रसंगी रामचंद्र मोहिते, अजित देसाई, उमेश कर्नाळे, विठोबा कोळेकर, रणजित डांगे, लियाकत बागवान, अल्ताफ बागवान, सलिम बागवान, तोफिक आंबी, सिताराम भोसले, सचिन जोंग, तन्वीर मुल्ला यांच्यासह सर्व नूतन नगरसेवक, नगरसेविका, राजर्षी शाहू विकास आघाडीचे पदाधिकारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार नूतन नगरसेवक रमेश भुजुगडे यांनी मानले.

# आदर्श आचार संहितेचे सर्व राजकिय पक्षांनी पालन करावे - प्रांताधिकारी दिपक शिंदे

हातकणंगले,ता.१४ (प्रतिनिधी)–

**तालुक्यातील अकरा जिल्हा परिषद गटांची व बावीस पंचायत समिती गणांची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे . आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन सर्वच राजकीय पक्षांसह उमेदवारांनी करावे. आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी दिपक शिंदे यांनी हातकणंगले येथील पत्रकार परिषदेमध्ये सांगितले. यावेळी हातकणंगलेचे तहसीलदार सुशील बेल्हेकर , अप्पर तहसीलदार महेश खिलारे , नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विशाल पाटील उपस्थित होते .**



प्रांताधिकारी शिंदे यांनी पुढे सांगितले , १६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज वितरण व दाखल करून घेण्यासाठी प्रत्येक गटासाठी व गणासाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाणार आहे . उमेदवारी अर्ज पारंपारिक (ऑफलाइन ) पद्धतीने स्विकारण्यात येतील .

प्रत्येक उमेदवारांना चार उमेदवारी अर्ज मिळणार असून त्याची किंमत शंभर रुपये आहे. सर्वसाधारण गटासाठी एक हजार रुपये व पंचायत समिती गणासाठी पाचशे रुपये तर आरक्षित जिल्हा परिषद गटासाठी सातशे रुपये व पंचायत समिती गणासाठी तीनशे पन्नास रुपये अनामत रक्कम स्विकारली जाईल . तसेच जिल्हा परिषद गटासाठी पाच लाख रुपये व पंचायत समिती गणासाठी साडेतीन लाख रुपये खर्चाची मर्यादा आहे.

तालुक्यातील प्रत्येक गावातील सर्वच राजकीय पक्षांनी व लोकप्रतिनिधीनी बॅनर्स व पोस्टर्स तात्काळ काढून घेण्याचे आहे. निवडणुकीसाठी सर्वच परवानगी संबंधित कार्यालयाकडून देण्यात येतील. उमेदवारी अर्ज दाखल करताना त्याच गटातील व गणातील प्रत्येकी एक सुचक देणे आवश्यक आहे . तालुक्यात बाहेरून येणाऱ्या सर्व वाहनांच्या तपासणीसाठी चार तपासणी नाके ठेवली जाणार आहेत.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल

ईश्वरपूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संशयीत आनंद सतीश मिसाळ (रा. वाघेरी, ता. कराड, जि. सातारा) याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता व बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.**

पीडित अल्पवयीन मुलगी असून आरोपीने तिचे वय माहित असतानाही जुलै २०२३ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ईश्वरपूर येथे लॉजवर जबरदस्तीने वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. आरोपीने मोबाईलद्वारे संपर्क साधून तिच्याशी मैत्री वाढवल्याचेही तक्रारीत नमूद आहे. पीडित मुलीने कराड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर सदर तक्रार 'झिरो' द्वारे ईश्वरपूर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आली. बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**ई-निविदा नोटीस**

एसआरएम निविदा क्र. ३५/२०२५-२६; **(RFX No. ७०००३८६०६)**
२२० के.व्ही. उपकेंद्र हलकर्णी आणि २२०/३३ के.व्ही. उपकेंद्र मुमेवाडी येथील वार्षिक देखभालीची स्थापत्य कामे.
**अंदाजित रक्कम** रु. १४,३३,०४६.४५, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख :** १५.०१.२०२६ (११.००) ते ३०.०१.२०२६ (११.००)
**टीप :** सदरच्या कामाची फेरनिविदा करण्याची गरज पडल्यास वृत्तपत्रांमध्ये पुन्हा प्रसिद्ध करण्यात येणार नाही. पुढील प्रक्रियेकरिता इच्छुक निविदा सादर करणाऱ्यांनी महापारेषण कंपनीच्या वेबसाईटला भेट द्यावी.
अधिक माहितीसाठी वेबसाईटला भेट द्या -
**https://srmetender.mahatransco.in**
**कार्यकारी अभियंता (स्था)**
**अउदा स्था. बांध. नि सु. विभाग, कोल्हापूर**

# प्रभाग सातमध्ये भानामतीचा प्रकार

## लिंबू, नारळ, बाहुली, पपई, हळद-कुंकू काळ्या कपड्यात बांधून उमेदवाराच्या फोटोवर ठेवले

मिरज,ता.१४ (प्रतिनिधी)–

**महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मिरज शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये अंधश्रद्धा आणि तंत्र-मंत्राचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. महापालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी अवघे काही तास शिल्लक असतानाच मतदान केंद्रांच्या बाहेर भानामतीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीती व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

माणिक नगर येथील शाळा क्र.२१ परिसरात, समता नगरमधील काही चौकांमध्ये तसेच प्रभाग सातमधील काही मतदान केंद्रांच्या बाहेर लिंबू, नारळ, बाहुली, पपई, हळद-कुंकू आदी साहित्य काळ्या कपड्यात बांधून त्यामध्ये एका उमेदवाराचा फोटो ठेवण्यात आल्याचे आढळून आले. मतदान केंद्राच्या बाहेरच अशा प्रकारचे अघोरी कृत्य केल्याने मतदारांमध्ये अस्वस्थता पसरली. हा प्रकार



निदर्शनास येताच कोळेकर समर्थक व कार्यकर्ते संतप्त झाले असून त्यांनी घटनास्थळी गर्दी करत पोलिसांना याची माहिती दिली. त्यानंतर भानामतीसाठी वापरण्यात आलेले साहित्य गोळा करून ते नष्ट करण्यात आले. घटनेनंतर परिसरात चर्चांना उधाण आले असून, काही नागरिकांमध्ये भीती तर काहींमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मतदानाच्या अवघ्या काही तास आधी तंत्र-मंत्र, जादूटोणा आणि अंधश्रद्धेचा वापर करून निवडणूक वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप होत आहे. निवडणूक शांततेत, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पडावी, अशी अपेक्षा असताना अशा घटनांमुळे प्रशासन व पोलिस यंत्रणेसमोरही आव्हान निर्माण झाले आहे. प्रभाग क्रमांक ७ मधील या प्रकाराच्या पार्श्वभूमीवर तंत्र-मंत्राच्या नावाखाली सुरू असलेल्या अघोरी कृत्यांवर तातडीने नियंत्रण ठेवावे, अशी जोरदार मागणी कोळेकर समर्थक व नागरिकांकडून केली जात आहे.

# जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन समिती कार्यान्वित; नियम भंग केल्यास कारवाई

कोल्हापूर,ता.१४ (प्रतिनिधी)–

**जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात, तसेच प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळावी, या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने माध्यमांबाबत कडक नियम लागू केले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील प्रचार जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन अनिवार्य करण्यात आले असून, यासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती कार्यान्वित करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिली.**

निवडणूक काळात माध्यमांचा गैरवापर, पेड न्यूज तसेच समाजमाध्यमांवरून होणारी दिशाभूल रोखण्यासाठी ही समिती काम पाहणार आहे. राजकीय पक्ष, इच्छुक उमेदवार तसेच त्यांच्या वतीने प्रचार करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांनी उमेदवाराच्या अधिकृत परवानगीनेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील जाहिरातींसाठी पूर्वपरवानगी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. व्हिडीओ, ऑडिओ जाहिराती, सोशल मीडियावरील ग्राफिक्स, रिल्स, व्हॉइस कॉल, तसेच पैसे देऊन प्रसारित होणारे मजकूर संदेश यासाठी पूर्वप्रमाणन घेणे बंधनकारक राहणार आहे.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीत जिल्हा पोलीस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी आणि तहसीलदार यांचा समावेश आहे. जिल्हा माहिती अधिकारी हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. ही समिती जाहिरातीतील मजकूर, व्हिडीओ क्लिप्स, सोशल मीडिया पोस्ट्स आणि पेड न्यूजचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना देणार आहे.

पूर्वप्रमाणनासाठी जाहिरात प्रसारित करण्यापूर्वी किमान पाच दिवस आधी जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा किंवा संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात अर्ज सादर करावा लागेल.

अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक प्रत, साक्षांकित स्क्रिप्ट आणि अन्य भाषांतील जाहिरातींसाठी मराठी अनुवाद जोडणे आवश्यक आहे.

अर्ज तीन कामकाजाच्या दिवसांत निकाली काढण्यात येईल. समितीने सुचवलेले बदल बंधनकारक राहतील.

मुद्रित माध्यमांतील जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन आवश्यक नसले, तरी त्यावर लागू असलेल्या कायद्यांचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमभंग झाल्यास प्रेस अ‍ॅक्टसह संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# लाकडाचा ओंडका डोक्यावर पडून बालकाचा मृत्यू

आजरा,ता.१४( प्रतिनिधी)–

**पतंग उडवत असताना लाकडाचा ओंडका डोक्यावर पडल्याने बालकाचा मृत्यू झाला. आदेश संजय पोवार (वय १० रा. मुरुड, जि. लातूर, सध्या रा. राईस मिलजवळ, आजरा) असे मृत बालकाचे नाव आहे. संक्रातीच्या सणादिवशीच ही घटना घडल्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.**



पोवार कुटुंबीय लातूरवरून खुरपी तयार करण्यासाठी आजऱ्यात आले आहे.आदेशचे आई, वडील, आजोबा व मामा खुरपी तयार करीत होते. तर आदेश व बहीण आदितीसोबत लाकडाच्या ओंडक्यावर उभा राहून पतंग उडवत होता. ओंडक्यावरून पाय निसटल्याने तो खाली पडला व डोक्यावर ओंडका पडल्याने रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

**कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,**

(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

**मुख्य कार्यालय :-** वॉर्ड नं. १२, घर नं. १, मेन रोड,जनता बँक भवन, इचलकरंजी-४१६११५ जिल्हा- कोल्हापूर (महा.राज्य) फोन नं.०२३०-२४३३५०५ ते ५०८.

**इंड. इस्टेट, इचलकरंजी शाखा कार्यालय :-** वॉर्ड नं.१८/२९१, ब्लॉक नं.७५, शाहु पुतळ्याजवळ, इंड. इस्टेट, इचलकरंजी - ४१६११५, जि.:- कोल्हापूर

**नोटीस**

**दि सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् अ‍ॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ मधील कलम, नियम ६ (२) आणि / किंवा नियम ८(६) प्रमाणे नोटीस.**

खाली सही करणार कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि. यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् अ‍ॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ (येथून पुढे सदर कायदा असे वाचावे) अन्वये कर्जाची येणेबाकी वसुलीसाठी सदर कायद्यातील कलम व रुल्स याअन्वये खाली नमुद केलेप्रमाणे तारण मिळकत **'जशी आहे तशी व जिथे आहे तिथे'** या तत्वावर खरेदी करण्यास इच्छुक खरेदीदाराकडून विहित नमुन्यातील निविदामधुन त्यांचे खरेदी प्रस्ताव मागवणार आहेत. सदर मिळकत सदर कायद्यातील कलम १३(४), कलम १४ आणि नियम ९ अन्वये बँकेने त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारान्वये बँकेने प्रत्यक्ष ताब्यात घेतली आहे. बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली नमुद केलेल्या तक्त्यातील नमुद कर्जदार, जामीनदार यांना सदर कायद्यातील नियम ६ (२) आणि / किंवा८(६) प्रमाणे दि.०२/०१/२०२६ इ. रोजीची नोटीस जारी केली आहे आणि असे कळविणेत आले आहे की सदर नोटीस जाहीर केलेपासुन १५ दिवसात आपण वैयक्तीक व संयुक्तीरित्या व्याजासह संपुर्ण येणेबाकी भरणेत यावी. आणि असे ही कळविणेत आले आहे की नमुद मुदतीत सदर रक्कम न भरलेस बँक सदर कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्राप्त असलेल्या अधिकारानुसार येणेबाकी वसुलीसाठी खाली नमुद केल्याप्रमाणे तारण मिळकतीची विक्री करेल.


| अ. नं. | कर्जदार व जामिनदारांची नांवे आणि कर्ज खाते नं. | मागणी रक्कम | मिळकतीचा तपशील | राखीव किंमत आणि (बयाणा रक्कम) |
|---|---|---|---|---|
| १. | १) मे. सुरज क्लॉथ कंपनी प्रोप्रा. श्री. सुरज श्रीप्रकाश दुबे, २०/२६, शांती सदन, जुना कोल्हापूर नाका, भोने माळ, इचलकरंजी, तालुका- हातकणंगले, जिल्हा - कोल्हापुर. (कर्जदार), २) श्रीमती पद्मादेवी श्रीप्रकाश दुबे, २०/२६, शांती सदन, जुना कोल्हापूर नाका, भोने माळ, इचलकरंजी, तालुका - हातकणंगले, जिल्हा - कोल्हापुर. (जामीनदार), ३) सौ. संध्या सुरज दुबे, २०/२६, शांती सदन, जुना कोल्हापूर नाका, भोने माळ, इचलकरंजी, तालुका- हातकणंगले, जिल्हा. - कोल्हापुर (जामीनदार), कर्ज खाते नं. सीसी - ८४३. | बँकेने कर्जदार व इतर यांना सदर कायदा कलम १३(२) अन्वये दि.२२/११/२०२४ इ. रोजीची जारी केलेल्या मागणी नोटीस मधील दि. ३१/१०/२०२४ रोजी पर्यंतची येणे रक्कम रु.९९,२७,८२५/- (अक्षरी रक्कम रुपये नव्याण्णव लाख सत्तावीस हजार आठशे पंचवीस फक्त) व त्यावर करारातील व्याज दराप्रमाणे होणारे पुढील व्याज व खर्च आदी. | श्रीमती पद्मादेवी श्रीप्रकाश दुबे व श्री सुरज श्रीप्रकाश दुबे यांचे संयुक्तीक मालकीची कबनूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील सि.स.नं.२४८४७ याचे एकुण क्षेत्र ४८७.५ चौ.मी. यापैकी क्षेत्र २७५२ चौ. फूट) जागा त्यावरील इमारत मिळकत यासी चतु:सिमा :- पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - निकम व धुमाळ यांची मिळकत, दक्षिणेस - सुनिता दुबे यांची मिळकत आणि उत्तरेस - निकम यांची मिळकत येणेप्रमाणे चतु : सिमेतील संपुर्ण मिळकत व त्यामधील सर्व अनुषंगिक हक्कासह मिळकत. | रु. ९९.३७ लाख आणि (बयाणा रु. ९.९४ लाख) |
| २. | १) मे. रिध्देश स्टील प्रोप्रा. सौ. संध्या सुरज दुबे, २०/२६, शांती सदन, भोने माळ, इचलकरंजी, तालुका- हातकणंगले, जिल्हा - कोल्हापुर. (कर्जदार), २) श्रीमती पद्मादेवी श्रीप्रकाश दुबे, २०/२६, शांती सदन, भोने माळ, इचलकरंजी, तालुका- हातकणंगले, जिल्हा - कोल्हापुर. (जामीनदार), ३) श्री. सुरज श्रीप्रकाश दुबे, २०/२६, शांती सदन, जुना कोल्हापूर नाका, भोने माळ, इचलकरंजी, तालुका - हातकणंगले, जिल्हा - कोल्हापुर. (जामीनदार), कर्ज खाते नं. सीसी - ८९२ | बँकेने कर्जदार व इतर यांना सदर कायदा कलम १३(२)अन्वये दि. २२/११/२०२४ इ. रोजीची जारी केलेल्या मागणी नोटीस मधील दि. ३१/१०/२०२४ रोजी पर्यंतची येणे रक्कम रु.४१,८१,५७२/- (अक्षरी रक्कम रुपये एक्केचाळीस लाख एक्याऐंशी हजार पाचशे बहात्तर फक्त) व त्यावर करारातील व्याज दराप्रमाणे होणारे पुढील व्याज व खर्च आदी. | | |

बँकेने सरफेसी कायदा नियम ६(२) आणि/किंवा ८(६) प्रमाणे दि.०२/०१/२०२६ रोजीची नोटीस रजि. एडी. ने यातील वर नमुद केलेप्रमाणे कर्जदार व जामीनदार यांना पाठवली असता सदर नोटीसींचे लखोटे पोस्टल शेऱ्यानिशी परत बँकेस आलेले आहे. त्यामुळे वरील नमुद नोटीस मधील मजकूर सेक्युरीटी इन्ट्रेस्ट (इन्फोर्समेंट) रुल्स २००२ मधील ३ (१) मधील तरतूदीप्रमाणे या नोटीसद्वारे प्रसिध्द केले आहे. सदर कर्जदार व इतर यांना खाली सही करणार अधिकृत अधिकारी यांचेकडून सदरची नोटीस उपलब्ध होवू शकते आणि सदर कर्जदार व इतर यांना पुन्हा एकदा या नोटीसद्वारे कळविणेत येते की ही नोटीस प्रसिध्द केले पासून १५ दिवसांच्या आत दि.३१/१२/२०२५ अखेरची येणेबाकी रक्कम अनुक्रमे रु. १,१४,४५,७५२/- कर्ज खाते नं. सीसी - ८४३ व रु.४८,२२,१६७ /- कर्ज खाते नं. सीसी - ८९२ आणि त्यावरील करारातील व्याज दराप्रमाणे होणारे पुढील व्याजासह व खर्चासह सर्व रक्कम बँकेत जमा करणेत यावी. नमुद मुदतीत सदर रक्कम न भरलेस, सदर नोटीसीच्या १५ दिवसांच्या मुदतीनंतर, बँक सदर कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्राप्त असलेल्या अधिकारानुसार येणेबाकी वसुलीसाठी वर नमुद केल्याप्रमाणे तारण मिळकतीची विक्री करेल.

तारीख : १४/०१/२०२६

सही /-
**( डी. व्ही. पाटील )**
जनरल मॅनेजर व प्राधिकृत अधिकारी
कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.

(सदरची नोटीस ही मुळ इंग्रजी नोटीसीचा स्वैर अनुवाद असुन, तफावत असल्यास इंग्रजी नोटीस ग्राह्य धरणेत येईल.)



# विराट कोहली ५ वर्षांनंतर नंबर-१ वनडे फलंदाज

नवी दिल्ली,ता.१४–

दिग्गज भारतीय फलंदाज विराट कोहली ५ वर्षांनंतर आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत नंबर–१ फलंदाज बनला आहे. त्याने या स्थानावरून भारताच्याच रोहित शर्माला मागे टाकले आहे. बुधवारी जाहीर झालेल्या क्रमवारीत रोहितला दोन स्थानांचे नुकसान झाले आहे.

विराटने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ९३ धावांची खेळी केली होती, याचा त्याला थेट फायदा झाला. त्याचे आता ७८५ रेटिंग गुण झाले आहेत. विराट एप्रिल २०२१ नंतर पहिल्यांदाच आणि एकूणच त्याच्या कारकिर्दीत ११व्यांदा नंबर–१ एकदिवसीय फलंदाज बनला आहे. गेल्या आठवड्यात तो नंबर–२ वर होता.

न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेललाही एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता ७८४ रेटिंगसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. म्हणजेच, पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या फलंदाजांमध्ये फक्त एका रेटिंग गुणाचा फरक आहे.

विराटने ऑक्टोबर २०१३ मध्ये पहिल्यांदा टॉप रँकिंग मिळवली होती. विराट एकूण ८२५ दिवस नंबर–१ स्थानावर राहिला आहे. वनडेमध्ये इतर कोणताही भारतीय फलंदाज इतके दिवस नंबर–१ राहिलेला नाही. जगात तो या बाबतीत १०व्या स्थानावर आहे.

**सिराजला गोलंदाजीत फायदा**

गोलंदाजी क्रमवारीत भारताच्या मोहम्मद सिराजने कमाल केली आणि ५ स्थानांची झेप घेत १५व्या स्थानावर पोहोचला. त्याच्यासोबत या स्थानावर बांगलादेशचा मेहदी हसन मिराज देखील आहे. तर, अफगाणिस्तानचा अष्टपैलू खेळाडू राशिद खान टॉप गोलंदाज आहे.

तर, न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज काइल जेमीसनने भारताविरुद्ध ४ बळी घेऊन करिअरमधील सर्वोत्तम कामगिरी केली. याचा फायदा त्याला क्रमवारीतही मिळाला आणि तो २७ स्थानांनी वर चढून ६९व्या स्थानावर पोहोचला आहे.

# भारताचा पराभव; न्यूझीलंडने दुसरा वनडे जिंकला

## केएल राहुलचे शतक व्यर्थ; डॅरिल मिशेल ठरला विजयाचा हिरो

राजकोट, ता.१४–

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना राजकोट येथे खेळला गेला. न्यूझीलंडने १५ चेंडू शिल्लक असताना सात विकेट्सने विजय मिळवला. चौथ्या क्रमांकाचा फलंदाज डॅरिल मिशेल विजयाचा हिरो ठरला. त्याने ११७ चेंडूत १११.९६ च्या स्ट्राईक रेटने १३१ धावा करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तिसऱ्या क्रमांकाचा फलंदाज विल यंगनेही ९८ चेंडूत ८७ धावांचे योगदान दिले. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यातील विजयासह न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १–१ अशी बरोबरी साधली आहे. शेवटचा एकदिवसीय सामना जिंकणारा संघ मालिका जिंकेल.**



केएल राहुलच्या नाबाद शतकामुळे भारताने न्यूझीलंडसमोर २८५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. न्यूझीलंडने नाणेफेक जिंकली आणि भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. केएल राहुलने ९२ चेंडूत ११ चौकार आणि एका षटकारासह नाबाद ११२ धावा केल्या. ज्यामुळे भारताने ५० षटकांत ७ बाद २८४ धावा करता आल्या होत्या. राहुल व्यतिरिक्त भारताकडून शुभमन गिलने ५६ धावा केल्या, तर इतर फलंदाज मोठी खेळी करू शकले नाहीत.

भारताकडून राहुल आणि गिल व्यतिरिक्त रवींद्र जडेजा २७, रोहित शर्मा २४, विराट कोहली २३, नितीश कुमार रेड्डी २०, श्रेयस अय्यर ८ आणि हर्षित राणाने दोन धावा केल्या. मोहम्मद सिराज दोन धावा काढून नाबाद राहिला. न्यूझीलंडकडून ख्रिस क्लार्कने तीन विकेट्स घेतल्या, तर काइल जेमीसन, झाचेरी फॉक्स, जेडेन लिनॉक्स आणि मायकेल ब्रेसवेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. रोहित शर्मा आणि विराट कोहली या सामन्यात फारसा प्रभाव पाडू शकले नाहीत.

भारताच्या फलंदाजांची हाराकिरी या सामन्यात पाहायला मिळाली, केएल राहुल या सामन्यात राहुल भारतासाठी संकटमोचक ठरला. राहुलने यावेळी ९२ चेंडूंत नाबाद ११२ धावांची खेळी साकारली. त्यामुळे भारताला २८४ धावा तरी करता आल्या. पण न्यूझीलंडच्या फलंदाजांनी भारताच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. पहिल्या सामन्यात भारताने न्यूझीलंडवर दमदार विजय साकारला होता. पण आता दुसऱ्या वनडे सामन्यात मात्र भारतावर पराभवाची नामुष्की ओढवली. भारताने या सामन्यात विजय मिळवला असता तर त्यांना मालिका जिंकता आली असती. न्यूझीलंडने आता दुसरा सामना जिंकला आणि त्यांनी मालिकेत १–१ अशी बरोबरी साधली आहे. त्यामुळे आता भारताला एक मोठा धक्का बसला आहे.

न्यूझीलंडची फलंदाजी पाहिली तर ते तिसरा सामना चांगलाच गाजवतील, असे दिसत आहे. कारण या विजयाने त्यांना आत्मविश्वास वाढला असेल. न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल तर भन्नाट फॉर्मात आहे.

**कुलदीप यादवहा शुभमन गिलचा विश्वासू आणि हुकमी एक्का आहे. पण या सामन्यात भारताच्या पराभवाचा व्हिलनही कुलदीपच ठरला. कुलदीपने एक विकेट तर मिळवली. पण जिथे संघाला विजयासाठी ६ पेक्षा कमी धावांची गरज होती, तिथे कुलदीपने आपल्या १० षटकांत ८२ धावा दिल्या, म्हणजेच प्रत्येक षटकामागे त्याने आठ धावा दिल्या. त्यामुळे कुलदीप यादवच यावेळी भारताच्या पराभवाचा व्हिलन ठरला, अशी चर्चा सुरु झाली होती.**

# चार अमेरिकन क्रिकेटपटूंना भारतीय व्हिसा नाकारला

## टी–२० विश्वचषकात सहभागी होणार नाही

नवी दिल्ली,ता.१४ –

**२०२६ च्या टी–२० विश्वचषकापूर्वी अमेरिकन संघाला धक्का बसला आहे. पाकिस्तानी वंशाच्या चार क्रिकेटपटूंना भारतात प्रवास करण्यासाठी व्हिसा मिळालेला नाही. यामुळे आता विश्वचषकात त्यांचा सहभाग धोक्यात आला आहे, असा दावा एका अहवालात करण्यात आला आहे. २०२६ चा पुरुषांचा टी–२० विश्वचषक ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त आयोजनात होणार आहे. एका क्रिकेटपटूने सांगितले की, त्याला आणि इतर तीन क्रिकेटपटूंना टी–२० विश्वचषकासाठी भारतात जाण्यासाठी व्हिसा मिळालेला नाही.त्यामुळे आम्ही टी–२० विश्वचषकात सहभागी होऊ शकणार नाही.**





अहवालात असा दावा करण्यात आला आहे की, टी–२० विश्वचषकासाठी २० सदस्यीय अमेरिकन संघात शायन जहांगीर, मोहम्मद मोहसीन आणि एहसान आदिल हे इतर तीन क्रिकेटपटू आहेत. तिघेही पाकिस्तानात जन्मले होते पण आता ते अमेरिकेचे नागरिक आहेत. भारताच्या व्हिसा नियमांनुसार, पाकिस्तानात जन्मलेल्या सर्व व्यक्तींना त्यांच्या जन्माच्या देशाच्या पासपोर्टचा वापर करून व्हिसासाठी अर्ज करावा लागतो. २०१९ मध्ये सिकंदर झुल्फिकार आणि साकिब झुल्फिकार यांना व्हिसा नाकारण्यात आला होता. २०२३ च्या विश्वचषकासाठी सिराज अहमदला उशिरा व्हिसा मिळाला. ऑस्ट्रेलियन सलामीवीर उस्मान ख्वाजा (२०१७) आणि इंग्लंडचे फिरकीपटू रेहान अहमद आणि शोएब बशीर (२०२४) यांनाही अशाच समस्यांना तोंड द्यावे लागले आहे.

# सिंधूला पराभवाचा धक्का; श्रीकांतची विजयी सलामी

नवी दिल्ली,ता.१४–

**भारतीय बॅडमिंटनला इंडिया ओपन २०२६ मध्ये सुरुवातीच्या काळातच धक्का बसला, जेव्हा दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती पीव्ही सिंधूने पहिल्या फेरीत खालच्या क्रमांकाच्या व्हिएतनामी बॅडमिंटनपटू गुयेन थुई लिन्हकडून पराभूत झाली. त्याच स्पर्धेत, माजी जागतिक क्रमांक एक किदाम्बी श्रीकांतने दुसऱ्या फेरीत प्रवेश करण्यासाठी संघर्ष करावा लागला. श्रीकांतने सध्या खेळण्याच्या परिस्थितीभोवतीच्या वादावरही आपले स्पष्ट मत व्यक्त केले.**

माजी जागतिक क्रमांक एक भारतीय बॅडमिंटनपटू किदाम्बी श्रीकांतने इंडिया ओपन सुपर ७५० मध्ये चांगली कामगिरी करत भारताच्याच थरुन मणिपल्लीला पराभूत करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. श्रीकांतने हा सामना १५–२१, २१–६, २१–१९ असा जिकला. सामन्यानंतर, श्रीकांतने स्पर्धेच्या खेळण्याच्या परिस्थितीभोवतीच्या वादावरही प्रतिक्रिया दिली. खरं तर, डॅनिश बॅडमिंटनपटू मिया ब्लिचफेल्ड्टने इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममधील व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते, ते एक अस्वास्थ्य वातावरण असल्याचे म्हटले होते आणि बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनकडून हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती.




श्रीकांतने हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. आणि त्याने सांगितले की, त्यांना या ठिकाणी काहीही असामान्य किंवा गैरप्रकार आढळला नाही. तो म्हणाला, प्रत्येक देशाची स्वतःची परिस्थिती असते. काही शटलमध्ये जास्त ड्रिफ्ट असते, तर काहींमध्ये कमी. मला येथे असे काहीही दिसले नाही जे वाईट म्हणता येईल. श्रीकांतने अशीही आठवण करून दिली की, यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये अशाच समस्या आल्या आहेत.

त्याने सांगितले की, डेन्मार्कमध्ये झालेल्या सामन्यादरम्यान वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे त्यांना एकदा जवळपास एक तास वाट पहावी लागली होती. दरम्यान, एच.एस. प्रणॉयला दोन दिवसांपेक्षा जास्त वेळ सामना पूर्ण करावा लागला. ३२ वर्षीय भारतीय बॅडमिंटनपटू म्हणाला, या गोष्टी फार क्वचितच घडतात आणि कोणताही देश हे जाणूनबुजून करत नाही. सर्व आयोजक चांगले करू इच्छितात.



स्व.शिवाजीराव देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करताना सत्यजित देशमुख,फत्तेसिंगराव देशमुख,संपतराव देशमुख आदी.




कोल्हापूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान यंत्रासह इतर साहित्य घेवून मतदान केंद्राकडे रवाना होताना अधिकारी व कर्मचारी तर दुसऱ्या छायाचित्रात स्ट्रॉंग रूमच्या पाहणीवेळी प्रशासक के.मंजुलक्ष्मी,जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता व इतर.

# टी–२० विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलिया पाकिस्तानमध्ये तीन सामने खेळणार

इस्लामाबाद,ता.१४–

**भारत व श्रीलंकेत होणाऱ्या आयसीसी टी–२० विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलिया लाहोरमध्ये तीन आंतरराष्ट्रीय टी–२० सामने खेळणार आहे. पाकिस्तान व ऑस्ट्रेलिया २९ आणि ३१ जानेवारी रोजी लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर आणि १ फेब्रुवारी रोजी विश्वचषकापूर्वी दिवस–रात्र टी–२० सामने खेळणार आहेत,अशी घोषणा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने केली.**

ऑस्ट्रेलिया आपले विश्वचषक गट सामने भारतात खेळणार आहे. तर पाकिस्तान त्यांचे सर्व सामने श्रीलंकेत खेळेल. ऑस्ट्रेलियन संघ २८ जानेवारी रोजी लाहोरमध्ये दाखल होणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी आणि विश्वचषकासाठी संघ अंतिम करण्यासाठी पाकिस्तान निवडकर्ते या आठवड्याच्या अखेरीस मुख्य प्रशिक्षक माइक हेसन आणि कर्णधार सलमान अली आगा यांच्याशी भेटणार आहेत.

# स्व. शिवाजीराव देशमुख यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

शिराळा,ता.१४(प्रतिनिधी) –

**डोंगरी विभागाचे शिल्पकार, विधान परिषदेचे माजी सभापती स्व. शिवाजीराव देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त कोकरूड येथील स्फूर्तीस्थळ समाधीस्थळी अभिवादन कार्यक्रम झाला.**

आम.सत्यजित देशमुख, ज्येष्ठ नेते फत्तेसिंगराव देशमुख, आम. सदाभाऊ खोत, शिवसेना नेते गौरव नायकवडी,माजी जि. प. सदस्य संपतराव देशमुख, रेणुकादेवी देशमुख,साईतेजस्वी देशमुख, हणमंतराव पाटील, के. डी. पाटील,सुखदेव पाटील, जितेंद्र पाटील, जयराज पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष पै.अशोक पाटील, नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, उपनगराध्यक्ष बसश्वेर शेटे,भाजपा मंडल अध्यक्ष सत्यजित पाटील, भाजपा शहर अध्यक्ष कुलदीप निकम,विकास नांगरे, दत्तात्रय पाटील, आनंदराव पाटील,नगरसेवक सचिन डांगे, रमेश कांबळे,विश्वजीत देशमुख,किर्तीकुमार पाटील,राहुल पाटील, विकास देशमुख, सुजित देशमुख यांनी पुष्पचक्र अर्पण करीत अभिवादन केले.

शिराळा विधानसभा मतदारसंघातील ठीकठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय, सेवा सोसायटी, पतसंस्था, सामाजिक संस्थांच्या कार्यालयामध्ये स्व.शिवाजीराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कोकरूड स्फूर्तीस्थळ या ठिकाणी अभिवादन कार्यक्रमास वारणा दूध संघाचे संचालक व्ही. डी.पाटील,मारुती जाधव, तानाजी कुंभार,दिनकर पाटील, सुदाम पाटील, अनिल देशमुख,नगरसेवक अभिजित यादव,बाजीराव पाटील,धनाजी नरुटे,हिंदुराव नांगरे, सर्जेराव पाटील,उत्तम निकम, महेश पाटील, वैभव कांबळे,राहुल पाटील,भिमराव पाटील,पोपट पाटील,मनोज चिचोलकर,बाजीराव शेंडगे,सचिन पाटील,धनाजी नरुटे,नारायण खोत, जयवंत शिंदे, शशिकांत पाटील,आनंदराव पाटील, नाना शेळके, किरण थोरात, राहुल पाटील,मोहन पाटील आदीसह विविध गावचे सरपंच, संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सां.मि.कु.मनपासाठी आज मतदान

## ५२७ मतदान केंद्रे : १ हजार ८०० पोलिसांचा बंदोबस्त

सांगली, ता.१४(प्रतिनिधी)–

**सांगली,मिरज, कुपवाड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान होत आहे. या मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक असणारे कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिटसह इतर आवश्यक साहित्य घेऊन केंद्र अधिकारी आणि कर्मचारी हे आपापल्या मतदान केंद्राकडे बुधवारी रवाना झाले. दरम्यान, संपूर्ण मतदान प्रक्रिया खुल्या आणि भयमुक्त वातावरणात पार पडावी, यासाठी चोख पोलीस बंदोबस्त सतर्क असून कायदा आणि सुव्यवस्थेला, शांततेला बाधा आणणाऱ्याची गय केली जाणार नाही,असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.**




सांगली : कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटसह इतर साहित्य घेऊन मतदान केंद्राकडे जाताना अधिकारी व कर्मचारी.

महापालिका क्षेत्रातील १८७ इमारती मतदान प्रक्रियेसाठी निश्चित करण्यात आल्या असून, त्यामध्ये ५२७ मतदान केंद्रे आहेत. या ठिकाणी पोलिस अंमलदार ४२५, होमगार्ड ३५६ कार्यरत असतील.चार किंवा त्यापेक्षा जास्त मतदान केंद्र असणाऱ्या ५३ इमारतींच्या शंभर मीटर परिसरात ५३ पोलिस व ५३ होमगार्डस् कार्यरत राहणार आहेत. सुमारे १ हजार ८०० पोलिस बंदोबस्तावर तैनात असणार आहेत. मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी सीसीटीव्ही व्हॅनद्वारे तसेच ३१ संवेदनशील ठिकाणच्या 'फिक्स पॉइंट'वरून करडी नजर ठेवली जाणार आहे. महापालिका क्षेत्रातील ७२ त्रासदायक ठिकाणांवर पोलिसांचे विशेष लक्ष असणार आहे. महापालिका निवडणूक जाहीर झाल्यापासून पोलिस दल दक्ष झाले आहे. पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील सहा पोलिस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर करडी नजर ठेवली आहे. कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून दीड हजार गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. चार टोळ्यांतील १८ जणांवर हद्दपारीची कारवाई केली आहे. मिरजेतील एका टोळीला 'मोका' लावला आहे.

**निवडणूक काळात समाजमाध्यमांवरून अफवा किंवा आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल होऊ नयेत, यासाठी सायबर सेलने करडी नजर ठेवली आहे. प्रत्येक पोस्टवर बारकाईने नजर ठेवली जात आहे. अफवा पसरवल्यास किंवा वादग्रस्त पोस्ट टाकल्यास कारवाई होणार आहे.**

महापालिका क्षेत्रातील प्रत्येक मतदान केंद्राच्या शंभर मीटर परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. मतदान केंद्राभोवती ७५० हून अधिक पोलिस व होमगार्ड यांचा बंदोबस्त असणार आहे. तिन्ही शहरांतील ३१ संवेदनशील ठिकाणी फिक्स पॉइंट उभारून पोलिस छावण्या तैनात केल्या आहेत. तेथून प्रभागातील हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे. तसेच सीसीटीव्ही व्हॅनची गस्त सुरू असून संशयास्पद हालचालींवर त्वरित कारवाई केली जाईल, असा इशारा अधीक्षक घुगे यांनी दिला आहे.पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, ६ उपअधीक्षक , ७ निरीक्षक , ४६ सहायक निरीक्षक व उपनिरीक्षक , ८२० अंमलदार, ७०० होमगार्ड, राखीव दलाच्या दोन प्लाटून, दंगल नियंत्रण पथक, जलद कृती दल व सीसीटीव्ही व्हॅन असा बंदोबस्त तैनात आहे.